# प्रायश्चित्त



मधू शिरगांवकर

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# प्रायश्चित्त

लेखिका : मधू शिरगांवकर

# प्रायश्चित्त

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# प्रायश्चित्त


## लेखिका : मधू शिरगांवकर

Plot 13, Mangaldham, Pune 411038

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप – 09822208197

ई मेल -- madhushirgaonkar@gmail.com


मुखपृष्ठ : कनका जोशी


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www.esahity.com
www.esahity.in
esahity@gmail.com

प्रकाशन : ९ सप्टेंबर २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# सौ मधू  शिरगांवकर



वय ५४ वर्षे.

पेशाने फार्मास्युटिकल ट्रेनर आणि कन्सल्टंट.

प्रमाणपत्रधारक योगशिक्षिका : yog Daily हे फेसबूक पेज चालवते. त्यावर दार आठवड्यात योगविषयक माहिती, त्यातील चुकीचे समज व काही योगासनांची प्रात्यक्षिके असा विडिओ बेस्ड कार्यक्रम करते.

पती, सासू , दोन मुले व आईवडील यांच्यासह गेली २८ वर्षे पुण्यात वास्तव्य.

पन्नासाव्या वर्षी लेखनास सुरवात केली. लेखन करतानाचा  आनंद सर्वात महत्वाचा आणि वाचकांची दाद ही  सगळयात मोठी पावती असं मानते.

वाचता वाचताच लेखनाची सुरवात झाली. जवळपास ५० लघुकथा, पाच दीर्घकथा, अनेक ललित लेख, व सध्या एका कादंबरीचे लेखन सुरू आहे.

ईसाहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली याआधीची  पुस्तके

१. प्रतिबिंब ( दीर्घभयकथा ) जून २०१९

२.रंजकथा ( १० लघुकथांचा कथासंग्रह ) ऑगस्ट २०१९

३. सुवर्णमती (दीर्घप्रेमकथा) जानेवारी २०२०

मातृभारती या साइटवरही ११ भागांची  दीर्घकथा आठवड्यातून दोन वेळा या पद्धतीने प्रकाशित केली आहे.

“माझा मराठीचा बोल”   दिवाळीअंकात २०१७, २०१८, व २०१९ च्या आवृत्यांमध्ये  कथा व लेख प्रकाशित.

“श्री व सौ” या  २०१९ च्या दिवाळीअंकात तीन लघुकथा ‘कथात्रयी’ या सदरात प्रकाशित.

निनाद या २०२० मध्ये अमेरिकेतून प्रसिद्ध झालेल्या विशेष अंकात लघुकथा प्रकाशित.

E mail : madhushirgaonkar@gmail.com
Mobile number: 9822208197

# अर्पणपत्रिका

ही एका बुद्धीमान, कणखर, कर्तव्यदक्ष

आणि आपलं मूल हाच आयुष्याचा केंद्रबिंदू मानणाऱ्या

मानी आईची कथा,

तिच्यासारख्याच एका स्त्रीला,

**राजेश्वरी किशोर,**

जिला आई होण्याचा खरा अर्थ कळलाय,

आणि तिची अत्यंत गोड मुलगी आरोहीला अर्पण!

# प्रायश्चित्त

# प्रायश्चित्त

## 1

हिरव्या रंगाची छोटीशी टुमदार कौलारू बंगली. अंगणात हिरवळ. कम्पाऊंडला रंगीत फुलांच्या गुच्छांनी लगडलेल्या वेली. चारी दिशांना नजर जाईल तिथपर्यंत उंचच उंच वृक्षांची रांग. मधूनच जाणारी छोटीशी पायवाट. अगदी निसर्गचित्रात दाखवतात तसंच होतं सगळं. सुंदर, देखणं. तिथे राहणारे दोघेही तसेच. शंतनू, उंचापुरा, धारदार नाकाचा, पाणीदार डोळ्यांचा, आणि शाल्मली, गुलाबी गोरी, बदामाकृती चेहऱ्याची, अपऱ्या नाकाची. नाजूक जिवणीची. हसली की गालांवर इतक्या गोड खळया पडत की पहाणाऱ्याला विसरच पडावा सगळ्याचा.

दृष्ट लागावी असंच सगळं. शंतनू उच्चशिक्षित, बड्या कंपनीत मोठ्या हुद्दयाची नोकरी. शाल्मली ही उच्चशिक्षित पण नोकरी न करणारी. लग्न करताना त्याने तसं आधीच सांगितलं होतं. तिलाही त्यात काही वावगं वाटलं नव्हतं. शिवाय त्याच्या हुद्द्याला साजेशा पार्ट्या ऑरगनाईज करणे, उत्तम पद्धतीने पाहुण्याना एंटरटेन करणे, घरादाराची नीट काळजी घेणे, ही वरवर साधी वाटणारी पण त्याच्या स्वत:च्या आणि नोकरीच्या दृष्टीने लांबवर परिणाम करणारी कामे ती

लीलया पार पाडत होती. त्याला तिचा, तिच्या सौंदर्याचा सार्थ अभिमान होता. कोणत्याही पार्टीत हे दोघे आले की सर्वांच्याच नजरा यांच्याकडे वळत आणि त्याची आधीचीच रूंद छाती अधिकच रुंदावे. सहकाऱ्यांच्या डोळ्यातील हेवा त्याला सुखावून जाई.

ही बंगली थंड हवेच्या ठिकाणी खास विकत घेतलेली, सुटीचे दिवस निवांतपणे घालवण्यासाठी. शहरात मात्र पेंटहाऊस होते. सर्व सुविधांनी सुसज्ज. सध्या दोघे आठवडाभरासाठी आले होते इथे. लग्नानंतर ही हनीमूनला इथेच आलेले. शंतनू म्हणालेला “तुला अख्खं जग फिरवेन. पण आत्ताचे हे सोनेरी दिवस उगाच प्रवासात आणि फिरण्यात कशाला वाया घालवायचे?” शाल्मलीनेही लाजून होकार भरला होता. तेव्हाच्या सोनेरी सुगंधी आठवणी अजूनही दोघांच्या मनात ताज्या होत्या. ते दिवस पुन्हा नव्याने जगण्याची ओढ दोघांनाही होती.

दुपारचा चहा घेत दोघे बसले असता, शंतनू अचानक म्हणाला, "मुलगाच हवा. एकच मूल हवय मला. अतिशय पद्धतशीरपणे वाढवायचं त्याला. त्याच्याकडे पाहूनच लोकांनी माझ्या भाग्याचा हेवा करायला हवा." शाल्मली क्षणभर पाहतच राहिली. मग म्हणाली “दोन हवीत मग, कारण मला मुलगी हवीय." "वेडी आहेस का? एक मूल झाल्यावर बाई परत लगेच स्वत:ला पूर्ववत शेपमधे आणू शकते. दोन पोरं झाल्यावर मात्र संपलंच तारूण्य तुझं, लक्षात ठेव, मला बेढब

बायको मुळीच नकोय हं." असं म्हणून तो नेहमीप्रमाणे गडगडाटी हसला. पण नेहमीप्रमाणे आज मात्र ती सहभागी नाही होऊ शकली त्याच्या हसण्यात. अज्ञात शंकेची पाल चुकचुकली तिच्या मनात.

त्यानंतर परत तो विषय निघालाच नाही. राहिलेले दिवस मस्त एन्जॉय करून दोघे शहरी परतले.

शंतनू, एकुलता एक, लाडाकोडात पण शिस्तीत वाढलेला. मनात येईल ते मिळत असतानाच यश मिळालंच पाहिजे हे मनावर बिंबवलं गेलेलं. त्यानेही जिद्दीने ते मिळवलेलं. स्वत:च्या कर्तृत्वावर प्रचंड विश्वास. 'लाथ मारेन तिथे पाणी काढेन' हा आत्मविश्वास आणि त्याला अफाट महत्वाकांक्षेची जोड.

शाल्मली शांत, काहीशी अबोल. निसर्ग, प्राणी, पक्षी, यांत रमणारी. भावंडात मधली आणि कदाचित म्हणूनच समजूतदार.

आई म्हणे, "ही माझी पोर पाण्यासारखी आहे ज्यात मिसळेल तो रंग, गंध, चढेल तिच्यावर." तसंच झालं. एकदा मनाने आपलं म्हणल्यावर तिने त्याची सगळी स्वप्नं आपली मानली. त्याच्या प्रगतीला पोषक, जे जे गरजेचे होते ते ते करत राहिली. स्वत:ची आवड निवड संपूर्ण बाजूला ठेवून त्याच्या स्वप्नात रममाण झाली. हे करत असताना मनात कोणतीही असमाधानाची भावना नव्हती, कारण तिने

स्वेच्छेने हे करायचं ठरवलं होतं. शिवाय तो ही सर्वतोपरी जपतच होता तिला.

शहरातल्या घरच्या गच्चीत तिने छोटीशी बाग केली होती. तिने विषय काढल्याबरोबर शंतनूने तिला ऑनलाईन, झाडं, खतं, अवजारं खरेदीच्या साईट्स, वगैरे सगळं दाखवलं, तसंच लगेच माळयाची अॅड देऊया म्हणाला. ती म्हणाली "बघते रे मी. तू नको टेंशन घेऊस." मग एक दिवस ती मोहिमेवर निघाली. सोसायटीच्या माळ्याला हाताशी धरून काही फांद्या, रोपं, बिया घेऊन आली. शेजारच्या नर्सरीतून मातीच्या कुंड्या आणल्या. आणि पद्धतशीरपणे मांडी घालून कुंड्या भरण्याच्या कामात गढून गेली. हा आला तेव्हा त्याला ती अशी दिसली, जमिनीवर बसलेली, हात चिखलात, आसपास फांद्या, रोपं, पसरलेली.

"अगं काय हे दरिद्री शौक तुझे? माळ्याला बोलवून करून घे ही घाणेरडी कामं. कसला भयंकर वास आहे त्या मातीचा? छया! उठ, उठ, हात धुऊन घे."

शाल्मली प्रथम दचकलीच. 'केवढ्यांदा ओरडला हा.' मग तिने शांतपणे सगळा पसारा आवरला. हातपाय स्वच्छ केले आणि चहा करायला गेली. मनात म्हणाली 'मातीत हात कोपरापर्यंत बुडवून काम करण्याची मजा तुला नाहीच कळायची!'

मग हळू हळू तिला शंतनूच्या स्वभावातले असे अनेक कंगोरे दिसू लागले जे आधी कधीच जाणवले नव्हते.

सुट्टीवरून परत आले दोघे. बाथरूमच्या खिडकीत बाहेरच्या बाजूला कबुतराने घरटं करून पिल्लं नुकतीच अंड्यातून बाहेर पडून चिवचिवत होती. शाल्मली बाहेर येऊन म्हणाली "अरे बघ तरी केवढीशी आहेत ती कबुतराची पिल्लं"

"कबुतर? कुठाय? काय वैताग आहे?" असं म्हणत त्याने एका झटक्यात काचेची खिडकी बाहेर ढकलली. "अरे अरे पिल्लं, पडलं ना घरटं खाली, अरे मेली ना रे, एवढेसे जीव ते, " तिच्या आवाजात राग, संताप, दु:ख, अगतिकता, सगळंच दाटून आलं. चेहरा आक्रसून गेला. "का केलंस असं? "

"इमोशनल फूल, अगं कसली घाण करतात ही कबुतरं! "

"अरे, कबुतरांना हुसकावून लावणं निराळं आणि त्यांच्या पिल्लांना मारून टाकायचं म्हणजे? "

"ए, अगं, चल, सुट्टीचा शेवटचा दिवस, चल तुला मस्त बाहेर जेवायला घेऊन जातो, मॅडमचा मूड एकदम बदलेल."

तिने नुसतं त्याच्याकडे पाहिलं. कुठेतरी काहीतरी चुकतच होतं.

आत आत कुठेतरी काहीतरी तुटत तुटत गेलं तिच्या. कसं समजवायचं? इतकी कशी संवेदनशीलता कमी? एक ना अनेक प्रश्नांनी काहूर माजवलं तिच्या मनात.

"घरीच करते काहीतरी. आता बाहेर नको." ती एवढंच बोलून किचनकडे वळली.

त्याच्या दृष्टीने विषय संपला होता. शीळ घालत तो बाहेर आला.

कबुतरीण खिडकीजवळ येऊन जोरजोरात पंख फडफडवू लागली!

फेकले गेलेले कोवळे जीव, पिलांसाठी तडफडणारी कबुतरांची जोडी, आणि त्याची क्रूरतेकडे झुकणारी असंवेदनशीलता... सगळंच जसं दाटून आलं तिच्या मनात.

दुसरे दिवशी नेहमीचं रुटीन सुरू झालं पण हिचं चित्त थाऱ्यावर नव्हतं. असं कसं चालणार, हा प्रश्न भेडसावत होता. ‘कसं समजंवावं? काय सांगावं?’

असेच काही दिवस गेले. कामात पूर्णपणे बुडालेल्या शंतनूला हिच्यातला बदल कळत नकळत जाणवला पण कामाच्या रेट्यात तो विसरूनही गेला.

अचानक एक दिवस तो ऑफिसला गेल्यावर हिला अस्वस्थ वाटू लागलं, काही सुचेना. फोन करावा का? पण नकोच. कामात असेल. ड्रायव्हरला गाडी काढायला सांगितली आणि डॉक्टरकडे गेली.

डॉक्टरांनी काही टेस्टस् सांगितल्या करायला. नर्सने सॅम्पल्स घेतली. बाकी तपासणी झाली. संध्याकाळी फोन केलात तरी चालेल, फोनवरच बोलू म्हणाले.

ही घरी आली. अशक्तपणा वाटतच होता. झोपून गेली.

जाग आली तेव्हा जोरजोरात बेल वाजत होती. उठून दार उघडेपर्यंत तो स्वत:कडच्या किल्लीने लॅच उघडून आत आला.

आल्या आल्या चक्क त्याने तिला उचलून घेतले आणि गरगर फिरवले. मग अलगद खाली ठेवून म्हणाला "डॉक्टरांचा फोन आला आणि निघालोच. मला का नाही फोन केलास? मला तुझ्या तोंडून ऐकायला आवडलं असतं ना. आणि एकटी का गेलीस? मी नसतं का नेलं? "

हिला प्रथम काही कळेचना. मग म्हणाला "मुलगाच ना? " आणि हिच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. "अरे कसं शक्य आहे? परवा परवा तर... " मग लक्षात आलं महिना केव्हाच उलटून गेला. आपलं लक्षच कुठे होतं."काय म्हणाले डॉक्टर? "

"हेच की मि. राजाध्यक्ष अभिनंदन! तुम्ही बाप होणार आहात."

त्याचं हास्य रुंदावलं. हिलाही काय बोलावं कळेना. मनात हरखूनच गेली. त्याने जवळ घेतली, म्हणाला "आता अजिबात हालचाल करायची नाही. सगळ्या कामाना बाई लाव. मी आठवड्यातून तीन दिवस घरून काम करेन. मला डे वन पासून माझ्या मुलाबरोबर राहायचंय. ही शुड नो ही ईज माय सन! "

इतक्या दिवसाचं मळभ काही प्रमाणात का होईना मनावरून दूर झालं.

"उद्याची अपॉईंटमेंट दिलीय डॉक्टरांनी. आपण जाऊ. मी रजाच टाकलीय दोन दिवस."

लहान मुलासारखा तो तिच्या अवती भवती करत होता. "आज तुझं काही ऐकणार नाही मी. मस्त बाहेर पडू. तुझ्यासाठी शॉपिंग करू. मग मस्त कुठेतरी डिनर !"

शाल्मली नुसती पाहत राहिली. सुखावत राहिली. शंका कुशंका निवल्या. परत सगळं जग सुंदर भासू लागलं.

दुसरे दिवशी डॉक्टरांनी नीट समजावून दिलं सगळं. काय काळज्या घ्यायच्या, खाणं, पिणं, औषध पाणी, डूज आणि डोन्टस्.

हा सगळं टॅबवर नोट डाऊन करत होता. हिला हसूच येत होतं, जसं काही हे एक प्रोजेक्टच होतं त्याच्यासाठी. पण सगळयात महत्वाचं प्रोजेक्ट.

रात्री सगळ्यांना फोन केले यानेच उत्साहाने. आपल्या आईवडिलांना, तिच्या आईवडिलांना! सगळीकडे आनंदी आनंद होणं स्वाभाविकच होतं.

लगेच सगळे येऊन भेटून गेले. आई म्हणाली "थोडे दिवस नेते हिला घरी."तर म्हणाला, "तुम्हीच रहा इथे. मलाही माझ्या मुलाबरोबर राहायचंय." सगळ्यांना जावयांचं कोण कौतुक वाटलं. आई राहिली काही दिवस. जावयाचं मुलीवरचं प्रेम पाहून भरून पावली. माझ्या गुणी मुलीला अगदी योग्य साथीदार मिळाला असं जाऊन सगळ्यांना सांगू लागली.

दिवस कसे पंख फुटल्यासारखे भराभर ऊडून गेले. बघता बघता सातवा महिना लागला. “आतातरी नेते” म्हणाली आई. त्यावर "तुम्ही इकडे येऊन रहा. इथे उत्तम सोय आहे " असं म्हणाला. लाडक्या जावयाचं मन मोडणं शक्यच नव्हतं. आई येऊन राहिली.

आता बाळाच्या लाथांनी ही हैराण होत होती. डॉक्टरांनी सोनोग्राफी करताना याला आत बोलावून बाळ दाखवलं तेव्हा लहान मुलासारखा हरखून गेला. मग डॉक्टर बाहेर गेल्यावर त्याने नर्सबरोबर काही बातचित केली आणि त्याच्या आनंदाला पारावार उरला नाही.

गाडीत बसल्या बसल्याच म्हणाला हळूच कानात "मुलगाच आहे." ही आश्चर्याने पाहू लागली. "तुला कसं कळलं? "

" मला मागच्या वेळेसच कळलेलं. तुला आज सांगतोय. नर्सला पैसे देऊन ठेवलेले मी हे सांगण्यासाठी."

" आणि मुलगी असती तर काय फरक होता? बाळ सुखरुप असणं महत्वाचं."शाल्मली म्हणाली

"मुलगाच होणार माहित होतं मला." शंतनू हसत हसत म्हणाला.

तिने पुढे विषय वाढवला नाही.

दिवस भरत आले. आता जरा ती जडावली. कधी मोकळी होतेय असं झालं तिला. हा जीवापाड जपू लागला.

दिवस भरण्यापूर्वीच काही दिवस पोटात दुखायला लागलं म्हणून हॉस्पिटलमधे गेले तर डॉक्टर म्हणाले काही तासात होईल मोकळी. मग जरा गडबड झाली. पण सुखरुप सुटका झाली. गोजिरवाणं बाळ नर्सने हातात दिलं तेव्हा काय वाटलं ते सांगणं तिला कधीच जमलं नसतं बहुतेक. हा लहान मुलासारखा हरखला. सगळ्यांना फोन करून झाले. मित्रांनी ओढून सोबत नेले.

आई हिच्या सोबत होतीच.

सर्व डॉक्टर्सनी हिला आणि बाळाला तपासलं. ऑल वेल म्हणाले.

बाळाच्या जावळावर हात फिरवताना तिचा उर भरून आला. जगातल्या अत्युच्च आनंदाची ती धनीण होती आज.

रात्री दोघही छान झोपली. पहाटे अचानक कसला तरी जोरात आवाज आला आणि ही दचकून उठली. बाळ मात्र शांत झोपलं होतं. हिला हायसं वाटलं.

मित्रांच्या तावडीतून सुटका करून घेत हा रात्री हॉस्पिटलमधे आला पण आईने त्याला घरी जाऊन विश्रांती घेण्यास सांगितले.

दुसरे दिवशी परत डॉक्टरांची टीम राऊंडला आली. बाळ झोपलेलं. एका नर्सने चुकून पाळण्याशेजारी पाण्याचा ग्लास पाडला. जोरात आवाज झाला. बाळ दचकेल असं वाटून आई पट्कन पाळण्याजवळ गेली पण बाळ शांत झोपलेलं. मुख्य डॉक्टरांची नेत्रपल्लवी झाली. पण ऑल इज वेल असं म्हणत ते बाहेर पडले.

डॉक्टर बाहेर पडल्या पडल्या आईने आणखी मोठा आवाज पाळण्याजवळ स्टूल आपटून केला. परत परत केला. बाळ जराही चाळवलं नाही. शांत झोपलेलं होतं. आईने त्याच्या कानाशी टाळ्या वाजवल्या, जोरजोरात डब्यावर चमचा आपटून पाहिला. एव्हाना हिला

साधारण कल्पना आली. आई नक्की काय तपासत होती ते. जीवच धास्तावला तिचा.

तिने डॉक्टरांना ताबडतोब बोलावून घेण्यास नर्सला सांगितले. डॉक्टर आल्यावर तिने सरळच विचारले, तेव्हा डॉक्टर घसा खाकरत म्हणाले हो तशी थोडी शंका वाटतेय पण एकदम निष्कर्ष नाही काढता येणार. मी तज्ञाना बोलावलय. दुपारपर्यंत येतील ते. पण बाळाला ऐकू येत नाही हे ती कळून चुकली. तिची बाळावरची माया अधिकच दाट झाली.

तज्ञ आले, त्यांनी तपासले, "प्राथमिक तपासणीत काहीतरी श्रवणात बिघाड आहे पण आत्ताच काही नक्की निष्कर्ष नाही काढता येणार. इट्स टू अरली" म्हणाले. 'शिवाय काही समस्या असेलच तर हल्ली अनेक उपाय आहेत' हे ही सांगून गेले.

हिचा जीव अधिकच धास्तावला. तिने पाळण्यातून बाळाला आपल्या कुशीत घेतले. आता ती त्याला क्षणभरही दूर ठेवण्यास तयार होईना.

विचार करता करता तिचा डोळा लागला. जाग आली ती कोणाच्या तरी जोरजोरात ओरडण्याने. मग लक्षात आलं हा तर शंतनूचाच आवाज. हडबडून उठली. तेवढ्यात तावातावाने ओरडत हा पुढे आणि डॉक्टर्स मागे असे खोलीत शिरले.

“काय करता काय तुम्ही डॉक्टर्स? असं होऊच कसं शकतं? तुम्हीच हलगर्जीपणा केलाय काहीतरी. सोडणार नाही मी तुम्हाला. खडी फोडायला पाठवेन!”

“अरे शांत हो. शांत हो. काय करतो आहेस?”

“अगं काय सांगताहेत बघ, माझ्या मुलाला हियरींग इमपेअरमेंट असू शकते म्हणे! कशी असेल? यांनीच काहीतरी गडबड केली असणार डिलीव्हरीच्या वेळेस. सोडणार नाही मी यांना. चल निघुया आपण.”

“अरे थांब. असा आततायीपणा करू नकोस. आई त्याला घरी ने.”

शेवटी कसाबसा आईने त्याला घरी नेले. इकडे डॉक्टरांनी तिला बऱ्याच गोष्टी समजावल्या. टेस्टस् बद्दल माहिती दिली. कधी करायच्या वगैरे समजावून सांगितलं.

शेवटी बऱ्याच टेस्टसनंतर डिस्चार्ज मिळाला. आई न्यायला आली. गप्प गप्पच होती. दोघी ड्रायव्हर बरोबर घरी आल्या.

इकडे सासुसासरे, वडिलही पोहोचले होते. सगळ्यांचे चेहरे उतरले होते. शंतनू कुठे दिसत नव्हता. ‘ऑफिसमधे जावं लागलं’ असं मोघम म्हणाल्या सासूबाई. शाल्मली पण दमली होती. जाऊन झोपली. बाळही झोपलं होत रस्त्यातच.

जाग आली तेव्हा तिला आईच्या मुसमुसण्याचा आवाज आला. सावकाश उठून बाहेर येत होती तेवढ्यात आईचे शब्द कानी आले, "माझी पोर जीवंतपणे मरण भोगेल हो अशाने. "

क्षणभर हिला काहीच अर्थबोध होईना. तेवढ्यात त्याचा आवाज आला, "दुसरं मूल झालं की सावरेल ती. मी हे असं बधीर मूल मुळीच इथे ठेवून घेणार नाही. सगळे कीव करतील माझी. आजपर्यंत लोकांनी फक्त हेवा करावा असाच जगलोय मी. आता हे गालबोट नकोय मला. बाळंतपणात बाळ गेलं असं सांगेन मी. तुम्ही त्या पोराला न्या तुमच्या बरोबर. जितकं लवकर न्याल तेवढी लवकर विसरेल ती त्याला. त्याची सगळी आर्थिक जबाबदारी माझी. पण बाकी कोणताही संपर्क नकोय त्याचा."

ही दारातच थिजली.

कबुतराची निष्पाप पिल्लं आठवली तिला. केवळ घाण होते म्हणून ढकलून दिलेली याने खाली. तेव्हाच कळायला हवं होतं आपल्याला.

शांतपणे बाहेर आली. हा झट्कन पुढे झाला. "अगं तू का उठून आलीस? मला हाक मारायचीस ना? उगाच दगदग करू नकोस."

तिने एकदा नजर फिरवली सगळ्यांवरून. तिच्या नजरेतला अर्थ समजून सर्वांनीच माना खाली घातल्या.

मग त्याच्याकडे वळून म्हणाली, "मी आईबाबांबरोबर जातेय, कायमची, बाळाला घेऊन. तुझ्यासारख्या माणसाची सावलीही नकोय पडायला मला माझ्या बाळावर. त्याचं दुर्दैव की तो तुझे जीन्स घेऊन जन्मला. पण यापुढे नकोय तुझा सहवास त्याला मिळायला."

“अगं काहीही काय बोलतेस? तू मला सोडून जाणार? लोक काय म्हणतील? आपण त्याला उत्तम शाळेत घालू. तुझे आईवडील असतीलच. बस फक्त इथे आपल्या बरोबर नको म्हणतोय मी.”

ती अचानक खदखदून हसली. सगळेच दचकले.

"घाबरू नका. डोक्यावर परिणाम नाही झाला माझ्या. आज खरी बरी झाले मी याच्यावरच्या प्रेमाच्या आजारातून. अरे तुला कळतंय का? समस्या माझ्या बाळात नाही. समस्या तुझ्या मानसिक जडण घडणीत आहे. तुझा बुध्यांक फक्त वाढीव आहे. तुझी भावनिक वाढ झालीच नाही कधी. बाग सुंदर हवी, पण हात नाही घाण करायचे. बायको सुंदर राहावी म्हणून एकच मुल हवं. लोकांनी हेवा करावा म्हणून मुलगाच हवा, तो ही हुशार, देखणा, सर्वगुणसंपन्न. जरा घाण करतात

म्हणून तू कोवळ्या पिलांना मारून टाकायला मागे पुढे नाही पहाणार. मुलगा, जो येणार म्हणून नाचत होतास कालपर्यंत तो केवळ कर्णबधीर असण्याची शक्यता निर्माण झाली तर कायमचा तोडायला तयार त्याच्याशी नातं?"

"सोनोग्राफीत मुलगी आहे असं कळलं असतं तर तो जीव जगात येण्यापूर्वीच मारून टाकला असतास कदाचित.

"खरं सांगू तुझा राग नाही येत मला. कीव वाटतेय. जी कीव लोकांनी करू नये म्हणून आटापिटा चाललाय ना ती कीव आज तुझ्या बायकोलाच तुझ्याबद्दल वाटतेय. तुला मानसोपचाराची गरज आहे. तो उपचार तू घ्यावास. आज तुझे सगळे विचार 'मी', "माझे, " "मला, " या तीनच गोष्टींभोवती फिरताहेत. घाण्याच्या बैलासारखा फिरतो आहेस गरगर गरगर यांच्याभोवती. या तीन गोष्टीतून बाहेर पड आणि बघ कितिक खऱ्या सुंदर गोष्टी दिसतात ते."

"बाबा गाडी बोलवा भाड्याची. लगेच निघू. काळजी करू नका. मी खंबीर आहे माझ्या बाळाला उत्तम आयुष्य मिळवून द्यायला."

सासू सासऱ्यांकडे वळून म्हणाली "बघा सांभाळता आलं याला तर."

तिने झिडकारल्याचा अपमान, ती सोडून जाण्याने होणारी मानहानी, दुखावलेला इगो, आणि हिच्याशिवाय राहण्याच्या कल्पनेने आलेली अगतिकता, सरसर त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत गेले.

आपण केलेल्या चुका, हो आज प्रथमच त्याला त्या चुका वाटल्या, त्यांची जाणीव, मन जाळत गेली. आता ती निर्णय बदलणार नाही हे ही लक्षात आलं त्याच्या. क्षणात आपण सगळंच गमावलंय ही समज आली. पण आता खूप उशीर झाला होता. शिवाय अजूनही मूकबधीर मुलाला 'आपला' म्हणून वाढवण्याची तयारी नव्हतीच मनाची .

# 2

शाल्मली भराभर आवरत होती. एकीकडे दिवसभर ऑफिसमधे होणाऱ्या मिटींग्ज, त्यासाठीची तिची झालेली, राहीलेली तयारी, यांची मनातल्या मनात उजळणी सुरू होती, तर दुसरीकडे हात स्वैपाकघरात अत्यंत सराईतपणे चालत होते.

दोन दिवसांच्या श्रीशला घेऊन, वर्षभरापूर्वी शंतनूला कायमचं सोडून जेव्हा ती आईबाबांबरोबर निघाली तेव्हा मनात प्रचंड काहूर होतं. भविष्यात काय लिहून ठेवलंय याचा अंदाज नव्हता. पदरी श्रुती नसलेलं दोन दिवसाचं बाळ, ना नोकरी ना पैसा. आईवडिलांचा आधार काही काळापुरताच घ्यायचा हे मात्र तिने तेव्हाही ठामपणे ठरवलं होतं. नाही म्हणायला शिक्षण मात्र होतं, उत्तम मार्कांची डिग्री होती. पण नोकरी मिळेल? राहायचं कुठे? आईवडिल, भाऊवहिनी, त्याची दोन मुलं यांना त्यांची जागा पुरत होती. पण आणखी दोन माणसं कायमची राहायची तर जरा अडचण होणार हे नक्की होतं. पण सध्या काही महिने इलाज नव्हता.

श्रीश महिन्याचा होईपर्यंत तिने संपूर्ण विश्रांती घेतली. भाऊ वहिनींनी मनापासून तिला हे घर तुझंच आहे असं सांगितलं आणि तसे

वागलेही. श्रीश तर घरात सगळ्यांच्याच गळ्यातला ताईत बनला. महिना पूर्ण झाल्याबरोबर मात्र तिने भराभर फोन फिरवायला सुरवात केली. कॉलेजमधल्या मित्र मैत्रिणी, टीचर्स, आधी जिथे कोर्स करताना ट्रेनी म्हणून तीन महिने काम केलं होतं त्या कंपनीत, सगळीकडे फोन केले.

पुढचा एक महिना अर्ज पाठवणे, जाऊन भेटणे वगैरेत पार पडला. आणि जिथे ट्रेनी म्हणून काम केलं होतं, तिथेच नोकरीचंही पक्कं झालं. बाकी दोन ठिकाणी देखील नोकरी मिळत होती, पण या कंपनीत कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठीचं पाळणाघर होतं. अर्थातच शाल्मलीने याच नोकरीची निवड केली. आता निदान दिवसातून तीन चार वेळा ती श्रीशला पाहून येऊ शकणार होती. त्याच्या दुधाच्या वेळाही जमवू शकणार होती.

पुढच्या एक तारखेला ती नोकरीत रुजू झाली.

सुरवातीचे काही दिवस जुळवा जुळवीत गेले. आणि मग हळूहळू घडी बसत गेली. काहीच महिन्यांपूर्वी शेजारच्या काकूंचा मुलगा अमेरिकेहून आला आणि त्याने मोठी जागा घेऊन काकूंना आपल्या बरोबर नेले. तेव्हा शाल्मलीने जागा भाड्याने मागितली आणि त्यानेही ओळखीत जागा भाड्याने जातेय म्हटल्यावर आनंदाने दिली.

शाल्मलीचा नवा संसार सुरू झाला. ती आणि श्रीश असा. स्वभावाप्रमाणे संपूर्ण जीव ओतून तीने ही नवी घडी बसवली. आज सहा सात महिन्यात ती बॉसचा उजवा हात, सहकाऱ्यात प्रिय, कामचुकार सहकाऱ्यांसाठी डोकेदुखी आणि असूयेचा विषय बनली होती.

तिने आपल्या सद्यस्थितीचे कधी भांडवलही केले नाही पण ती लपवूनही ठेवली नाही. अर्जातच तिने पतीपासून विभक्त झाल्याचे तिथल्या रकान्यात भरले होते.

लग्न मोडले नव्हते कारण दोन्ही बाजूंनी कोणीच हालचाल केली नव्हती.

नुकताच संध्याकाळचा मूकबधीर मुलांशी कसे संभाषण करावे हे शिकवणारा वर्ग तिने लावला होता. श्रीश अजून जेमतेम वर्षाचा होत होता. पण तिला पूर्वतयारी करणे नेहमीच आवडे त्याचाच हा भाग होता. आंतरजालावर तर हा विषय तिने पिंजून काढला होता. इतर सर्व बाबतीत श्रीश नॉर्मल प्रगती दाखवत होता आणि त्याचा भरपूर आनंद शाल्मलीला देत होता. तिचं आणि त्याचं आता एक वेगळंच विश्व बनलं होतं.

---------------

दार उघडून शंतनू आत आला. पाय लडखडत होते. पोटात सकाळपासून अन्नाचा कणही नव्हता. फ्रीजमधून पाण्याची बाटली काढली ती रिकामी होती. दारूचा अम्मल होता पण पोटातल्या भुकेने, तहानेने जीव कासावीस झालेला. आज वर्ष झालं हे असंच सुरू होतं.

शाल्मली आणि तिचे आई बाबा बाळाला घेऊन निघून गेले. आयुष्यात पहिल्यांदाच शंतनू हतबुद्ध होऊन किती तरी वेळ बसून राहिला. आज नेहमीसारखा त्याच्याकडे प्लॅन बी नव्हता. शंतनूचे आई वडील ही काहीच न सुचून बसून राहिले. बऱ्याच वेळाने तो उठला आणि बाहेर पडला. काल परवा मुलगा झाला म्हणून ज्या मित्रांनी ओढून पार्टीला नेलं त्या मित्रांकडे जाणं शक्य नव्हतं. शाल्मली सोडून गेली आणि सगळीच दारं जणू बंद झाली.

वर्ष उलटलं पण शंतनू काही सावरला नाही.

शाल्मली... माझी लाडकी शाल्मली ... माझा गुरूर... माझा शब्द न् शब्द झेलणारी, माझी प्रत्येक गरज न सांगताच कळणारी, सरळ मला सोडून गेली???? कोणासाठी? त्या काल जन्माला आलेल्या अधू मुलासाठी? एक दिवसाच्या नात्यासाठी इतक्या वर्षांचं नातं क्षणात तोडून गेली?

अचानक शंतनू सगळी शक्ती गेल्यासारखा मट्कन खाली बसला, हमसून हमसून रडायला लागला लहान मुलासारखा. रडता रडता

जमिनीवर आडवा झाला आणि नशेने आणि निद्रेने त्याला आपल्या कवेत घेतले.

वर्षभरात सैरभैर झालेला शंतनू कामाच्या ठिकाणी ही हा धक्का लपवू शकला नव्हता. जी कीव लोकांनी करू नये म्हणून आटापीटा केला ती कीव याची ही अवस्था बघून जो तो करू लागला. केवळ आधीचा त्याचा परफॉर्मन्स लक्षात घेऊन नोकरीवरून कमी केले नव्हते एवढंच.

पण शंतनूला त्याची काही फिकीरच उरली नव्हती. तो सतत दारूच्या नशेत राहणे पसंत करत होता. सुरवातीचे काही दिवस आई वडीलांनी समजावण्याचा, सावरण्याचा प्रयत्न केला पण नंतर ते ही हताश झाले. आपल्या गावी निघून गेले.

वर्षभरापूर्वीचा हाच तो रुबाबदार, देखणा, कर्तृत्ववान शंतनू हे सांगूनही कोणाला खरं वाटलं नसतं.

----------------

शाल्मलीने श्रीशच्या अंगावरचं दुपटं सारखं केलं आणि ती बेडवर त्याच्या शेजारी आडवी झाली. दिवस कसा पंख लावल्यागत निघून जाई पण रात्र मात्र पायतुटक्या कुत्र्यागत सरपटत राही. नकळत शंतनूच्या बलदंड बाहूंची तिला आठवण होई. क्षणात मन खाडकन

तिला चपराक देई, ‘लाज नाही वाटत त्या नीच माणसाची आठवण काढायला? इतकी शरीराची भूक त्रास देतेय? ज्या माणसाने तुझ्या मुलाचं अस्तित्व नाकारलं त्याची आठवण काढतेस?’ दुसरं मन म्हणे, ‘तो कसाही असला तरी मी तर खरंच प्रेम केलं ना त्याच्यावर. माझ्या प्रेमात काय खोट होती म्हणून हे असं व्हावं?’ उलट सुलट विचार, कोलाहल उठवित मनात. ऑफिसमधे ही एकटी आहे कळल्यानंतरही निरनिराळ्या गोष्टींना तोंड द्यावं लागे. कोणी सहानुभुतीतून सलगी करू पाही, नकळत झाल्यासारखे स्पर्श पण सहेतुक असत, कोणी ‘असेलच काहीतरी भानगड’ असे पाहत. अशा वेळेस सौंदर्य हा गूण न बनता शाप बनतो हे ही तिच्या लवकरच लक्षात आलं. तिने मग तिच्या राहणीमानात बदल केले . सलवार कुडते दोन साईज मोठे खरेदी करू लागली. केस चापून चोपून घट्ट मागे बांधून टाकू लागली. माफक मेकअपला कायमचा फाटा दिला.

सुदैवाने ज्यांच्या हाताखाली ट्रेनी म्हणून हिने काम केले तेच सध्या तिचे वरीष्ठ होते आणि प्रथमपासूनच त्यांच्या मुलीच्या वयाच्या शाल्मलीच्या गुणांना ते ओळखून असल्याने ते तिला बरंच सांभाळून घेत होते आणि मदतही करत होते. पण लवकरच ते निवृत्त होणार होते आणि नवीन माणूस त्यांच्या जागी रुजू व्हायचा होता.

----------------------

शंतनूला सकाळी जाग आली तिच मुळी पोटात होणाऱ्या प्रचंड मळमळीने. उठला आणि धडपडत कसाबसा बाथरूमपर्यंत गेला. भडाभडा पित्त उलटून पडलं. सगळी दुर्गंधी सुटली घरभर. मोठ्या निकराने तोंड धुवून बाहेर आला.

येऊन सोफ्यावर आडवा तिडवा पसरला. पुन्हा जाग आली तेव्हा दुपारचे १२ वाजून गेलेले. या आठवड्यात तिसऱ्यांदा न सांगता दांडी झाली त्याची.

शंतनूने खोलीत नजर फिरवली. ठिकठिकाणी कपड्यांचे बोळे, काढून फेकलेले बूट मोजे, बाहेरून मागवलेल्या अन्नाचे अर्धवट खाऊन टाकलेले बॉक्सेस, दारूच्या बाटल्या, ग्लासेस, कोपऱ्यात जाळ्या जळमटं, सगळीकडे इंचभर धूळ, उकिरडा झाला होता घराचा. पैशांच्या आशेने कामवाली बाई सहा सात महिने येत होती पण एकदा याला घरी तर्र होऊन बसलेला पाहून घाबरली आणि तिनेही येणे सोडले. तेव्हापासून घरावर कसलाच स्वच्छतेचा संस्कार झाला नव्हता.

"काय करून घेतलंस हे शंतनू? " त्याच्या कानात शाल्मलीचा आवाज घुमला. दचकून पाहिलं त्याने इकडे तिकडे. ती गेलीय कायमची हे अजूनही वळत नव्हतं. पण आज पहिल्यांदाच निदान त्याचं लक्ष त्याच्या स्वत:कडे गेलं होतं.

उठून त्याने फ्रिज शोधला. केव्हातरी आणून ठेवलेली दुधाची पिशवी दिसली. तसंच थंड पिणार होता पण मग आठवलं, शाल्मली कध्धी पिऊ द्यायची नाही कच्चं दूध. मग काढून कपात ओतलं. मायक्रोवेव्हमधे गरम करायला ठेवलं. दात घासून आला . केव्हातरी आणून ठेवलेला बिस्कीटाचा पुडा सापडला. मग दुध बिस्किटं खाल्ली. जरा जीवात जीव आला त्याचा. उठून गॅलरीत आला. शाल्मलीची बाग वाळून गेली होती. कुंड्या तेवढ्या उरल्या होत्या. काय वाटलं कोणास ठाऊक, आतून एक बादलीभर पाणी आणून सगळ्या कुंड्यांना घातलं. तापलेल्या मातीवर पाणी पडताक्षणी मृदगंध दरवळला. खोल भरून घेतला त्याने तो उरात.

‘एके काळी किती ओरडायचो आपण तिच्यावर... मातीत हात घालून बसते म्हणून, त्याला आठवलं. आपण एवढे हिशेबी, भावनांना सतत चार हात लांब ठेवून जगत आलो. लग्नही केलं ते सर्व आपल्या पुढच्या आयुष्याला पूरक असं पाहून . पण ही इतकी कशी भिनली आपल्या रक्तात? कसं जमवलं तिने? मनाची बंद करून घेतलेली कवाडं सताड उघडून आत ठाण मांडून अशी बसली की प्रत्यक्षात आयुष्यातून निघून गेली तरी मनातून काढणं जमत नाही आपल्याला. असं काय होतं तिच्यात? खरंच काय होतं?’

सगळंच दाटून आलं शंतनूच्या मनात. एवढ्यात एक चिमणी गवताची काडी घेऊन गच्चीत आली पण याला बघून उडून गेली. लांबूनच मग चिमणा चिमणी चिवचिवत उडत राहिले. याने पाहिलं, वरच्या हॅंगिंग पॉटमधे काही काड्या, अर्धवट बनवलेलं घरटं दिसत होतं. शंतनू झट्कन सवयीने ते काढून टाकायला पुढे झाला आणि तिथेच थबकला. शाल्मलीने कधीच ते घरटं काढलं नसतं. उलट...तो आत आला. त्याने एका पसरट भांड्यात पाणी आणि एका छोट्या थाळीत मगाशी सापडलेली बिस्किटस् ठेवली आणि घेऊन बाहेर आला, गॅलरीत ठेऊन दार लावून आत आला.

मग बराच वेळ तसाच बसून राहिला. बाहेर चिमणा चिमणीची चिव चिव सुरू होती. शंतनूला ती सोबत फार फार हवीशी वाटली त्या क्षणी.

मग सावकाश उठून त्याने घराची स्वच्छता करायला सुरवात केली. तेवढ्यात बेल वाजली. दारात कामवाली बाई उभी. "सायेब पैशे ऱ्हायले माझे द्यायचे, तुमी भेटलाच न्हाईत..." तिची सराईत नजर खोलीत फिरली... "अगं बया.. काय दशा जाली हो... सरा, आजचा दिस देते सोच्छता करून .. मंग द्या माये पैशे" असं म्हणत तिने पदर बांधून कामाला सुरवात केली. शंतनू आपल्या खोलीत गेला. आंघोळ करून स्वच्छ कपडे घालून आला. बाईने तोपर्यंत खोलीचा नूर पार

पालटला होता. ती आता आतल्या खोल्यांकडे वळली. पहाता पहाता घर परत जरा घरासारखं दिसू लागलं.

मग ती जायला निघाली. शंतनूने बरेच पैसे तिच्या हातावर ठेवले. ती म्हणाली "एवढे न्हाईत सायेब. वहिनींबरोबर दोन हजाराची बोली झाली हुती." तो म्हणाला "राहू देत. उद्यापासून परत ये कामाला आणि मला पोळी भाजी पण दे करून. काय उरतात त्यातून सामान आण त्यासाठीचं." ती 'बरं' म्हणाली. नकळत तिचे डोळे पाणावले. "सायेब वहिनी कवा यायच्या?"

शंतनूने नुसती मान हलवली. "कुनाची नदर लागली म्हनावी सोन्यासारक्या संसाराला "असं म्हणत बाई निघाली. "येते सामान घिऊन आन करते चपाती भाजी" म्हणाली.

शंतनूला कित्येक दिवसांनी आज माणसात आल्यासारखं वाटलं. चिमण्यांची चिवचिव सोबत घेऊन तो अल्बम मधले शाल्मलीचे फोटो पाहत बसला. सावकाश तर्जनीने तिच्या क्लोजअप चेहेऱ्याची आऊटलाईन रेखत बसला.

--------------

शाल्मली ची धांदल उडाली होती आज. हात एकीकडे भराभर कामं उरकत होते तर दुसरीकडे डोक्यातले विचार वायुवेगाने भ्रमण करत होते. एरव्हीची शांत शाल्मली आज मात्र जरा धास्तावली होती.

आज श्रीशला तिने आईकडेच सोडायचं ठरवलं. संध्याकाळच्या आधीच्या बॉसचा निवृत्ती समारंभ आणि नव्या बॉसचा स्वागतसमारंभ, असं ऑफिसने एकदमच करायचं ठरवलं होतं. थोडा उशीर होणार होता. शिवाय तिच्यावर कार्यक्रमासाठी काही जबाबदाऱ्या ही सोपवण्यात आल्या होत्या. आधीच्या बॉसनी वडिलकीच्या नात्याने कालच तिला बऱ्याच गोष्टी समजावल्या होत्या. पण ते जाऊन नव्या माणसाबरोबर काम करावं लागणार, याचं नाही म्हटलं तरी तिच्या मनावर दडपण आलंच होतं. सगळी तयारी करून शेवटी ती निघाली. श्रीशला जवळ घेऊन कुरवाळून तिने आईकडे सोपवले. आई म्हणाली जा निवांतपणे. राहातो आमच्याकडे छान तो. ती ही हसली मग आणि निघाली.

# 3

शाल्मली पोहोचली आणि कामात गुरफटून गेली. आधीच्या बॉसच्या बऱ्याच कागदपत्रांवर सह्या घ्यायच्या होत्या. पुढचे काही प्लॅन्स ॲप्रुव्ह करून घ्यायचे होते. नव्या बॉसची फाईल एकदा चाळून पहायची होती. तिने मनातल्या मनात परत स्वत:ला आठवण करून दिली

पहाता पहाता दिवस वर चढला. मग टी ब्रेक नंतर सगळे कॉन्फरन्स हॉलमधे जमा होऊ लागले. शाल्मलीने सर्व व्यवस्थेवर परत एक नजर टाकली.

केटररला सर्व सूचना परत सांगून त्याच्याकडून वदवून घेतले. “तुमी काय बी चिंता करू नको मॅडम, सगलं चोक्कस होनार, मी हाय ना हितच काय बी लागलं तर.” त्याने हसून हामी भरली.

कार्यक्रम सुरू होण्याआधी बरोबर ५ मिनिटं नवे बॉस आधीच्या बॉसच्या केबिनमधे पोहोचल्याची वर्दी ऑफिस बॉय घेऊन आला. म्हणजे कार्यक्रम वेळेत सुरू होणार. तिने सर्वांना बसून घेण्याची विनंती केली.

काहीच मिनिटात दोघे आले. नवे बॉस पहाण्याची सर्वांनाच उत्सुकता होती. प्रशांत ..वय३५, पटकन नजरेत यावी अशी उंची, वर्ण

सावळा, सौम्य पण आत्मविश्वास दर्शवणारे चेहऱ्यावर भाव, आणि अतिशय शांत डोळे. समोरच्याला पट्कन विश्वासात घेणारे.

जाणाऱ्या बॉसनी थोडक्यात प्रशांतची ओळख करून दिली. मग प्रशांत बोलला, त्यात प्रामुख्याने ‘सर्वजण आपापल्या परीने कंपनी साठी कसे महत्वाचे आहेत, निर्णय घ्या, मला फक्त निर्णयाची कल्पना द्या, अगदीच चुकत असेल काही तर मी सांगेनच, पण नवे प्रयोग करताना काही चुकलंच तर तुमच्या बरोबरीने माझी जबाबदारी राहिल,’ असे लोकांना आश्वस्त करणारे मोजके बोलला.

सर्वच जण नव्या बॉस वर खूश झाले. मग चहापाण्याबरोबर सर्वांच्या ओळखी करून देण्याचे काम शाल्मलीवर आले, तिने ते चोख पार पाडले. प्रशांतला आधीच्या बॉस सोबत सोडून ती आपल्या सहकाऱ्यांकडे जाण्यासाठी वळली तेव्हा प्रशांत म्हणाला “ सर्वांची उत्तम ओळख करून दिली, पण एक महत्वाची ओळख राहिली, ” शाल्मलीच्या चेहऱ्यावरचं मोठं प्रश्नचिह्न बघून मग तो खळखळून हसला. “मी प्रशांत, इथे नव्यानेच रुजू होतोय, ” असं म्हणत त्याने हस्तांदोलनासाठी हात पुढे केला आणि थोडिशी चकित, थोडिशी खजिल, होत नकळत शाल्मलीनेही हस्तांदोलनासाठी हात पुढे केला. “ओह, सो सॉरी, शाल्मली, या ऑफिसमधला तुमचा उजवा हात, डोळे, कान.” नकळत शाल्मलीच्या चेहऱ्यावर हसू पसरलं आणि तिच्या गोड खळया अधिकच खोल झाल्या. नंतर किती तरी वेळ प्रशांतच्या मनात त्या घर करून राहिल्या. जेव्हा लक्षात आलं तेव्हा

त्याने चक्क मान हलवली जणू त्या प्रतिमा काढून टाकण्याचा एक केविलवाणा प्रयत्न होता तो.

----------------

अल्बम बराच वेळ पाहून काही वेळाने शंतनू उठला, त्याने तो शाल्मलीचा फोटो अल्बम मधून काढून खिशात ठेवला. बाईला सांगून बाहेर पडला. जवळच्या फोटोलॅबमधे आला. तिथे त्याने तो फोटो मोठा करण्यास दिला. "साहेब फ्रेम पण करायचा का?" " हो, चालेल!"

"साहेब, दोन मिनीटात स्कॅन करून घेतो, म्हणजे ओरिजिनल राहिल तुमच्याचकडे."

शंतनूने फोटो खिशात ठेवला आणि तो परत निघाला. रस्त्यात वाईनशॉप लागलं नेहमीचं, सवयीने पावलं वळली... "काय देऊ साहेब? नेहमीचं?" शंतनू अचानक जागा झाल्यासारखा भानावर आला'नेहमीचं?' या शब्दाने. 'पक्का दारूडा झालो म्हणजे मी. पण दारू सुद्धा तुला विसरवू शकली नाहीच गं!' पटकन हात खिशातल्या फोटोकडे गेला. "नाही, नकोय काही."

शंतनू परत फिरला. दुकानदार पाहत राहिला . 'किती दिवस टिकेल हे?' असा विचार अनुभवाने त्याच्या मनात आलाच शंतनूला पाहून!

-------------------------

शाल्मली घरी परतली तेव्हा जातानाची घालमेल बऱ्याच प्रमाणात कमी झाली होती. एकतर कार्यक्रम व्यवस्थित पार पडला होता आणि नव्या माणसाबद्दल वाटणारी धास्ती प्रशांतला भेटल्यानंतर बरीच कमी झाली होती. तिने आईकडून श्रीशला घेतले आणि घरी आली. रात्री दमणूकीने म्हणा किंवा मन काहीसं शांतावलं म्हणून असेल, झोपेने लगेच कुशीत घेतलं तिला श्रीश सकट.

दुसऱ्या दिवशी ती जरा लवकरच निघाली. ऑफिसमधे आल्यावर तिने सुरेश, जो प्रशांतचा सेक्रेटरी नियुक्त होता, त्याला गाठले. “हे बघ, बॉसची पर्सनल डिटेल्स ची फाईल, आधीच्या सेक्रेटरीकडून मागवली होती. वाचून घे, पण आधी स्ट्रॉंग ब्लॅक कॉफीची ऑर्डर देऊन ठेव. आता चहा नाही, ब्लॅक कॉफी रोज दहाला असं सांगूनच टाक कॅंटीनमधे. बाकी डिटेल्स बघून ठेव.

“ थॅंक यू मॅडम!” सुरेशला या एका छोट्या डिटेलने किती आणि कसा फरक पडणार हे चांगलंच माहित होतं. शाल्मली बरोबर काम करताना त्याला बऱ्याच गोष्टी समजत होत्या, शिकायला मिळत होत्या.

मग तिने त्याला दिवसभराच्या युनिट हेड्स बरोबरच्या मिटींग्जचं श्येड्यूल बनवायला सांगितलं, पण तत्पूर्वीचा एक तास तिच्यासाठी ठेवायला सांगितला. प्रशांतला ब्रीफ करण्यासाठी तेवढा वेळ लागणारच होता. शिवाय नंतर ती निश्चिंतपणे श्रीशला भेटून येऊ

शकणार होती. बॉसला दाखवून ओके करून घे आणि मग फायनल कर असंही बजावायला ती विसरली नाही.

प्रशांत केबिनमधे पोहोचण्यापूर्वी मात्र ती स्वत:च्या केबिनमधे निघून गेली. प्रशांत आला आणि त्याने एकवार नजर केबिनभर फिरवली. साईड टेबलवरचा निशिगंधाचा बुके त्याला प्रसन्न करून गेला. तो टेबलवर येऊन बसेपर्यंत सुरेशने मागवून ठेवलेली ब्लॅक कॉफी आली. प्रशांतला आश्चर्य वाटलं. त्याच्यातला मुरलेला मॅनेजर जागा झाला. सुरेश कौतुकाच्या अपेक्षेने पहातोय हे त्याच्या तीक्ष्ण नजरेतून सुटलं नव्हतंच. तो चट्कन म्हणाला, “ब्लॅक कॉफी?” हे म्हणताना त्याने जरूरीइतकी नाराजी, कपाळावर बारीक आठी, बरोब्बर जमवली. सुरेश गोंधळला, पट्कन बोलून गेला “शाल्मली मॅडमनी सांगितलं... मी मागवतो परत... काय मागवू? चहा? ग्रीन टी?”

प्रशांत म्हणाला नाही, “रोज हेच ब्लॅक कॉफी” आणि सुरेशकडे पाहून सूचक हसला. सुरेशला आपण पकडले गेल्याची जाणीव जरा उशीराच झाली. पण प्रशांतच्या चेहऱ्यावरचे प्रसन्न हास्य बघून, फारसं बिघडलं नाहीय आणि या बॉस बरोबर खरेपणाच कामी येईल असंही लक्षात आलं. त्याने ताबडतोब श्येड्युल समोर ठेवलं आणि लगेच शाल्मली मॅडमनीच हे सगळं सांगितलंय असंही सांगून मोकळा झाला. “पण तुम्हाला योग्य वाटलं तर” असंही म्हणाला.

‘फास्ट लर्नर’ प्रशांतने मनातल्या मनात सुरेशला टॅग केलं.

ठीक आहे असंच करू असं सांगून शाल्मलीला बोलवायला सांगितलं!

सुरेशने इंटरकॉमवरून तसे सांगताच शाल्मली आलीच. मग एक एक करत सर्व डिपार्टमेंटस्, एकमेकांवर अवलंबून असणारे मुद्दे, महत्वाचे क्लायंटस्, प्रत्येकाच्या निरनिराळया गरजा, निरनिराळया अपेक्षा, सध्या सुरू असणारी प्रोजेक्टस्, पाईपलाईनमधली प्रोजेक्टस्, सगळा गोषवारा अत्यंत मुद्देसूदपणे ती बोलत गेली आणि प्रशांत पूर्ण एकाग्रतेने ऐकत गेला, एकीकडे शाल्मलीच्या बुद्धीमत्तेबद्दल त्याचा आदर दुणावत गेला.

सगळं बोलून शाल्मली थांबली तेव्हा प्रशांतची स्थिर नजर आपल्यावरच आहे हे लक्षात येऊन ती जरा संकोचली. प्रशांतही सावरला एकदम. मग घसा किंचित खाकरत म्हणाला. थॅंक्स! ब्रिफिंग साठी आणि ब्लॅक कॉफीसाठीही!

शाल्मली काही न बोलता उठली, आणि जाऊ लागली, तेव्हा बाकीच्या मिटींग्जमधेही तिने थांबावं असं त्याने सुचवलं. शाल्मली एकदम अस्वस्थ झाली. मग म्हणाली, युनिट हेड्स वुड लाईक टू मीट यू वन ऑन वन, काही लागलंच तर सांगा मी आहेच नेक्स्ट केबिनमधे. ऑलराईट! प्रशांत म्हणाला. शाल्मलीचं अस्वस्थ होणं आणि तिने नंतर सुटकेचा निश्वास सोडलेला त्याच्या नजरेतून सुटला नाही.

-----------------

शंतनू घरी आला. बाई गेली होती तोपर्यंत. नकळत त्याची पावलं गॅलरीकडे वळली. पण त्याने दार नाही उघडलं, कारण फ्रेंच विंडोच्या काचेतून त्याला दिसलं, चिमणा चिमणी त्या हॅंगरमधे चिवचिवाटासह घरटं बांधत होते. चोचीतून काड्या खाली पडत होत्या पण न दमता दर वेळी ती दोघं परत परत त्या उचलून घरट्यात खोचत होते. मधेच थांबून अंगाला अंग घासत माना वाकड्या करकरून घरट्याकडे पाहत होते. अनिमिष नेत्रांनी शंतनू पाहत राहिला. त्याला अचानक आठवलं, बोर्डिंग स्कूलमधे लहानपणी खोलीत अभ्यासाला बसला असताना खिडकीबाहेर दोन खारोट्या झाडांच्या खोडावरून पकडा पकडी खेळत होत्या. मधेच झाडावरची शेंग पोखरून एकमेकांना भरवत होत्या, परत चोर पोलीस सुरू. शंतनू भान हरपून या त्यांच्या खेळात इतका तल्लीन झाला की नकळत टाळ्या पिटून दोघींना चिअर करायला लागला. मागे रेक्टर कधी येऊन उभे राहिले कळलच नाही. त्यांनी कान खेचला जोरात, आणि मग हातांवर दहा झणझणीत पट्ट्या. मग त्याला विचारलं "कळलं का तुला का शिक्षा केली?" तो रडत रडत, चुरचुरणारे हात चोळत म्हणाला "खिडकीतून बाहेर पाहत होतो, अभ्यास करताना, " तेव्हा रेक्टर म्हणाले "नुसता बाहेर पाहत नव्हतास, स्वत:चं काम सोडून फालतू गोष्ट पाहून प्रचंड आनंदी होत होतास. असा काम सोडून आनंदी व्हायला लागलास तर भणंग फकीर होऊन हिंडशील दारोदारी. आयुष्यात यशस्वी व्हायचं असेल तर हे फालतू आनंद दूर ठेवायला

शीक. तुझ्या आईबापांनी त्यासाठी पाठवलाय तुला इकडे. कायम लक्षात ठेव."

संस्कारक्षम वयात रेक्टरचे ते शब्द कायमचे ठसले मनात. त्याने ती खिडकी कायमची बंद करून टाकली. खोलीची आणि मनाचीही.

मग जेव्हा जेव्हा असा कोणताही 'फालतू ' आनंद समोर दिसला तेव्हा तेव्हा त्याने खिडक्या बंद केल्या. मित्र जीवाभावाचे होऊच दिले नाहीत, निसर्ग चार हात दूरच ठेवला, मनाला हळवं होण्याची मुभा तर दिलीच नाही कधी.

'यशस्वी होण्याच्या नादात आयुष्य जगण्याची कलाच शिकायला विसरलो आपण. आणि त्यात फरफट झाली माझ्या शाल्मलीची.' टचकन पाणी आलं त्याच्या डोळ्यात. हा ही एक नवाच अनुभव होता त्याच्यासाठी.

तो हळूहळू मागे वळला . सोफ्यावर बसून राहिला. अचानक लक्ष कॅलेंडरकडे गेलं. वर्षभरापूर्वीचं याच महिन्याचं पान वर होतं. त्याने स्मृतीला ताण दिला बराच. "कोणता दिवस होता तो?"

-------------------

शाल्मली उठली पहाटेसच आज. आज श्रीश झाला वर्षापूर्वी. आज ती आई झाली होती वर्षभरापूर्वी. जीवनातला परमोच्च आनंद दिला होता श्रीशने तिला.

तिने श्रीशला न्हाऊ माखू घातले. आईकडे गेल्यावर आजी, मामीने त्याला ओवाळले. बच्चा पार्टीने केक आणूनच ठेवला होता, तो दादाच्या मदतीने श्रीशने कापला. सगळयांनी 'हैप्पी बर्थ डे टु श्रीश' म्हटलं. दोन्ही मुलांनी कडेवर घेऊन त्याला नाचवला. श्रीश प्रचंड खूश होता. शाल्मलीच्या डोळयांच्या कडा पाणावल्या. त्या तिने हळूच पुसून घेतल्या.

आज ऑफिसच्या पाळणाघरात वाटण्यासाठी शाल्मलीने कप केक्स, चॉकलेटस् घेतली होती. जवळच्या मूकबधीर मुलांच्या शाळेतही संध्याकाळी ती घेऊन जाणार होती श्रीश ला. आता सवय करायलाच हवी होती.

ऑफिसमधे आल्यावर पहाते तर पाळणाघरात बोर्डवर श्रीशचा शाल्मलीबरोबरचा फोटो, त्याभोवती डेकोरेशन वगैरे केलेलं, मोठ्या अक्षरात 'हैपी बर्थ डे' लिहीलेलं. खूप भरून आलं तिला. खरंतर सगळयाच मुलांच्या वाढदिवसाला असं व्हायचंच की पाळणाघरात, पण आपल्या बाळासाठी कोणी केलं की आईला त्याचं अप्रुप असतं. सगळयांनी श्रीशला विश केलं. श्रीश नेहमीच हसरं बाळ, त्यातून सध्या पाळणाघराचं शेंडेफळ, त्यामुळे तिथल्या कर्मचाऱ्यांबरोबरच इतर मुलांचाही फार फार लाडका. ''नशीबवान माझं बाळ, किती लोकांचं प्रेम मिळतंय त्याला, फक्त एका माणसाचं सोडून...'' खचकन पायात काटा रुतावा तसं झालं तिचं.

तिने श्रीशला मुलांच्या गराड्यात सोडलं आणि ती आली आपल्या केबीनमधे. आज वेळेत आटपायला हवं काम. असं म्हणत तिने प्रथम मेल्स हातावेगळ्या करायला सुरवात केली. शाल्मली एकदा एका गोष्टीत शिरली की पूर्णपणे एकाग्र होणं हा स्थायीभाव. मग काम काहीही असो. आत्ताही तसंच झालं. लॅपटॉपच्या स्क्रीनवर डोळे, मेंदू, इतका एकाग्र की केबीनच्या दारावरची बारीक टकटक, मग प्रशांत दार उघडून आत आला तरी हिला पत्ता नाही. तो मात्र त्या एकाग्र, बुद्धीमान सौंदर्यवतीला एकटक न्याहाळत राहिला . 'काय आहे हे रसायन? इतक्या ढगळ्या कपड्यांमधेही इतकी सुंदर कशी दिसू शकते कोणी? नुसतं सौंदर्यच नाही बुद्धीमत्ताही तितकीच प्रखर. कामातला तिचा आवाका प्रशांत सारख्या अफाट आवाक्याच्या माणसालाही चकित करत होता. मग का राहते ही अशी गबाळी? मुद्दाम?'

तोच दचकला त्याच्या या विचारांनी. खाजगी आयुष्य आणि व्यावसायिक आयुष्याच्या खणांना त्याने कायम एकमेकांपासून दूर ठेवले होते. "नेव्हर टू बी मिक्स्ड" हा त्याचा फंडा. पण शाल्मलीला भेटल्यापासून काही वेगळंच घडत होतं. स्वत:ला सावरत घसा खाकरला त्याने. शाल्मलीने वर पाहिलं आणि पट्कन उठली. "सर, तुम्ही? मला बोलवून घ्यायचं ना? काही काम?"

"बसू?"

"हो हो, " शाल्मली गोंधळलीच.

प्रशांतला तिला असं गोंधळलेलं पाहून बरं वाटलं. “चला, अगदीच उदासीन नाही ही, आपला काहीतरी परिणाम होतोय तर.” मनातल्या मनात या विचारासाठी त्याने दोन रट्टेही दिले स्वत:ला, ‘यू रास्कल...’

क्षणभर आपण का आलो होतो हे विसरलाच तो, पण मग शाल्मलीच्या चेहऱ्यावरचं भलंमोठं प्रश्नचिह्न बघून त्याला आठवावंच लागलं.

मग बराच वेळ तो अनेक बारीक सारीक गोष्टी विचारत राहिला आणि शाल्मलीला चकित करत राहिला . ज्या गोष्टींचे बारीक तपशील तिने हातचे म्हणून राखून ठेवले होते काल, ती लूपहोल्स बरोब्बर शोधून काढली होती त्याने. नकळत दोघांची नजरानजर झाली आणि त्याचा अर्थ दोघांनाही बरोबर कळला.

“तू हे मुद्दाम राखून ठेवलं होतंस हे माहितीय मला”

“हुशार आहे हा बाबा, मजा येणार काम करायला”

असं काहीसं होतं ते. दोघांच्याही ओठांवर सूचक पण सावध स्मितरेषा उमटली.

बोलत असतानाच तिचा फोन वाजला, ती बंदच करणार होती पण पाळणाघराचा नंबर म्हटल्यावर राहवेना तिला, “एक्सक्यूज मी सर, इफ यू डोन्ट माइंड...”

“या या गो अहेड प्लीज...”

तिने फोन उचलला. “मॅम लवकर या, लग्गेच, “ ती खाडकन उठून उभी राहिली... “अगं काय झालं...?” “नाही तुम्ही याच... “ “बाप रे!, आले आले काय झालंय पण?” पलिकडून फोन बंद झाला.

“इज एव्हरीथींग ऑलराईट शाल्मली?”

“अं? सॉरी सर, जायला हवं मला ...”

एवढं बोलून शाल्मली बाहेरही पडली.

प्रशांतही तिच्या मागोमाग गेला. त्यालाही तिच्या वेगाबरोबर चालायला जड गेलं. तिचं अर्थातच लक्ष नव्हतं.

पोहोचली तर पाळणाघराचं दार उघडं होतं आणि ती आत शिरणार तेवढ्यात श्रीश दुडकी पावलं टाकत बाहेर आला... क्षणभर तिच्या लक्षातच आलं नाही, आणि आलं तेव्हा जे वाटलं ते शब्दात सांगणं कठीणच होतं.

श्रीश चं पहिलं बाळपाऊल, किती दिवस वाट पाहत होती ती. उठून धरून उभा रहायला लागून दोन महिन्यांच्या वर वेळ गेला होता पण चालत नव्हता. पाळणाघरातल्या बायकांना जवळ जवळ रोज विचारायची ती. विनाकारण श्रीशच्या शारिरीक वाढीबाबत काळजी असायची तिला. आज त्याचं हे प्रगतीचं पहिलं पाऊल तिला प्रत्यक्ष

पाहायला मिळावं म्हणून त्या बायकांनी केलेली युक्ती चांगलीच फळाला आली. शाल्मली क्षणभर पाहत राहिली ओल्या डोळ्यांनी, आणि मग पट्कन उचलून घेऊन पटापट मुके घेत सुटली श्रीशचे. सगळे हे दृश्य ओल्या डोळ्यांनी पाहत होते. प्रशांत प्रचंड चकित होऊन हे पाहत होता.

------------------------

शंतनू सकाळी उठला. त्याने आदल्याच दिवशी ऑफिसमधे दोन दिवस येणार नाही असं कळवलं होतं. त्याने हॉस्पिटल गाठलं. रिसेप्शन काउंटरवर त्याने नाव सांगितलं आणि डॉक्टरांची भेट मागितली. “चार दिवसांनंतरची अपॉइंटमेंट मिळेल, पेशंटचं नाव सांगा.” मग तो म्हणाला “मला एक रेकॉर्ड हवं होतं. मागच्या वर्षी याच महिन्यात साधारण याच कालावधीत एक डिलीव्हरी झाली होती.” “पेशंटचं नाव लिहून द्या आणि बसा, वेळ लागेल जुने रेकॉर्डस काढायला.”

तो बसून राहिला . साधारण अर्ध्या तासाने रिसेप्शनीस्टने नाव पुकारले.

“रेकॉर्ड आहेत, तुम्ही कोण पेशंटचे?

“मी... हजबंड आणि झालेल्या बाळाचा बाबा, ...”

“बर्थ सर्टिफिकेट आधीच इश्यू झालंय. तुम्हाला डुप्लिकेट कॉपी हवीय का?”

“हो, आणि संपूर्ण फाईलची कॉपी पण?”

“हरवलीत की काय?”

“अं हो, ”

“बसा, प्रिंट व्हायला वेळ लागेल, बरेच रिपोर्टस् आहेत, ऑडिओमेट्री वगैरेचे. हो आणि काही पैसेही भरायला लागतील फोटोकॉपिंगचे, प्रिंट झाल्यावर कळेल किती”

“हो हो चालेल, बसतो मी”

फाईल हातात आल्यावर शंतनूने प्रथम तारीख पाहिली. आजचीच, वर्षभरापूर्वीची. आज वर्षापूर्वी बाप झालो आपण. नावाला! शाल्मलीने माझं नाव लावलं असेल त्याच्या रेकॉर्डस् वर?

“श्रीश” दोघांनाही फार आवडलेलं नाव, छोटं, सुटसुटीत, आणि दोघांच्याही नावातला “श” मिरवणारं.

ठेवलं नसेलच तिने. का ठेवावं? मी तर त्याला मुलगा मानायलाही तयार नव्हतो.

कणाकणानं मन गर्तेत जात होतं पश्चात्तापाच्या, वेदनेच्या, आणि हात देऊन वर काढायला कोणी नव्हतं.

नकळत पाय वाईनशॉपकडे वळले . 'नेहमीचं' विकत घेतलं. घरी आला. दार उघडून आत आला. ग्लास काढला. बाटली उघडली. ग्लास भरला. सोफ्यावर बसला. ग्लास ओठांकडे गेला.

अचानक लक्ष नुकतीच भिंतीवर लटकवलेल्या शाल्मलीच्या फोटोफ्रेमकडे गेलं आणि शॉक बसावा तसा हात खाली आला. झटकन उठला. ग्लास आणि बाटली दोन्ही बेसिनमधे उलटे केले . हात थरथरत होते. घाम फुटला होता. तन मागत होतं. मन नाही म्हणत होतं.

त्याने हॉस्पिटल मधून आणलेली फाईल काढली. परत वाचली. 'आज एक वर्षाचा झाला मुलगा आपला! आपला? काय केलं आपण त्याचं? जावं का भेटायला?'

त्याला शाल्मली आठवली, त्या दिवशीची, संतापाने थरथरणारी, कधी नव्हे ते प्रचंड ओरडून बोलणारी, 'नजरेत पराकोटीचा तिरस्कार भरला होता तिच्या आपल्याविषयी... तिच्या त्या तिरस्कृत नजरेनेच सटपटून गेलो आपण. कोलमडून पडलो.'

नकळत प्रचंड प्रेमात पडत गेलो आपण शाल्मलीच्या. कळलंच नाही कधी येवढे गुंतलो. पण प्रेमाला बरंच काही द्यावं लागतं हे माहीतच नव्हतं आपल्याला.'

शाल्मलीची ती तिरस्काराने भरलेली नजर परत एकदा आठवली आणि आपण आयुष्याची लढाई संपूर्ण हरलोय या भावनेने त्याला पूर्णपणे घेरलं. मगाशी ओतून दिलेली दारू आत्ता अगदीच गरजेची झाली. ‘का ओतली मी?’ रागारागाने मूठ आपटली त्याने टीपॉयवर. ग्लास गडगडत गेला खाली, पडून चक्काचूर झाला. ‘माझ्या आयुष्याचाही असाच चक्काचूर झालाय.’ शंतनू ला वाटलं.

नजर नकळत शाल्मलीच्या फोटोकडे गेली. डोळे भरून वाहू लागले.

अचानक शाल्मली दार उघडून आत आली. एकटक त्याच्याकडे पाहत उभी राहिली. बराच वेळ. मग अलगद तिने त्याचा हात हाती घेतला, दुसऱ्या हाताने शंतनूच्या गालांवर ओघळलेले अश्रू पुसले. तिच्या त्या हळूवार स्पर्शाने शंतनूला भडभडून आलं. त्याने तिचा हात घट्ट पकडला. “आलीस शमा, माझी शाल्मली... का गेलीस मला सोडून... चुकलो गं मी... पण मला सुधारायला एक संधी दे... आता जाऊ नकोस कधीच मला सोडून... प्लीज...”

शाल्मली काहीच बोलली नाही. तिने हळू हळू हात सोडवून घ्यायला सुरवात केली.

“शमा...शमा... नको गं ... नको ना जाऊस... प्लीज... प्ली...”

शंतनूला जाग आली. खडबडून जाग आली. तो शाल्मलीला शोधू लागला. मग त्याला जाणवलं, स्वप्न पडलं आपल्याला. पण शाल्मलीचा हात माझ्या हातात होता आत्ता, स्पर्श अजून जाणवतोय हाताला, गालाला.., तो हवालदील झाला. काही सूचेना. मग वाटलं, 'हा संकेत असेल का काही? आज शाल्मलीच्या नजरेत तिरस्कार नव्हता.'

सुचेना काहीच! वेडापिसा झाला. पटकन उठला. बाहेर पडला. कार काढलीनी सुसाट निघाला. चार तासांचा तर रस्ता. पोहोचू लगेच. जसजसं शाल्मलीचं शहर जवळ येऊ लागलं, तसतसा धीर खचायला लागला. 'काय होईल? हाकलून देईल? सर्वांसमक्ष अपमान करेल? तिच्या घरचे? मारायला उठेल तिचा भाऊ?' अनंत विचारांनी काहूर माजलं त्याच्या मनात!

-----------------------

प्रशांत प्रचंड चकित होऊन समोर जे घडत होतं ते पाहत होता. हजार प्रश्न त्याला अचानक सतावायला लागले. 'लग्न झालय हिचं? मंगळसूत्र? अलिकडे कोण घालतं म्हणा, मुलगापण आहे? वाटत नाही बघून. नवरा? ओह...'

प्रशांत सावकाश मागे वळला. पण मग अचानक बोर्डकडे लक्ष गेलं त्याचं. शाल्मली आणि त्या बाळाचा फोटो, बर्थ डे विशेज... 'ओह...'

तो चटकन पुढे झाला. शाल्मलीच्या चेहऱ्यावर अजून ते ओलं हसू तसंच होतं. तशाच ओल्या हसऱ्या नजरेने तिने त्याच्याकडे पाहिलं. श्रावणातल्या पावसाळी उन्हातलं टवटवीत फूलच जणू. या हसऱ्या खळयांकडे पाहिल्यावर कोणाचा चेहरा हसरा व्हायचा राहिल? परत वस्तुस्थितीची जाणीव होऊन तो ओशाळला. बाळाला घेण्यासाठी हात पुढे झाले. श्रीश सगळयांकडेच हसत हसत जाई तसाच प्रशांतकडेही गेला. "ओह, सो, यंग बॉय, इट्स युवर बर्थ डे टुडे? हॅपी बर्थ डे चॅप!" श्रीश त्याच्या हलणाऱ्या ओठांकडे पाहत होता. "नाव काय तुझं?"

"श्रीश" शाल्मली म्हणाली पटकन. "हं, 'श्रीश' नाईस नेम! तुझं बाळ खूपच गोड आहे शाल्मली." शाल्मली नुसतच थॅंक्स म्हणाली. पाळणाघरातली मुलगी श्रीशला घ्यायला आली.

शाल्मली आणि प्रशांत ऑफिस ब्लॉककडे परत निघाले. "तू सुट्टी घ्यायला हवी होतीस आज. मग बाबा बरोबर पार्टी संध्याकाळी का?"

शाल्मलीला काय बोलावं कळेना. मग म्हणाली "संध्याकाळी मूक बधीर मुलांच्या शाळेत नेणार आहे. मी तीनला निघेन, चालेल ना? सुरेशला बाकी सगळं ब्रीफ केलय संध्याकाळपर्यंतच्या ॲक्टीव्हीटीज."

"मूक बधीर... का? म्हणजे बराच लहान आहे ना तो, कळायला लागल्यावर चॅरिटी शिकव ना."

“श्रीश ही जन्मत: बहिरा आहे आणि म्हणून मुकाही.”

“ओह, आय ॲम सो सो सॉरी शाल्मली. मला काहीच कल्पना...”

“इट्स ओ के सर.”

“श्रीशचा बाबा? तो येणार आहे ना तुम्हाला न्यायला?”

“अं, नाही. मीच जाणाराय बाळाला घेऊन.”

“मग बाबा?डायरेक्ट तिथेच”

“वी आर सेपरेटेड”

“ओह... आय ॲम एक्स्ट्रीमली सॉरी शाल्मली!”

या वेळेस ती काहीच बोलली नाही. तिच्या चेहऱ्यावरील वेदना स्पष्ट दिसत होती. न पाहिलेल्या शाल्मलीच्या नवऱ्याबद्दल प्रचंड रागाची भावना निर्माण झाली प्रशांतच्या मनात. “तीन वाजता जाण्याआधी भेटून जा मला.”

“येस सर!”

दोघही आपापल्या केबिन्सकडे वळले.

नंतरचा वेळ कामात पटकन गेला. तीनला पाच मिनीटं उरली तेव्हा प्रशांतने भेटून जा म्हटल्याचं आठवलं शाल्मलीला. “छे, आता अजून

वेळ जाईल. ती शाळा पाच वाजता सुटते. चारपर्यंत तरी पोहोचायला हवं. “ मग घाईघाईने ती गेली केबीनमधे, नॉक करून आतच गेली.

“झाली वेळ? निघुया?”

“सर, कुठे? मी आज लवकर...”

“तिथेच. मी येतोय बघायला ही शाळा. आजपर्यंत कधी योगच नाही आला. तुझ्या बच्चूच्या निमित्ताने मलाही काही नवं शिकायला मिळेल. चल, उशीर नको व्हायला, ट्रॅफिक किती वाढलाय माहिताय ना?”

पुढे तिला काहीच बोलू न देता प्रशांत ढांगा टाकत बाहेरही पडला. नाईलाज झाल्यासारखी शाल्मली ही मागोमाग निघाली.

प्रशांतच्या कारमधून निघाले. श्रीश रस्त्यावरच्या गमती जमती बघण्यात जाम खूश होता. शाल्मली आणि प्रशांत गप्प होते.

‘आपण असं अगाऊपणे आलेलं आवडलं नाही हिला.’

‘का हा आलाय? मला यापुढे जपून राहायला हवंय का? पण टॅक्सीने असं गावाबाहेर एकटीने येण्यात धोका होता. अगदीच गर्दी मागे पडली’

“हाय वे सुरू होतो तिथेच ना? मॅप तरी तसंच दाखवतोय”

“हो सर, आणि थॅंक्स!”

“शाल्मली, थॅंक्स मी म्हणायला हवं, ही संधी मला तुझ्यामुळे मिळतेय”

ती पुढे काहीच बोलली नाही.

शाळा आली, सगळे उतरले. शाल्मलीने मुलांना वाटायला आणलेला खाऊ घेतला. गाडी पार्क करून प्रशांत पुढे आला. त्याने हात पुढे करताच श्रीश त्याच्याकडे गेला. तिघे निघाले. शाळेत तिने आधी कल्पना दिलेलीच होती. मुख्याध्यापिका लगेच आल्याच पुढे. “बरं झालं आज बाबा ही आले बाळाचे तुमच्या बरोबर”

शाल्मली काही म्हणण्यापूर्वीच त्या पुढे निघाल्या. नकळत तिने प्रशांतकडे कटाक्ष टाकला. तो तिच्याकडे पाहत होता. त्याच्या नजरेतले भाव न ओळखण्यासारखे. तिने पटकन नजर वळवली.

बाई त्यांना एका वर्गात घेऊन गेल्या. साधारण सहा सात वर्षांची मुलं असावीत सगळी. नुकतीच साईन लॅंग्वेज शिकत असावीत. त्यांच्या शिक्षिकेने त्यांना खाणाखुणांनी सांगितलं आज या बाळाचा वाढदिवस तुमच्याबरोबर साजरा करणार आहे तो. शाल्मली बऱ्यापैकी ओळखू शकली ते सगळं चला आपण बरोबर शिकतोय.

मग आणलेला केक कापला. खाऊ वाटला. श्रीश एवढ्या सगळ्या मुलांना पाहून हरखूनच गेला. मुळातला त्याचा हसरा चेहरा

आनंदाने उजळून गेला होता. मुलंही छोट्या बाळाला पाहून भलती खूष होती.

नकळत तिचं लक्ष पलिकडे उभ्या प्रशांतकडे गेलं. अत्यंत प्रेमळ नजरेने तो श्रीशकडे पाहत होता. तिला आश्चर्य वाटलं. कुठेतरी मन भरून आलं. ‘कोण कुठला हा. पण किती प्रेमाने पाहतोय माझ्या बाळाकडे. ह्या नजरेत खोट नाही नक्कीच.’

तेवढ्यात प्रशांतची आणि तिची नजरानजर झाली. तिने झटक्यात नजर दुसरीकडे वळवली. पण तिचा गोरामोरा चेहरा त्याच्या नजरेतून सुटला नाही.

--------------------

शंतनू जसजसा तिच्या घराजवळ जाऊ लागला त्याचं अवसान गळू लागलं. “परत त्या तिरस्काराने भरलेल्या नजरेचा सामना करण्याची ताकद नाही तुझ्यात” मन बजाऊ लागलं. तो रस्त्याच्या कडेला थांबला. “काय करावं?” घालमेल होत होती जीवाची!

मग तो गाडी कडेला लावून उतरला. मोकळा श्वास घेतल्यावर बरं वाटलं त्याला. समोरच मोठं खेळण्याचं दुकान दिसलं. तो आत गेला. समोरच एक मोठा टेडी होता. तो घेतला. कार्डवर लिहीलं “तुझ्या वेड्या बाबाकडून”

मग शाल्मलीच्या माहेरचा पत्ता दिला. पोहचवायला सांगून तो परतीच्या वाटेला लागला. डोळे वहात होते. धूसर वाट होती पण निदान मार्ग मिळाला होता.

प्रशांतने शाल्मली आणि श्रीशला घराजवळ आणून सोडले. तिने वर बोलावले नाही. तो गाडी वळवून निघून गेला.

शाल्मली काही क्षण पाहत राहिली. रिअर मिररमधे त्याला दिसली. मग वळून गेली. काही वेळातच आई आली. तिच्या हातात टेडी. “आई, अगं एवढा मोठा टेडी? कोणी आणला? कशाला एवढा खर्च?”

आईने तिच्या हातात दिला. शाल्मलीने कार्ड वाचले. मटकन खाली बसली. कितीतरी वेळ पाहत त्याकडे. “आला होता?” क्षीण आवाजात विचारले तिने. नाही दुकानातला माणूस देऊन गेला.

“हं!” तिने कार्ड काढून कपाटात ठेवले. वरचे प्लास्टिक काढून टेडी श्रीशला दिला. तो त्याच्यावर चक्क पहुडला. आई गेल्यावर शाल्मली गदगदून रडायला लागली. दिवसभराच्या घडामोडी आणि वर हे. आजपर्यंत तिने वर्षभर निकराने धरून ठेवलेला धीर क्षणात सुटला. कितीतरी वेळ हुंदक्यांनी तिचे शरीर गदगदत राहीले.

--------------------

शंतनू घरी कसा पोहोचला त्याचं त्यालाही सांगता नसतं आलं इतका विचारात हरवला होता तो. पण आल्यावर मात्र तो शांत झोपला. किती तरी दिवसात प्रथमच. काहीतरी पक्का निर्णय घेतला होता त्याच्या मनाने.

रात्री शांत झोप झाल्याने तो सकाळीच उठला. बऱ्याच दिवसांनी जीमला हजेरी लावून आला. हो फक्त हजेरीच. फारसं काही करण्यागत स्नायूत बळ उरलंच कुठे होतं? पण इंस्ट्रक्टरशी बोलून आला. डाएटिशियन बरोबर पण बोलला. सगळं नीट लिहून घेतलं. पूर्वी शाल्मली आपल्याला सगळ्याची, आठवण, तयारी, करायची; आता त्याची त्यालाच करायची होती स्वत:ची मदत, शाल्मली आणि त्याच्या मुलाला परत मिळवण्यासाठी.

मग घरी येऊन त्याने नाश्ता बनवला, ब्रेड टोस्ट, कॉफी, बॉईल्ड एग्ज. तो खाऊन, सगळं आवरून ऑफिसला आला. सर्वप्रथम जाऊन बॉसला भेटला. आतापर्यंत आपण फार हलगर्जी पणा केला कामात, यापुढे असे होणार नाही अशी ग्वाही दिली. कामत सर वय, अनुभवाने सिनियर. त्यांनी पाठीवर हात ठेवला. म्हणाले तू आमचा ॲसेट आहेस शंतनू . तुझी हार ती आमची हार. आता आयुष्याला भरकटू देऊ नकोस. कधीही काही बोलावसं वाटलं तर मी आहे हे विसरू नकोस. शंतनूला बराच धीर आला.

बऱ्याच दिवसांनी त्याने परत कामावर लक्ष केंद्रित केलं. कित्येक गोष्टी हातावेगळ्या केल्या. काही फाईल्स घरी अधिक वाचनासाठी काढून ठेवल्या.

मग दुपारी त्याने त्याच्या डॉक्टर मित्राला फोन लावला. पहिल्या रिंगलाच त्याने उचलला. अजून एक संकेत मिळाल्यासारखं वाटलं त्याला.

"शंतनू, अरे आहेस कुठे मित्रा? किती दिवसात काही खबरबात नाही."

"मला एक चांगला डॉक्टर सुचव. मूक बधीर मुलांवर उपचार करणारा. जन्मत:च बहिरेपण असणाऱ्यांसाठी."

"अरे कोणासाठी पण? कुणी जवळचं?"

"माझ्या स्वत:च्या मुलासाठी!"

"अरे, ताबडतोब मला प्राथमिक तपासण्यांचे रिपोर्ट मेल कर. माझा एक चांगला मित्र उत्तम ट्रीट करतो अशा केसेस. त्याला पाठवतो. मग अपॉईंटमेंट घेऊ. अँड जस्ट डोंट वरी यार. अगदी नॉर्मल लाईफ जगतात असे पेशंटस. अभिनंदन, मुलगा झाल्याची पार्टी दे लेका आधी!"

“ऐक, मित्रा, कदाचित लगेच दाखवायला नाही आणता येणार, पण मी भेटून जाईन आधी डॉक्टरांना. तुला प्रत्यक्ष भेटल्यावर सांगेन सगळं. रिपोर्टसचे स्कॅन लगेच पाठवतो. “

एवढं बोलून त्याने फोन ठेवला. रिपोर्टस स्कॅनरमधे टाकले आणि लगेच मेलवर पाठवून दिले.

मग परत तो आपल्या कामात गुंतून गेला. वर्षभराचा बॅकलॉग त्याला भरून काढायचा होता. सगळंच आयुष्य वर्षभर ठप्प झालं होतं. ते परत सुरू करायचं होतं. आता त्याला एक मिनीटही वाया घालवायचं नव्हतं.

---------------------

बऱ्याच वेळाने शाल्मली शांत झाली. पाहते तर श्रीश टेडीवरच झोपून गेला होता. तिने त्याला उचलून घेतले तर टेडी पण आला त्याच्याबरोबर. घट्ट धरून झोपला होता. मग तसंच दोघांनाही बेडवर ठेवलं. शेजारी ती ही आडवी झाली. शारिरीक, मानसिक थकव्याने केव्हातरी झोप लागून गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे ऑफिसमधे पोहोचली. पण मनाशी काहीतरी ठरवूनच. प्रशांतच्या सकाळपासून क्लायंटस् बरोबर मिटींग्ज होत्या.त्या जेवणाची वेळ होईपर्यंत चालल्या. शाल्मली तिच्या केबीनमधे कामं हातावेगळी करत राहिली. जेवणाच्या वेळी इंटरकॉम

वाजला, पलिकडे सुरेश होता. सर बोलावत आहेत असा निरोप आला. प्रशांतच्या केबीनमधे क्लायंट, त्याची दोन माणसं, प्रशांत आणि सुरेश होते. प्रशांतने ओळख करून दिली. माझ्याबरोबर आता तुमचं काम या ही पाहतील. आधी दिनेश पाहत होता तुमचं काम, पण आता या पाहतील.

शाल्मली चकित झाली. पण क्लायंट समोर काही बोलणे प्रशस्त वाटले नसते. पण याविषयी बोलायचं हे तिने ठरवून टाकलं. क्लायंट म्हणाला "मी केव्हापासूनच मॅम ना इन्व्हॉल्व्ह करा म्हणत होतोच. पावगींच्या प्रोजेक्टमधे तुम्ही इन्व्हॉल्व्हड होता तर फार व्यवस्थित ते काम पूर्ण झाल्याचं त्याने सांगितलं. आता आम्हाला काही शंका नाही."

शाल्मलीच्या चेहेऱ्यावरचे भाव झरझर बदलत गेले. प्रशांत ते निरखत होता. तिच्या मनातल्या विचारांचा बरोबर अंदाज त्याला आला होता.

लंच घेता घेता बरीच चर्चा झाली. शाल्मलीला तशी थोडीफार कल्पना होतीच. आज रात्रीच तिने फाईल परत नजरे खालून घालायचं ठरवलं. मंडळी गेल्यावर परत दोघांत थोडी चर्चा झाली. प्रशांतने दोघांसाठी कॉफी मागवली. मग म्हणाला, "या आधी कुठे जॉब करत

होतीस?” ती म्हणाली “नव्हते करत. इथे इन कोर्स ट्रेनिंग केलं होतं.”“श्रीश ची काही ट्रीटमेंट वगैरे?”प्रचंड गिल्ट शाल्मलीच्या चेहऱ्यावर दिसली. नकळत डोळे ओलावले. पटकन स्वत:ला सावरत म्हणाली, “अजून नाही काही केलय, पण आता करेन लवकरच.”

पुढचा प्रश्न दोघांच्या मनात लटकत राहिला त्यांच्या सेपरेशनचा. पण प्रशांतने आत्ताच नको असं ठरवलं आणि शाल्मलीने सुटकेचा निश्वास टाकला.

मग अजून काही गोष्टींवर चर्चा झाल्या. प्रशांत म्हणाला “तुला कामाचा ताण वाटला तर सांग, एखाद दुसरं प्रोजेक्ट शिफ्ट करू.” ती म्हणाली “नको. दोन लास्ट फेजमधे आहेत. ती संपतीलच.”

“तुझ्याबरोबर काम करायला मजा येते शाल्मली. एका लेवल वर येऊन चर्चा होते. हुद्द्याने मी वर असेनही, ते केवळ तू नोकरीत उशीरा रुजू झालीस म्हणून. नाहीतर बुद्धीमत्ता, कुशलता यात तू कुठेच कमी नाहीस. मला सर वगैरे म्हणायची गरज नाही.” नावानेच संबोध मला. शाल्मली काहीच बोलली नाही यावर. गप्प राहणेच पसंत केले तिने. दिवस भराभर पुढे जात होते.

एकीकडे तिलाही त्याच्याबरोबर काम करायला आवडत होते पण बाकी कोणतीच गुंतागुंत तिला नको होती. प्रशांत स्पष्ट काही बोलला नसला तरी तो तिच्याकडे आकर्षित होतोय हे तिला जाणवत होते. पण

तो सुसंस्कृत होता. लोचटपणा करणारा अजिबातच नव्हता. शिवाय त्याची बुद्धीमत्ता त्याच्या प्रत्येक निर्णयातून दिसत असे. काहीच दिवसात संपूर्ण ऑफिसमधे त्याने आदरयुक्त दबदबा निर्माण केला होता. बऱ्याच गोष्टी जास्त प्रोफेशनली केल्या जाऊ लागल्या होत्या.

विनाकारण कामात विघ्न निर्माण करून नियमांमागे लपून मज्जा बघायला आवडणारे लोक प्रत्येक ऑफिसमधे असतातच. तसे इथेही होतेच. त्यांना व्यवस्थितपणे मेन स्ट्रीमच्या बाहेर काढून, जरा एकट्याने करावयाची कामे जसं डेटा फिडींग, स्टोअर वगैरे ठिकाणी पाठवून त्यांच्या उपद्रवाला आळा बसवला होता. त्यांचं डायरेक्ट रिपोर्टींग स्वत:कडे ठेऊन एकाच वेळेस त्यांना उगाचच आपण फार महत्वाचे आहोत असं वाटायला लावून, बऱ्याच युनिट हेड्स ची डोकेदुखी वाचवली होती.

काही इफरव्हेसंट मंडळी ज्यांच्याकडे भरपूर उत्साह होता पण कौशल्याची कमी होती त्यांना शाल्मलीच्या ताब्यात दिले त्याने. मॅडम लवकरच त्यांच्या गळयातल्या ताईत बनल्या होत्या आणि शाल्मलीचा लोड ही कमी होत होता. प्रशांतच्या या सर्व खेळया शाल्मलीच्या लक्षात येत होत्या आणि त्याच्याविषयीचा आदर दुणावत होता. एक कुशल प्रशासकाचे सर्व गुण त्याच्यात असलेलं तिला जाणवत होतं.

-----------------

संध्याकाळचे सहा वाजले तरी शंतनू अजून त्याच्या केबिनमधेच होता. त्याची सेक्रेटरी स्नेहल केव्हाची चुळबुळत बसून होती. पण कित्येक दिवसांनी आपले सर पहिल्यासारखे परत कामात दंग झालेले पाहून तिलाही बरं वाटत होतं. तिचा सिक्रेट क्रश होता शंतनू वर . तिला बॉय फ्रेंड होता पण नुकताच ब्रेक अप ही झाला होता. पण एखाद्या सिनेनटासारखा हॅंडसम शंतनू तिचाच का, बऱ्याच जणींचा ऑफिसमधे लाडका होता. त्याला एक नजर पहायला बऱ्याच जणी स्नेहल शी दोस्ती करून उगाचच तिला भेटायला म्हणून येऊन जायच्या. आधी किंवा आत्ताही शंतनूला त्यात स्वारस्य नव्हतं.

आत्ताही स्नेहल बसलीय ताटकळत हे त्याच्या गावीही नव्हतं. साडेसहा होऊन गेले तेव्हा मात्र स्नेहल केबीनमधे डोकावली. “सर चहा मागवू तुमच्यासाठी?” “अं?, हं. विल डू” तिने दोन चहा मागवले. आल्यावर केबीनमधेच ठेवायला सांगितलं पॉट. मग आपण आत गेली. चहा बनवून शंतनू समोर धरला. त्याने मान वर करून पाहिलं. मग घेतला कप. मग तिने स्वत:साठीही भरला कप. “सर, अजून बराच वेळ लागेल का तुम्हाला? सेक्युरिटीला सांगून ठेवते.”

“अं, अजून एक अर्धा तास, ही एवढी फाईल संपवतो. राहीलेल्या कारमधे ठेवायला सांग.” “ओके सर” “नीड एनी हेल्प सर?” “नो, थॅंक्स” “ओके सर” संपलं संभाषण. खट्टू होऊन स्नेहल बाहेर आली. शंतनू काम संपवून निघाला. स्नेहल अजून थांबलेलीच होती.

बाकी ऑफिसमधे शुकशुकाट होता. मग शंतनू म्हणाला ‘‘कशी जाणार आहेस?’’ ‘‘बसने’’ ‘‘मी सोडतो चल, कुठे रहातेस?’’ ‘‘सागरनगर’’ ‘‘मग माझ्या रस्त्यावरच आहे.’’ दोघं निघाली. स्नेहलला लॉटरी लागल्यासारखंच वाटत होतं. तिच्या मनात उकळ्या फुटत होत्या. उद्या सगळ्यांना हे कसं रंगवून रंगवून सांगता येईल याचाच ती विचार करत होती. ‘‘सर, घरी कोण कोण आहे तुमच्या? कुठे राहता तुम्ही?’’

‘‘अं?’’शंतनू आपल्याच नादात होता. ‘‘काय म्हणालीस?’’

‘‘घरी कोण कोण असतं असं म्हटलं?’’

‘‘एकटाच असतो मी.’’

‘‘ओह, मग जेवणांचं काय करता?’’

‘‘बाई करते पोळी भाजी.’’

‘‘ओह’’

‘‘तुला कुठे उतरायचं सांग.’’

‘‘अं, हो हो.’’

‘‘पुढच्या सिग्नलला उतरेन मी सर.’’

‘‘ओके.’’

‘‘बाय गुड नाईट सर. थॅंक्स फॉर द लिफ्ट!’’

“बाय”

दुसऱ्या दिवशी स्नेहल मोठा टिफीन घेऊन आली. लंच टाईम झाल्यावर सरळ केबीनमधे घुसलीच. भराभर प्लेटस्, ग्लासेस सगळं मांडलं टेबल वर. शंतनूने आश्चर्याने पाहिलं. स्नेहल म्हणाली सर आजपासून आपण बरोबर जेवणार आहोत. असं म्हणून तिने भराभर प्लेट्स भरल्या. सुग्रास जेवणाचं असं घरगुती ताट बऱ्याच दिवसानी शंतनूच्या समोर आलं होतं. त्याने त्याचा डबाही काढला. स्नेहलने त्यातलही थोडं वाढून घेतलं. मग दोघे जेवली. मग परत वाढण्याच्या निमित्त्याने ती शंतनूच्या जरा जास्तच जवळ गेली. परफ्युमचा मंद सुगंध त्याला जाणवला. तिने किंचित वाकत बाऊल उचलला आणि परत भरून तसाच प्लेटमधे ठेवला. मग समोर येऊन बसली.

“सर आवडतंय का जेवण?:” “हं! बऱ्याच दिवसांनी असं घरचं जेवलो. थॅंक्स”

“सर तुम्हाला आवडलं हेच खूप आहे माझ्यासाठी. आता रोज मी आणत जाईन तुमच्यासाठी डबा.”

“छे छे! एखाद दिवशी आणलस बस झालं.”

“नाही सर, मला ही एकटीला खूप कंटाळा येतो जेवायला. बाकीच्यांची आणि आपली लंच टाईम पण निरनिराळी. आता ठरलं हं! मी आणणार डबा तुमच्यासाठी पण.”

शंतनू काहीच बोलला नाही.

स्नेहलने पटापट टेबल क्लिअर केलं.

“सुपारी?”तिने छोटीशी डबी पुढे केली.

शंतनू पाहतच राहिला. हसून चिमूट तोंडात टाकली.

मग हे रोज आठवडाभर सुरू राहिलं. दुपारी एकत्र जेवण. संध्याकाळी कारमधून सोडणे.

शुक्रवारी तर बराच उशीरपर्यंत शंतनू काम करत बसला. स्नेहल ही तिची कामं उरकत राहिली. जवळ पास ८ वाजता त्याने थांबवलं काम. एक मस्त हात वर ताणून आळस दिला. त्याच क्षणी स्नेहल आत आली.

“तू जायला हवं होतस घरी, बराच उशीर झाला.”

“तुम्हाला काही लागलं असतं तर”

“बरं चला निघूयाच” एक मोठा फाईलचा गठ्ठा उचलत तो म्हणाला.

तिच्या उतरण्याचं ठिकाण आल्यावर तो अचानक म्हणाला, “जेवायला जाऊया आज बाहेर? आज माझी ट्रीट.”

“घरी सांगते फोन करून, तुमच्या बरोबर जाते म्हटल्यावर आई नको नाही म्हणायची”

स्नेहल जाम खूश झाली स्वत:वरच! गोष्टी कशा अगदी तिच्या मनासारख्या घडू लागल्या होत्या.

--------------------

शाल्मली साईन लॅंग्वेज क्लासमधून बाहेर पडली. तेवढा वेळ श्रीश आईकडे राहायचा. त्याला खूप आवडायचं तिथे राहायला. मामा, मामी, मोठी भावंडं, आजी आजोबा, सगळे भरपूर लाड करत. या सर्वांचा शाल्मलीला खूप आधार वाटायचा. पुढच्या रविवारी सगळ्यांना जेवायला बोलवायचं तिने ठरवून टाकलं. तेवढीच वहिनीला एक दिवस स्वैपाकातून सुट्टी!

आता तिला श्रीशच्या ट्रीटमेंटचं पहायचं होतं. काही पैसे तिने बाजूला काढून ठेवले होतेच. आज रात्री ऑनलाइन सर्च ती करणारच होती. शिवाय मेडिकल फिल्ड मधल्या काही मित्र मैत्रिणींचा सल्लाही घेणार होती.

घरी येऊन तिने श्रीशचे मंमं, तिचे जेवण उरकले. श्रीश टेडीला घेऊन बेडवर चढला. मग तिने जरासे थोपटताच झोपीही गेला.

शाल्मलीने लॅपटॉप उघडला. कधी नव्हे ते पर्सनल मेलवर बरेच मेल्स दिसले. ती बरेच दिवसात उघडलीच नव्हती तिने.

पहाते तर ज्युनिअर कॉलेज मधील बऱ्याच मित्र मैत्रिणींचे मेल्स होते. शाल्मली बाकी कुठल्याच सोशल नेटवर्क वर नसल्याने तिला सगळयांनी भरपूर शिव्या घातल्या होत्या.

येत्या महिन्यात एका रविवारी बॅचचं स्नेहसंमेलन आहे आणि सगळयांनी यायचच आहे असे अनेक मेसेजेस होते.

मग आणखी एका मेसेजवर तिचं लक्ष गेलं. समीर साने, तिचा बालवाडीपासूनचा सच्चा दोस्त!

"मी भारतात परत आलोय, आणि सर्वांना, प्रामुख्याने तुला भेटण्याची खूप इच्छा आहे, तर तू येते आहेस ना, GTला" असं विचारलं होतं.

समीर, अत्यंत हुशार मुलगा. मेडिकलला सरकारी कॉलेजमधे ॲडमिशन मिळवली त्याने. शाल्मलीने १२वी नंतर सरळ मॅनेजमेंट कोर्स जॉईन केला आणि मग वाटा वेगळया होत गेल्या. पण १२वी पर्यंत जोडगोळी होती त्यांची. नेहमी स्पष्ट आणि खरं बोलणारा समीर आणि शाल्मली खास दोस्त. त्याचं मेडिकलला ॲडमिशन मिळवण्याचं स्वप्न पूर्ण झालं तेव्हा त्याच्या इतकाच आनंद शाल्मलीलाही झालेला. मग एम. बी. बी. एस. होईपर्यंत मेल वरून संपर्क राहिला . पण मग तो परदेशी गेला पुढच्या शिक्षणासाठी आणि शाल्मलीचं लग्न झालं. मग संपलाच संपर्क.

त्याचा शेवटचा मेल अजूनही तसाच होता. लग्नात मुलाने नोकरी न करण्याची अट घातलेली बघून प्रचंड चिडला होता. तू अशा मुलाशी लग्न करूच कशी शकतेस असा सवाल त्याने विचारला होता त्या मेलमधे. त्यानंतर आलेली ही पहिलीच मेल समीरची.

तिचा जाण्याचा निर्णय पक्का झाला. तिने तसे कळवूनही टाकले सगळ्यांना. नवा फोन नंबर दिला. काही क्षणात फोन वाजला. समीर होता पलिकडे. अगदीच अनपेक्षित होतं तिला. काय बोलावं कळेचना तिला. “अगं महिना लागतो का तुला मेल बॉक्स उघडून पाहायला? रोज वाट पाहायचो मी मेलला रिप्लाय येईल म्हणून! कुठे आहेस? कशी आहेस? लवकर बोल.” शाल्मलीला मधली सगळी वर्ष गळून पडल्यासारखं वाटलं. तोच आवाज. तेच स्पष्ट बोलणं. नकळत नजर ओली झाली. “शाम, (हे खास समीरने तिचं ठेवलेलं नाव ) आहेस ना? अगं बोल की काहीतरी.”ती किंचित हसली. “सॅम, अजूनही तसाच आहेस रे अगदी.” “शाम???? यु ओके? आवाज असा का येतोय तुझा? मी निदान शंभर एक शिव्यांची भूक ठेऊन बसलोय गं!”आता मात्र तिला खळखळून हसू आलं. सॅम, शाम ची जोडी फेमस होती कॉलेजमधे! “प्रत्यक्ष भेटतोस कधी सांग. मी पूर्ण तयारी करून येते. असं बेसावध गाठलस आणि मी अवाक होऊन बोलती बंद झाली ना माझी.” मग तोही हसला मनापासून. मधली वर्ष नाहीशीच झाली जणू. मग ती विचारत राहिली, तो स्वत:बद्दल सांगत राहिला. त्याने तिला विचारलेल्या प्रश्नांना ती त्रोटक उत्तरे देतेय हे लक्षात आलं

त्याच्या. मग त्यानेही ताणलं नाहीच. ती नोकरी करतेय हे ऐकून बरं वाटलं त्याला. तो शेजारच्याच शहरात होता आणि येणाऱ्या रविवारी संध्याकाळी तो येणार होता तिला भेटायला. GT पर्यंत थांबायची गरजच नाही असं सरळच सांगून टाकलं त्याने. तिलाही या आपल्या बालवाडीपासूनच्या मित्राला भेटायची आतुरता होतीच. नकळत हलकं हलकं वाटायला लागलं. “एक दो तिन चार सॅम शामचा जयजयकार!जितेगी भाई जितेगी सॅम शाम की दोस्ती जितेगी!” असल्या काही भयंकर अफाट घोषणा देत चौथी पाचवीत गल्लीत उड्या मारत फेऱ्या घातलेल्या तिला आठवल्या. कित्येक दिवसांनी खुद्कन हसू उमटलं तिच्या ओठांवर.

------------------------

शंतनूने परत आपल्या डॉक्टर मित्राला फोन लावला. तो म्हणाला पाठवलेत मी रिपोर्टस. कळेल या आठवड्यात.शंतनूचा कामाचा उरका वाढला, जीममधे रोज जाऊन तब्येत सुधारू लागली. आपल्या मुलासाठी आपण काहीतरी करतोय हे समाधानही होतंच गाठीला. शंतनू परत पूर्ववत व्हायला लागला.

स्नेहल बरोबर अधून मधून डिनर व्हायला लागलं. तिला अधून मधून गिफ्टस् मिळू लागली. त्याला रोज तिने आणलेल्या सुग्रास टिफिन ची परतफेड करण्याची गरज वाटत होती.

------------------

प्रशांत, शाल्मली ही एक उत्तम टीम बनली होतीच. त्यांच्या यशस्वी प्रोजेक्टसचा बोलबाला कॉरपोरेट ऑफिस पर्यंत पोहोचला होता. तिच्या प्रमोशनचे प्रपोजल प्रशांतने वर पाठवून दिलेच होते. शाल्मली जरी योग्य अंतर राखून वागत होती तरी प्रशांत बरोबरचं तिचं वागणं बरंच खेळीमेळीचं झालं होतं. प्रशांत काही कच्चा, पहिल्या हळव्या प्रेमाचा प्रेमवीर नव्हताच. त्याला वाट पाहणं मंजूर होतं. बऱ्यापैकी कामानिमित्ताने का होईना शाल्मलीचा सहवास घडत असल्याने आता मुद्दाम काही कारणं काढून तिच्या जवळ जाण्याची गरज त्याला जाणवत नव्हती.

शाल्मलीने रविवारी दुपारी माहेरच्या सर्वांना जेवायला बोलावले होते. जेवणं खेळीमेळीत पार पडली. "आई, सॅम परत भारतात आलाय. आज जाणार आहे त्याला भेटायला." "कोण सान्यांचा समीर? अरे वा! मोठा हुशार मुलगा. इथेच असतो का? मी बोलावलय म्हणून सांग गं!" "हो सांगते." "आत्या, श्रीशला नेऊ नकोस हां, आमचा बागेत जायचा प्लॅन ठरलाय" भाच्याने लग्गेच सांगितलं. "हो का? कुणाचा प्लॅन ठरलाय? तुझा आणि श्रीशचा का?" वयवर्षे ७च्या अमेयला तिने विचारले, हसत हसत. "अशी काय गं आत्या, बाबा आई नेणारेत आम्हाला, कालच ठरलय. हो की नाही गं आई?" "होहो, शाल्मली,

खरच ठरलय गं आमचं. आणि बागेत श्रीश पण खूश असतो. तू जाऊन ये तुझ्या मित्राला भेटून. श्रीशला राहू दे, आमच्याकडे.” वहिनी म्हणाली.

संध्याकाळी शाल्मली तयार व्हायला उठली. आपल्या ढगळ्या कपड्यांवर सॅम ची खास ठेवणीतली काय प्रतिक्रिया असेल हा विचार मनात येऊन जाम हसायला आलं तिला. मग नकळत हात आधीच्या कपड्यांकडे वळला. पण परत तिने सध्याचाच दोन साईज मोठा ड्रेस काढला कपाटातून.

सॅम समोर आपण कसे दिसतो याला नगण्य महत्व होतं. तिलाही आणि त्यालाही. हे पक्कं ठाऊक होतं तिला. पोहोचायला तासभर तरी लागला असता तिला. निघाली मग. दोन बस बदलून पुढे ऑटो असं ठरवलं तिने. सगळा प्रवास करून पोहोचली तेव्हा १० मिनिटं उशीर झालाच होता. सॅम नक्की येऊन बसला असेल. ती रेस्टॉरंटमधे शिरली. सगळीकडे नजर टाकली कुठेच नव्हता सॅम. कमाल आहे. मग बसली एक रिकामं टेबल पाहून. तेवढ्यात वेटर येऊन म्हणाला “मॅम, तुमच्यासाठी निरोप आहे, टेरेस लॉन वर बोलावलय तुम्हाला सरांनी.” “टेरेस लॉन?” “चला मी दाखवतो.” ती निघाली त्याच्या पाठोपाठ, तो लिफ्टपर्यंत घेऊन गेला, मग म्हणाला ११ वा मजल्याचं बटन दाबा डायरेक्ट टेरेसलॉनवरच जाते लिफ्ट!

लिफ्ट वर वर जात शेवटी थांबली, दार उघडलं तर समोर सॅम उभा, रिसिव्ह करायला.

तेव्हाचा सुकडा, दाढीचे खूंट वाढवून फिरणारा सॅम आणि अंगाने भरलेला, अद्ययावत कपड्यातला रुबाबदार सॅम ... जमीन अस्मानाचा फरक होता. ती पाहत राहिली. तिच्या त्या निरखून पाहण्याने एकाच वेळी तो किंचित हसला, लाजलाही. त्याला तसं अस्वस्थ झालेलं पाहून जाम हसायला आलं तिला. तिने नजरेनेच काय असं विचारलं आणि तो ही हसायला लागला. “हेच हेच, हे असं क्ष किरण परिक्षण आणि पाठोपाठ त्याचं पोस्टमार्टेम होणार हे माहित होतं म्हणूनच आधीच भेटूया म्हटलं मी!”

“छान दिसतोस सॅम! एकदम हॅंडसम!”

“शाम, तू का पण अशी कोमेजलेली दिसतेस? कुठे हरवली ती चमकत्या डोळयांची, सगळं मनातलं बोलून टाकणारी, सॅमला झापणारी शाम?”

“बसूया?”

“चल!”

कोपऱ्यातलं टेबल बूक केलेलंच होतं त्याने. बसले दोघे!

“शूट!” सॅम म्हणाला.

शाल्मली हसली जराशी.

मग धबधब्यासारखी बोलत सुटली. लग्न झाल्यापासून आजपर्यंत! ऐकताना सॅमचा चेहरा तिच्या बोलण्याबरोबर क्षणाक्षणात बदलत होता. संताप, चीड, वेदना, सगळं काही उमटत गेलं त्याच्या चेहऱ्यावर. आजपर्यंत मनात रुतून बसलेल्या पण कधीच कोणासमोर न बोलल्या गेलेल्या घटना, पायात रुतलेले काटे उपसून काढावे, काढताना टचकन डोळ्यात पाणी यावं पण मग ठसठस कमी व्हावी तसं झालं तिचं. समीर फक्त ऐकत होता. सगळं बोलून झाल्यावर त्याने एकच प्रश्न विचारला, “श्रीश ची ट्रीटमेंट कोणाकडे सुरू आहे?” बस, शाल्मलीच्या डोळ्यांना पूर आला जणू! “ए, अगं, शाम, काय झालं?” “वर्षभर विस्कटलेल्या आयुष्याची घडी बसवण्यात गेलं सॅम! सुरवातीला दोन तीन वेळा नेलं डॉक्टरकडे, पण श्रीश इतका लहान होता की ऑडिओमेट्री पण धड होत नव्हती रे. पैशापरी पैसा जात होता. मग मी ठरवलं वर्षभर पैसे साठवून मग सलग उपचार करावेत., खूप उशीर केला का रे मी?”

“नाही.आणि आता चिंता नकोय, मी आलोय ना, तुझा डॉक्टर मित्र?” सॅमने तिच्या हातांवर थोपटत म्हटलं. ती फिकट हसली.

“मला उद्या जे काही त्याच्या जन्मापासूनचे रिपोर्टस् असतील ते मेल कर! माझं स्पेशलायझेशन याच विषयात आहे.” शाल्मलीने चमकून पाहिलं, “काय सांगतोस सॅम? खरच?” देवदूत भेटल्याचे भाव

होते तिच्या चेहऱ्यावर! "शाम, अशी नको बघूस माझ्याकडे. हे बघ जोपर्यंत मी स्वत: श्रीशला तपासत नाही, टेस्टच होत नाहीत, तोपर्यंत मी काहीच सांगू शकणार नाही. पण एक नक्की की आपण सर्वतोपरी प्रयत्न करणार आहोत.बरं मला एक सांग त्या नीच माणसाचा आणि तुझा डायव्होर्स झाला ना? झाला असेलच म्हणा, तू काही भिजत घोंगडं ठेवणारी मुलगी नाहीस." शाल्मलीने मान खाली घातली. "सॅम, तेवढं नाही करवलं मला." "अगं वेडी आहेस का तू? का अडकून पडली आहेस? असं काय आहे म्हणून निर्णय नाही झालाय तुझा?" " सॅम, अरे...काही झालं तरी श्रीशचा बाप आहे तो?"

"हे मात्र तुझं मुळीच पटलेलं नाही मला. बाप स्वत:ला बाप म्हणवून घेतोय का? परवा दुकानदाराकरवी खेळणं पाठवलं? कुठला बाप असा राहू शकतो गं आपल्या मुलाला भेटल्या शिवाय?" हे बघ, तू लगेच दुसरं लग्न करावस, आधार शोधावास असलं बु*** मी तुझ्याबद्दल नाहीच बोलणाराय. तू स्वयंसिद्धा होतीस आणि आहेस. तान्ह्या मुलाला घेऊन असं बाहेर पडणं, कोलमडून न जाता ठामपणे परिस्थितीचा सामना करत श्रीशसाठी नवं विश्व निर्माण करणं हे येरागबाळ्याचं काम नाहीच. पण मला एकच कळतं, तुटलेली नाती वेळीच पूर्णपणे तोडून नाही टाकली तर कुजतात आणि गँगरीन सारखी खातात तुम्हाला."

"सॅम!"

"हो असंच होतं शाम, तेव्हा लगेच निर्णय घे. तुझ्या नवऱ्याने जे केलं तो अपराध होता. आणि अपराधाला शिक्षाच हवी. चुकीला माफी, प्रायश्चित्त असं काही होऊ शकतं. अपराधाला नाही."

शाल्मली पाहत राहिली आपल्या या सडेतोड मित्राकडे. नेहमीप्रमाणे एकमेकांच्या डोळ्यात अंजन घालण्याचं काम तो विसरला नव्हता.

"शाम तुला आठवतं? मोनिकामधे मी ऐन १२वीच्या वर्षात अडकत असताना तू कसं मला अलगद बाहेर काढलं होतंस? डायरेक्ट मोनिकाशी बोलून? तेव्हा तू ते केलं नसतस तर आज हा समीर कुठेतरी खर्डेघाशी करताना दिसला असता. काहीच दिवसात मोनिकाने रमण बरोबर दोस्ती केली आणि मला माझी चूक उमगली. पण दोन महिने प्रथमच आयुष्यात अबोला धरला होता मी तुझ्याशी, तू मात्र शांतपणे वाट पाहिलीस या मित्राची! आज माझी पाळी तुला चार शहाणपणाचे शब्द सांगण्याची. खरंतर या लग्नाला तयार कशी झालीस याचच मला आश्चर्य वाटत होतं. झालं ते झालं, आता मोकळी हो, कळतंय का?" शाल्मली समोरची कॉफी नुसती ढवळत राहिली. सॅमने तो विषय तिथेच थांबवायचा ठरवलं. "बरं बरं, एवढं नकोय अगदी तोंड बारीक करायला. विचार कर यावर एवढंच म्हणायचंय मला. आता हसा बरं जरा, त्या गोड खळ्या दिसू देत की आम्हालाही जरा."

"सॅम!"

तो खळखळून हसला. "काय फिदा असायची पोरं या खळ्यांवर, आठवतंय? निम्मे फिशपॉन्डस या खळ्यांमधेच अडकलेले असत. तू मात्र कधी कोणाला दाद दिली नाहीस. तुझ्याशी मैत्री करून द्यावी म्हणून कित्येक पोरं मला कधीही ट्रीट द्यायला अर्ध्या पायावर तयार असायची."

"सॅम..., काय सांगतोस? आणि तू त्या ट्रीटस् घ्यायचास?"

"नेहमी नाही, पण आपली कडकी असेल आणि समोरून कोणी ट्रीट देत असेल तर नाही पण नव्हतो म्हणत."

"आणि मग?"

"मग काय? केव्हातरी ग्रुपमधे उगाच आपली द्यायची ओळख करून, तुझ्या एका जरबी नजरेने गप्प व्हायचे ते रोमिओ."

मग दोघेही हसत हसत जुन्या आठवणीत रमले. तेव्हाचे टीचर्स, त्यांच्या लकबी, ठेवलेली टोपण नावं, लावलेल्या प्रॉक्झी, ट्रेक्स, गॅदरींग, नाटकं, मग काढलेल्या नोटस्, रात्रीचे जागून केलेले अभ्यास, कडक चहा, उद्याच्या पेपरमधे नेमके कुठले प्रश्न येणार यावर लावलेल्या पैजा, १२ वीचा रिझल्ट, तिने अचानक डेंटिस्ट्रीला मिळत असलेली ॲडमिशन सोडून मॅनेजमेंट कोर्सकडे वळवलेला मोर्चा, फक्त सॅमने त्यासाठी दिलेला पाठींबा ... हजार विषय ... जणू ते दिवस जगून आली दोघे परत.

कित्येक दिवसांनी शाल्मली आज खळखळून हसली होती. तसं तिने सांगताच समीरला दिवस कारणी लागल्यासारखे वाटले. जवळपास तीन तासांनी दोघं उठली. समीर म्हणाला चल तुलाही घरी सोडतो आणि काका काकुंनाही भेटतो. मला आज जे काही रिपोर्टस् असतील ते मेल कर.

-----------------

स्नेहलने बेल वाजवली. शंतनू नुकताच आंघोळ करून बाथरूम मधून रोब घालून बाहेर येत होता. कामवाल्या मावशी असणार असं वाटून त्याने दार उघडले तर दारात स्नेहल. तो जरा गोंधळलाच. बस आलोच असं म्हणत आत गेला. हवेत त्याच्या आफ्टर शेव्हचा, शॉवर जेलचा मंद सुगंध दरवळत राहिला . कपडे घालून तो बाहेर आला.

तुम्ही एकटेच धड जेवण नाही करणार म्हणून कंपनी द्यायला आले. शंतनू काहीच बोलला नाही. मग तीच उगाच विषय काढून बोलत राहिली. तेवढ्यात बाई आली. तिला शंतनूने फक्त साफसफाई करून जायला सांगितलं. ती गेल्यावर स्नेहलने चट्कन जवळच्या हॉटेलमधून जेवण मागवलं. शंतनू म्हणाला “बाहेरच गेलो असतो.”

“सर किती ऊन आहे बाहेर. मी मागवलंय, येईल एवढ्यात.”

मग दोघं जेवले.स्नेहलने सगळं आवरलं आणि किचन मधून दोघं बाहेर येता येता स्नेहलचा पाय लचकला आणि ती एकदमच शंतनूच्या

अंगावर रेलली. शंतनूने तिला सावरले. दोघे अगदीच जवळ जवळ उभी होती. नकळत स्नेहलचा हात शंतनूच्या गळयात गेला. शंतनूने अलगद तिला दूर केले आणि तो सोफ्यावर बसला. स्नेहल जरा चपापली. “सॉरी सर, तोल गेला, ” असा पुटपूटत ती समोरच्या सोफ्यावर बसली.

----------------------

प्रशांत आपल्या केबीनमधे बसला होता. कामाचा ताण पूर्वीही कधी त्याने घेतला नाही आणि आता तर शाल्मली सारखी सहकारी असल्यावर प्रोजेक्टस वर नुसतं लक्ष ठेवण्याचं काम उरलं होतं. शाल्मली त्याच्याशी खेळीमेळीने वागत असली तरी सहकारी, वरिष्ठ म्हणूनच ती त्याच्याकडे पाहते हे त्याला जाणवत होते.एक दोन वेळा त्याने डिनर साठी बोलावूनही नम्रपणे तिने नकार दिला होता. मुख्य म्हणजे नकारासाठी तिने कोणतेही कारण दिले नव्हते जे त्याने लिलया खोडून काढले असते. एकीकडे ती भाव देत नाही हा विचार त्याला त्रास देत होता तर दुसरीकडे तिच्याविषयी आदरही दुणावत होता. प्रेमाच्या खेळात जसं सपशेल हरणं विफलग्रस्त करतं, तसंच सरळ साधी जीत ही त्यातली मजा घालवते असंच म्हणणं होतं त्याचं. आग कशी धुमसली पाहिजे, जरा घुसमट व्हावी, जरा धूर कोंडावा, आणि मग भडकावी ती आग, त्याची मजा आगळीच. एकमेकांचा

अंदाज घेत एक एक खेळी खेळण्यात जी मजा आहे ती प्रत्यक्ष प्राप्तीत सुद्धा नाही.

"प्रशांत शेट, एक गोष्ट विसरताय राव, यात खेळ्या तुम्हीच खेळताय. तिच्या बाजूने साधी दखलही नाही घेतली गेलेली. तसं असतं तर एव्हाना काही तरी खूण मिळाली असती की नाही! जागे व्हा राव!"

त्याचंच मन त्याला खिजवू लागलं.

"शाल्मली काही मुळात गबाळी बाई नाही. मनात आणेल तर किंचितशा कपड्यातल्या बदलाने सुरवंटाचं फुलपाखरू होईल. तू इथे आल्यावर ते होईल ही तुझी अटकळ ही तिने खोटी ठरवली. किंबहुना आधीचे फ्रेश कलर्स जाऊन डल कलर्स वाढलेत तिच्या वॉर्डरोबमधे. कदाचित तू दाखवत असलेला पुढाकार तर याला कारणीभूत नाही?"

त्याला या विचारासरशी धक्काच बसला. नेहमीच्या सवयीने डोकं झटकलं त्याने. "काहीतरी करायलाच हवं."

मग त्याने इंटरकॉम उचलून शाल्मलीला बोलावणं पाठवलं सुरेश कडून.

सुरेश तिच्या केबीनमधे आला आणि बघतंच राहिला. मॅडम आज काही वेगळ्याच दिसताहेत. त्याची प्रतिक्रिया पाहून तिच्या ओठांवर एक स्मितरेषा उमटली. "अं, मॅम, प्रशांत सरांनी बोलवलय तुम्हाला नव्या प्रोजेक्टचे अपडेटस घेऊन"

“हं, येते एवढी मेल पाठवून.”

काल सगळे रिपोर्टस पाहून सॅमने फोन केला, श्रीशला घेऊन ये, लवकरात लवकर म्हणाला. आवाजात उत्साह होता त्याच्या. फोनवर नाही सांगत काही, प्रत्यक्ष भेटल्यावर सविस्तर बोलू म्हणाला. आज संध्याकाळी नेणार होती ती श्रीशला सॅमच्या हॉस्पिटलमधे.

पण तेवढ्यानेच किती हुरूप आला तिला. नकळत उत्साही रंगाचा जरा मापाचा ड्रेस आणि लाईट मेक अप करावासा वाटला तिला.माणसाच्या मनाचं प्रतिबिंब त्याच्या प्रत्येक गोष्टीत दिसतं हेच खरं.

मेल पाठवून, लॅपटॉप उचलून ती तडक प्रशांतच्या केबीनमधे आली आणि तो क्षणभर श्वास घ्यायचा विसरला. आपण आत्ताच विचार करत होतो आणि सुरवंटाचं फुलपाखरू होऊन अवतरलं. शाल्मलीचं अर्थातच लक्ष नव्हतं.

तिने आल्या आल्या लॅपटॉप, ओएचपीला कनेक्ट केला आणि प्रोजेक्ट ची प्रेझेंटेशन फाईल ओपन केली. मग तिने भराभर अपडेट्स द्यायला सुरवात केली. प्रशांत एकीकडे ऐकत होता आणि एकीकडे तिला निरखत होता. मनात द्वंद्व सुरूच राहिलं. शेवटी सगळं झाल्यावर शाल्मली थांबली आणि प्रथमच तिला प्रशांतच्या तिच्यावरील एकटक नजरेची जाणीव झाली. हा निर्णयाचा क्षण आहे हे तिच्या लक्षात आलं.

तिने नजर न चुकवता अथवा झुकवता त्याच्या नजरेला सरळ नजर दिली. प्रशांत किंचित चपापला पण त्यानेही नजर हटवली नाही. मग म्हणाला “छान दिसतेस शाल्मली. हा रंग छान दिसतोय तुला.”

“थँक्स फॉर द कॉम्प्लिमेंटस सर.”

“किती वेळा सांगितलं, प्रशांत म्हणत जा.”

“नको, सरच ठीक आहे. प्रत्येक पदाचा एक आदर असतो तो राखावा.”

“आपण फक्त सहकारीच आहोत का?”

“हो सर. फक्त सहकारी, अत्यंत चांगले सहकारी, जे एकमेकांना कामात मदत करतात, पुढे जायला मदत करतात, अडीअडचणीत मार्गदर्शन करतात. पण तरीही फक्त सहकारीच. ना अधिक ना उणे.”

“मी जर अधिक काही होऊ पाहत असेन तर?”

“ती जागा नाही माझ्या आयुष्यात सर. सध्या माझं विश्व माझा श्रीश आणि ही नोकरी आहे. तिसऱ्या कोणत्याही गोष्टीला यात स्थान नाही. तुम्हाला हे स्पष्टच सांगावं असं वाटलं कारण तुम्हाला अंधारात ठेवणं मला फसगत केल्यासारखं वाटत होतं.”

“तुला तुझ्या आयुष्याचा विचार नाही?”

“सध्या ह्याच दोन गोष्टी माझं आयुष्य आहे सर.थॅंक्स फॉर एव्हरीथींग. पण हे प्रोजेक्ट संपल्यावर तुम्ही माझं डिपार्टमेंट बदलावं. आपल्या दोघांच्याही दृष्टीने ते सोपं होईल.”

प्रशांत काही काळ तिच्याकडे पाहत राहिला आणि मग सावकाश त्याने समजुतीची मान हलवली.

संध्याकाळी शाल्मली श्रीशला घेऊन सॅमच्या हॉस्पिटलमधे पोहोचली. ते एक मल्टीफॅसिलिटी हॉस्पिटल होतं. सॅम प्रशासकांपैकी एक होता आणि इ न टी विभागाच्या पेडिॲट्रीक युनिटचा प्रमुख शल्यविशारद होता. त्याने रिसेप्शनमधे आधीच सांगून ठेवल्याने तिथल्या मुलीने शाल्मलीला बसायला सांगून सॅमला ती आल्याचे कळवले. सॅमने तिला मोबाईल वर फोन केला आणि तिसऱ्या मजल्यावर त्याच्या कंन्सल्टींग रूममधे येण्यास सांगितले. शाल्मली तिसऱ्या मजल्यावर पोहोचली. हॉस्पिटल बाहेरून तर नाहीच पण आतूनही हॉस्पिटल सारखं वाटत नव्हतं. कमालीची स्वच्छता, कलात्मक बांधणी, यामुळे ते एक हॉस्पिटल पेक्षा कॉर्पोरेट ऑफिस अधिक वाटत होतं.

शाल्मली सॅमच्या रुममधे शिरली तेव्हा तो उठून उभा राहिला. पुढे येऊन खुर्ची ओढून तिला बसायला लावले. श्रीशला त्याने बेबी

चेअरमधे बसवलं आणि काही खेळणी दिली त्याला खेळायला. शाल्मली हे सर्व नवलाने बघत होती.

“अरे वा, आमचा दोस्त अजून सडाफटींग असला तरी लहान मुलांना छान हॅंडल करतो की.”

“शाम, तीन अख्खी वर्ष पेडिॲट्रीकमधे आणि त्यातलं एक निओनेटलमधे काम केलय मी. तुला काय वाटलं? उगाच एवढ्या डिग्र्या लावल्यात का पाटीवर?”

शाल्मली ओठ दुमडून हसली. “नाही, ते ठीकय, पण मला बारावीत असताना एका मांजरीची नवजात बाळं, ज्यांचे डोळेही उघडले नव्हते त्यांना हात लावायची एका मुलाला किती भीती वाटत होती, आणि मग त्यातलं एक मी तुझ्या ओंजळीत ठेवल्यावर कसे एका मुलाचे डोळे डबडबले होते ते आठवलं उगाच.”

सॅम तिच्याकडे पाहून हसला. मग म्हणाला “किती छान ओळखतेस मला. आय मिस्सड यू सो मच शाम. ग्लॅड वी आर बॅक.”

“खरय सॅम, जराही विचार न करता तुझ्याशी बोलू शकते मी. आणि हे किती महत्वाचं आहे हे विसरलेच होते रे. बरं, मला सांग अजून लग्न नाही केलस?”

तेवढ्यात इंटरकॉम वाजला, रिसीव्हर वर बोलता बोलता हात ठेऊन सॅम म्हणाला,

“काय घेशील कॉफी की कोल्ड काही?”

“छे रे, आत्ता काहीच नको.”

“दोन कॉफी आणि एक हॉट चॉकलेट पाठव.”

“मस्तय रे हॉस्पिटल तुझं. एकदम अत्याधुनिक.”

तो किंचित हसला. “शाम, खरं सांगू, इथे या वातावरणात मी एक मोठ्या डॉक्टरची भुमिका वठवतोय. मग तो मोठेपणाचा आव, बडेजाव सगळं आलंच! त्यातल्या त्यात जमेची बाजू ही की, मी माझ्या पेशंटस समोर आव आणत नाही. तिथे मी फक्त डॉक्टर होतो, लहान, मोठा असं नाही, फक्त खराखुरा डॉक्टर, ज्याचं उद्दीष्ट फक्त पेशंटला बरं करणं हे असतं. ज्या दिवशी या भुमिकेतून बाहेर पडेन त्या दिवशी प्रॅक्टीस सोडून देईन मी.”

शाल्मली हसली फक्त. “सॅम सो ग्लॅड टु मीट माय ओल्ड फ्रेंड! जसाच्या तसा सांभाळून आहेस स्वत:ला याचं कौतुक वाटलं.”

“तू मात्र पूर्णपणे बदललीस शाम! हरवून गेली आहे आमची जुनी शाम. ती धडाडीची, अन्याय किंचितही सहन न करणारी शाम आहे कुठे?”

शाल्मली काहीच नाही बोलली.

कॉफी आली. शाल्मलीने श्रीशला हॉट चॉकलेट ग्लासनेच पाजवले. मग त्याचे ओठ पुसून कॉफी घेतली.

सॅम म्हणाला, चल आता आधी काही माझ्या मनात आहेत त्या टेस्टस करू, मी एक फॉर्म देतो भरायला तो घरी भर आणि मला स्कॅन पाठव.

तिघे ऑडीओमेट्री लॅबमधे गेली. नेहमी सगळयांकडे हसत हसत जाणारा श्रीश आज मात्र बुजला. नर्सकडे जाईना. मग शाल्मली म्हणाली “मी जवळ थांबू का?”

“हो हो मॅम, तुम्ही घेऊन बसा त्याला.”

मग आधीच केलेल्या एबीआर आणि ओईआर या हियरींग स्क्रीनींगच्या टेस्टस रीपीट केल्या. साधारण १५ १५ मिनीटांच्या टेस्ट होत्या.

मग सॅमने अधिक डिटेल्ड अशा डायग्नोस्टिक टेस्टस करायला सांगितल्या. रिझल्टस् स्क्रीनवर त्याला दिसतच होते. शाल्मलीने संपूर्ण वेळ श्रीशला मांडीवरच बसवले होते. जेणेकरून तो शांत बसेल.

त्यानंतर सॅम म्हणाला की “काही वेळेस आम्ही हियरींग एड्स जे ॲम्प्लीफायरचे काम करतात, वापरायला देतो पण श्रीशच्या बाबतीत ते वेळ घालवण्यासारखे होईल.”

शाल्मलीचा चेहरा बावरल्या सारखा झाला. “डिटेल्ड रिपोर्ट आल्यावर आपण बोलूच पण श्रीश अजूनही शांत बसलाय तर काही गोष्टी मी तुला सांगाव्या असं मला वाटतं. मुळात ऐकण्याचं कार्य कसं होतं ते आपण ८ वी त शिकलो होतो आठवतंय? कानाचे तीन मुख्य भाग, बाह्य कर्ण, मध्य कर्ण, ”

“आणि आंतरकर्ण! “शाल्मलीने त्याचे वाक्य पूर्ण केले.

“शाब्बास!”

“सॅम, गेलं वर्षभर मी आंतरजाल पिंजून काढलय या विषयावर.”

“आंतरजाल?”

“सोप्या भाषेत इंटरनेट”

“ओह! छान!”

“तर बाहेरचा ध्वनी गोळा करून आत नेण्याच काम आऊटर इयरचं. खास नळीसदृश्य अवयवातून ध्वनी मध्य कानातल्या पडद्यावर आघात करतो . हवेच्या दाबातील फरकाने आतील पडदा ही कंप पावतो. आंतरकर्णातील गोगलगायीसारखा भाग ज्याला कोक्लिया किंवा कर्णावर्त म्हणतात ते ध्वनीमुळे निर्माण झालेल्या कंपनांना विद्युत लहरीत रुपांतरीत करते आणि खास श्रवण मज्जातंतूंद्वारे ते मेंदूपर्यंत

पोहोचवले जाते. मेंदूकडे मग ध्वनीची नोंद होते म्हणजेच आपण ऐकतो. ही झाली थोडक्यात श्रवण कसे होते ही माहिती.

शाम, लहान मुलांमधे ऐकू न येण्याचे सर्वसाधारण पणे दोन प्रकार असतात. पहिला प्रकार ज्यात काही कारणाने ध्वनी कानांपर्यंत पोहोचत नाही. मध्य कानातील विकृत रचनेमुळे, कानात जास्त द्रावाचे प्रमाण, रोगजंतूंची लागण अशी अनेक कारणे असू शकतात. ज्याला आपण कंडक्टीव्ह लॉस म्हणतो. म्हणजेच बाह्य कर्णातून मध्यकर्णापर्यंत ध्वनी न पोहोचणे.

दुसरा प्रकार ध्वनी लहरींमुळे पडद्याचं कंपन तर होतं पण निर्माण झालेल्या विद्युतलहरी मेंदूपर्यंत पोहोचवल्या जात नाहीत. जर नस किंवा या लहरी वाहून नेणारे हेअर सेल्समधे बाधा असेल तर. अशा वेळेस हियरींग एडस्‌चा फारसा उपयोग नसतो. तेव्हा कोक्लीअर इम्प्लांट ही शस्त्रक्रियेद्वारे करण्यात येणारी उपचार पद्धती वापरतात.'' ''हो हे ही वाचलय मी.'' ''शाम, श्रीशच्या बाबतीत दुसऱ्या प्रकारातील बहिरेपण असावं असा माझा प्राथमिक अंदाज आणि ते संपूर्ण असावं. त्यामुळे कर्णावर्त किंवा कोक्लीअर इम्प्लांट हा एकच उपाय मला दिसतो. सर्वसाधारणपणे हे एक कमी जोखीम असलेलं ऑपरेशन मानलं जातं. यशाचं प्रमाणही बरंच आहे. खरंतर सहाव्या महिन्यातही हे करता आलं असतं. ज्याने श्रीश बोलायला व्यवस्थित लागला असता.''

शाल्मली प्रचंड अस्वस्थ झाली.

“अजूनही काही फार बिघडलेलं नाही शाम. पुढे स्पीच थेरपी आणि तुझ्या प्रयत्नांनी तो नॉर्मल मुलांसारखा ऐकू बोलू लागेल यात शंका नाही.मग त्याने तिला काही लिंक्स दिल्या. घरी जाऊन हे विडीओ पहा आणि माहिती वाच.यात अनुवंशिकतेचं कारण ही असू शकतं. असेल तर निर्णय घेणं सोपं असतं कारण मग बहिरेपणाचं कारण ठोसपणे माहित असतं. असो. आपण दोन दिवसांनी पुन्हा भेटूच. वाचताना, काहीही शंका आली तर मला कधीही फोन कर. दिलेला हिस्टरी फॉर्म नीट भरून पाठव.”

शाल्मलीने एक दीर्घ श्वास घेतला. ती निघायला उठली, परत बसली. मग म्हणाली “या सगळ्याचा साधारण खर्च किती होईल?” सॅम काही बोलणार तेवढ्यात, पुढे म्हणाली, “करायचाच आहे उपचार, वेळ नाही दवडायचाय मला, पण मला साधारण खर्च सांग.”

“शाम, मी असताना तुला खर्चाची काय काळजी? कोणी तुला नया पैसा नाही मागणार.”

“नाही सॅम. तू माझा बालमित्र आहेस आणि जे माझ्या बाळासाठी करशील ते सर्वोत्तम असेल याची खात्री मला आपली मैत्री देते. पण आर्थिक बाजू मीच सांभाळणं योग्य. मी ती सांभाळेनही पण जरा उशीर

लागेल आणि आता मला थांबायचं नाही. मी कंपनीमधे लोनसाठी अप्लाय केलच आहे, शिवाय तू आहेस त्यामुळे पैशांची जुळवा जुळव होईपर्यंत उपचार नाही थांबवायचास आणि ती खूप मोठी मदत आहे माझ्यासाठी. पण तरी मला कल्पना हवी.''

तिच्या दृढ पण शांतपणे बोललेल्या वाक्यांनी सॅम गप्प झाला. विचारात पडला. मग हसला किंचित. 'हं, आहे आत कुठेतरी आमची जुनी शाम!' मनात म्हणाला.

''ठीक आहे, उद्याच कळवतो तुला फोन करून.''

मग शांत मनाने शाल्मली निघाली.सॅमला अजून बरेच पेशंटस पहायचे होते. त्याने एकदा श्रीशच्या डोक्यावरून हात फिरवला. शाल्मली बाहेर पडली.

घरी आल्यावर शाल्मलीने श्रीशला वरण भात भरवला. स्वत:ही चार घास पोटात ढकलले. श्रीशला लगेच झोप लागली. 'दमलं बाळ माझं' असं म्हणत तिने डोक्यावरून हात फिरवत ओठ कपाळावर टेकले. श्रीशने झोपेत हात गळ्यात टाकला तिच्या. दोघांचाच असा कोश तयार झाला. शाल्मलीला तो नाजूक हात दूर करवेना. तशीच पडून राहिली ती किती वेळ आपल्या सुकुमार बाळाजवळ.

पण असं झोपून जाऊन चालणार नव्हतं. मग नाईलाजाने उठली. तो फॉर्म काढला. बऱीच माहिती विचारली होती. त्यात आधी कुटुंबात कोणाला काही अशी समस्या होती का हा प्रश्न निरनिराळ्या संदर्भात परत परत विचारलेला दिसत होता.

क्षणभर शाल्मली थांबली. मग तिने फोन उचलला. साडेनऊ वाजत होते. शंतनूचा नंबर लावला. नो रिप्लाय आला. चार पाच वेळा लावूनही उचललाच नाही.

सहाव्या कॉलला उचलला. पलीकडून एका तरुणीचा आवाज आला. शाल्मली दचकली. नंबर बरोबर लागलाय याची तिने खात्री करून घेतली.

“हॅलो?”

“हॅलो? कोण बोलताय?”

“स्नेहल हियर.”

“स्नेहल? यावेळी?” शानूची ही नखरेल सेक्रेटरी शाल्मलीला आठवली.

“शंतनू?”

“ओह्ह, मॅम, अं, सर झोपलेत. उठवू का?”

शाल्मलीचा पारा पाहता पाहता चढला. तिने, फोन बंद केला.

तिने वैतागून फोन गादीवर फेकला. डोकं धरून ती किती तरी वेळाने बसून राहिली. पलीकडून शंतनूचा चिरपरिचित 'हॅलो' ऐकू आला. शाल्मलीला फोन बंद करावासा वाटत होता. पण मग श्रीशचा विचार येऊन तिने दगडी स्वरात विचारले, “तुमच्या कुटुंबात कोणाला जन्मत: किंवा नंतर निर्माण झालेलं बहिरेपण होतं का?”

“व्हॉट?”

तिने प्रश्न परत एकदा शांतपणे सावकाश विचारला.

“अं, नाही, का?”

“हवी होती जरा माहिती. श्रीश ची एक सर्जरी ठरतेय त्यासाठी ही माहिती महत्वाची आहे.”

“ओके, बाय”

“हॅलो, अगं, ऐक ना”

पलिकडून फोन केव्हाच बंद झाला होता.

शंतनूने परत लावला, पण फोन बिझी लागला.

“श्रीश”! ठेवलं आपण ठरवलेलं नाव त्या मुलाचं. सर्जरी ठरतेय?” त्याने परत परत फोन लावून पाहिला, दर वेळी बिझी टोन.

शाल्मलीने शंतनूचा फोन बंद करून शंतनूच्या आईचा नंबर फिरवला. दुसऱ्या रिंगला फोन उचलला त्यांनी. “हॅलो, आ.. शंतनूच्या आई, मी शाल्मली.”

“हं. बोल. कशासाठी फोन आता?”

क्षणभर पलिकडे शांतता. मग शाल्मली म्हणाली, “श्रीश, माझा मुलगा, त्याच्या कानाची सर्जरी करायची आहे.”

“तुला जे करायचं ते तुझं तू कर. पैशासाठी फोन केला असशील तर एक दमडीही मिळणार नाही, समजलं?”

“पैसे नको आहेत. पण माहिती हवीय.” शांतपणे शाल्मली म्हणाली.

“कसली माहिती?”

“आपल्या, म्हणजे तुमच्या कुटुंबात, तुमच्या माहेरी अथवा सासरी जन्मत: किंवा पुढे बहिरेपणाची समस्या होती का? अगदी मागच्या पिढ्यांमधे?”

“छे, छे, भलतच काय? मुळीच नाही.”

“अगं कोणाचा फोन एवढ्या उशीरा? कोणावर ओरडते आहेस? आण बघू, मला दे फोन.” शंतनूचे वडिल आतून आले आणि त्यांनी फोन घेतला.

“हॅलो, ”

“हॅलो, मी शाल्मली. मला जरा माहिती हवी होती.”

“कशी आहेस शाल्मली? मी खूप समजावलं गं शंतनूला, पण ऐकतंय कोण?”

“बाबा, आपल्या कुटुंबात म्हणजे तुमच्या किंवा आईंच्या, अगदी आधीच्या पिढ्यांमधे जन्मत: बहिरेपण होतं का कुणाला?”

“अं, ” तिथून शंतनू ची आई, खुणेने सांगू नका असं बजावू लागली पण अचानक त्या खाणाखुणा पाहूनच बाबांना ते दूरचे चुलत काका आठवले शंतनूच्या आईचे.

“अं, अगं हो हो, हिच्या माहेरी तिचे दूरचे म्हणजे चुलत काका होते मूक बधीर. सगळं खुणांनी चालायच.”

“ओह, थॅंक यू बाबा, मोलाची माहिती दिलीत. ठेवते फोन.”

“अक्कल काय गहाण ठेवता का हो? कशाला नको ते सांगायला गेलात?”

“अगं, नव्हतंच लक्षात माझ्या. तू त्या खाणाखुणांनी आठवण करून दिलीस म्हणून बरं झालं.”

शंतनूच्या आईने कपाळावर हात मारून घेतला.

शाल्मलीने फोन बंद केला. शंतनूचे बरेच मिस्डकॉल्स दिसले तिला. क्षणात तिच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि फोन बाजूला फेकला तिने. तर तो वाजायलाच लागला. उचलून तिने रागारागाने बोलायला सुरवात केली,

“निलाजऱ्या माणसा लाज नाही वाटत तुला जराही? तुझ्याच कडून मिळालाय हा आजार माझ्या बाळाला, तो उपचारा अभावी ना ऐकू शकतोय ना बोलू, ”

“शाम, हॅलो, शाम, अगं काय झालं, शांत हो, काय झालं?”

“ओहहहहहह, सॅम...,

दोन क्षण ती गप्पच बसली. मग म्हणाली “सॅम, माफ कर, मला वाटलं...”

“शंतनूचा फोन आहे”

“हो”

शाल्मली हुंदके दे देऊन रडू लागली. तिचं संपूर्ण शरीर गदगदत होतं. काही केल्या तिला रडू आवरेना.

रडत रडतच “सॅम ...मी ...नंतर ...कॉल करते” असं म्हणाली.

“ठीक आहे, पोटभर रडून घे एकदाच शाम, परत नाही कधीच रडायचंय लक्षात ठेव.”

मी थोड्या वेळाने करतो परत फोन.

शाल्मली शांत झाली थोड्या वेळाने. तिने सॅमला मेसेज पाठवला. ‘मी ठीक आहे आता. तू दिलेल्या लिंक्स आणि विडीओ पहाते. फॉर्मही पूर्ण करते. शंतनूच्या आईच्या कुटुंबात जन्मजात बहिरेपणाची हिस्टरी आहे. उद्या सविस्तर बोलू’

मग तिने सगळी माहिती, विडीओ, काळजीपूर्वक पाहिला. एका विडीओमधे संपूर्ण कोक्लियर इंम्प्लांट सर्जरी दाखवली होती. ती पाहताना शाल्मली एकीकडे जरा घाबरलीच तर दुसऱ्या बाजूला वैद्यकिय विज्ञानाविषयी तिच्या मनात आदर दाटला. जेव्हा त्या विडीओमधे कोक्लियामधे नस सदृश्य वायर घातली गेली तेव्हा तर तिचा श्वासही क्षणभर थांबला. सगळं पाहिल्यानंतर मात्र तिचा विश्वास दुणावला.

एका डॉक्टरने संपूर्ण माहितीही दिली होती. त्यात त्याने कोक्लिअर इम्प्लांट कोणासाठी योग्य, कोणासाठी अयोग्य सर्व माहिति मुद्देसूद सांगितली. यश मिळण्याचे सर्वसाधारण प्रमाण किती हेही सांगितले. सगळं काही स्पष्टपणे सांगितलं, की रोग्याला, नातेवाईकांना

निर्णय घेणं किती सोपं जातं असंच वाटलं तिला. मग तिनेही तिच्या पद्धतीने आंतरजालावर छानबिन केली. शस्त्रक्रिया झाल्यावर काय काळज्या घ्यायला लागतात, ही आत बसवलेली उपकरणे किती काळ चांगली टिकतात? खर्चाबद्दलही माहिती मिळते का शोधले तेव्हा शस्त्रक्रियेचाच खर्च साधारण ७ते १० लाख होणार होता. हे फक्त एका कानासाठी. शिवाय नंतर स्पीच थेरपी वगैरे साठी वेगळा खर्च येणारच.

तिचं एकदम अवसान गळाल्यासारखं वाटलं. कंपनीकडून लोन मिळालंही असतं पण दर महिन्याला जो जबरदस्त हप्ता भरावा लागला असता, त्यातून उरलेल्या पैशात पुढची ट्रीटमेंट होणं, श्रीशची शाळा सुरू झाली असती वर्ष दोन वर्षात, त्याची फी, सगळंच एकदम अंगावर आल्यासारखं झालं तिला.

“सगळी सोंगं आणता येतात, पण पैशाचं सोंग नाही आणता येत” अचानक तिला बाबांचे बोल आठवले.

तिने एक दीर्घ सुस्कारा सोडला. १२ वाजून गेले होते. पलंगावर आडवी झाली, झोप येणं शक्यच नव्हतं.

पहाटे पहाटे केव्हातरी डोळा लागला असावा. गजर वाजला तेव्हा डोळे उघडेनात. पण उठणं भाग होतं, तशीच जबरदस्तीने उठली आणि यंत्रवत कामं उरकू लागली.

--------------

शंतनूने बरेच कॉल केले तरी शाल्मलीचा फोन बिझीच लागला.

त्याला खरंतर मित्राला फोन करायचा होता. पण बरीच रात्र झाल्याने त्याने तो विचार बाजूला ठेवला.

तेवढ्यात त्याचा फोन वाजला. आईचा होता फोन. तिने सगळे सांगितले. कसा शाल्मलीचा फोन आला, कसं तिने उडवून लावलं, कसं त्याच्या बाबांनी नको ती माहिती शाल्मलीला पुरवली वगैरे वगैरे.

शंतनूचा चेहरा पाहता पाहता बदलत गेला. जे व्हायला नको होतं ते सगळं झालं होतं. आणि आज तरी तो काहीच करू शकत नव्हता.

परत फोन करावा का शाल्मलीला? आणि काय सांगणार? बराच वेळ विचार करत तो तसाच बसला., आईचा फोन, म्हणजे कदाचित मी ही असाच बहिरा... दचकलाच तो या विचारासरशी... मग अजून एक विचार ... कोण जाणे मला होणारं प्रत्येक मूलच बहिरं... तो झटकन जागेवरून उठला. हा विचार प्रचंड अस्वस्थ करून गेला त्याला. रात्रभर तळमळत राहिला.

---

सकाळी शाल्मली थकवा घेऊनच ऑफिसमधे पोहोचली. डोकं जड, डोळे चुरचुरत होते. मन काळजीच्या ओझ्याने दबलेले. श्रीशला पाळणाघरात सोडून ती तडक केबीनमधे गेली. मेल्स चेक करून प्रशांतला इंटरकॉमवरून फोन केला. “सर, महत्वाचं बोलायचंय.”

“अगं, ये ना मग, ” प्रशांत सहजतेने म्हणाला.

ती लोनचा अर्ज घेऊन निघाली. आल्या आल्याच तिने बोलायला सुरवात केली. “श्रीशच्या आजारा बद्दल तुम्हाला माहितच आहे. त्याची एक सर्जरी केली तर तो ऐकू शकेल. आणि मग बोलूही लागेल. साधारण खर्च सध्या तरी १० लाखाच्या आसपास आहे. मी लोन साठी अप्लाय केलय पण आज त्यांचा रिप्लाय आलाय की ऑफिस हेडचा रेफरन्स लागेल कारण अमाऊंट जास्त आहे.”

“बघू ॲप्लिकेशन”

त्याने नीट वाचलं. मग म्हणाला “तू रीपेमेंट साठी जास्त वेळ मागून घ्यावास. दोन ऐवजी तीन वर्ष माग. बॉण्ड द्यावा लागेल पण मला वाटतं ते ठीक आहे. मी अप्रूव्ह करतो माझ्याकडून. गरज वाटली तर हॉस्पिटलचं लेटर मागतील, ते घेऊनच ठेव.”

त्याने पटापट सह्या केल्या आणि सोबत स्वत:चे शिफारसपत्र जोडले, आणि फास्ट मेल मधून पाठवण्याच्या गठ्ठ्यात ठेवले.

“थँक यू सो मच सर”

“माय प्लेजर”

मग ती जाण्यासाठी उठू लागली तेव्हा त्याने बसण्याची खूण केली. ती बसली परत.

“शाल्मली, माझ्या वागण्यातून तुला तुझ्याविषयी मला वाटणारं आकर्षण, आपुलकी, जाणवलं असेलच, जरी मी स्पष्ट तुला कधी काही बोललो नाही. तुझ्या सध्याच्या परिस्थितीत तुला बाकी काही नकोच सध्या, असं वाटणं स्वाभाविकच आहे. तसं तू परवा बोलूनही दाखवलंस. पण आपली एक उत्कृष्ट टीम बनली आहे आणि ती उत्तम परफॉर्मन्स देत आहे. अशात स्टार परफॉर्मरला दुसऱ्या विभागात टाकणं कोणाच्याच हिताचं नाही. तेव्हा आपण पर्सनल गोष्टी बाजूला सारून परत जोमाने कामाला लागावं असं मला वाटतं. शिवाय तुझ्या मुलाच्या शस्त्रक्रियेदरम्यान तुला बऱ्याच रजा, घरून कामाची सवलत वगैरे लागेल. अशा वेळेस माहितीतली टीम मदत करेल. नव्या टीमला तसे करता येईलच असे नाही. तू नीट विचार करून मला सांग. माझ्याकडून यापुढे पुन्हा बाकी कोणत्याच गोष्टीची वाच्यता होणार नाही कामाचे विषय सोडून.”

शाल्मली पाहतच राहिली. मग म्हणाली, “सर परवा मी खूप रूडली वागले बोलले तुमच्याशी. आय ॲम एक्स्ट्रीमली सॉरी. तुमचा अपमान करण्याचा हेतू नव्हता, पण या मार्गावर पुढे जाणे शक्य नसताना तसे न सांगणे फसगत केल्यासारखं होईल असं वाटलं म्हणून जरा स्पष्ट बोलले एवढच. मलाही याच टीममधे काम करायला आवडेल कारण तुमच्याकडून अजून खूप काही शिकण्यासारखं आहे. अगदी आत्ताही तुम्ही ज्या समतोल दृष्टिकोनातून या सगळ्याकडे पाहताय त्यातूनही बरंच काही शिकले मी. थँक यू व्हेरी मच सर!”

प्रशांतने पसंतीची मान डोलावली. “ऑल द बेस्ट शाल्मली. कधीही कोणतीही मदत लागली तर संकोच न करता सांग. हा तुझा सहकारी नक्की मदतीला तयार असेल!”

शाल्मलीने मान हलवली.

काल रात्रीपासून चढलेलं मनावरचं मळभ किंचित कमी झाल्यासारखं वाटलं तिला.

परत केबीनमधे येत तिने प्रोजेक्टवर सुरू असलेलं काम करायला सुरवात केली. जितक्या वेगाने ती हे काम संपवेल तेवढा पुढे तिला सर्जरी दरम्यान वेळ मिळणार होता.

---

सॅम कालचे रिपोर्टस स्टडी करत होता. तेवढ्यात त्याच्या मित्राचा फोन आला.

“अरे मी पाठवलेले रिपोर्टस पाहिलेस का? “

“नाही रे, बोललो आपण पण मिळाले नाहीत मला?”

“काय सांगतोस? मेल चेक कर”

“नाही आले रे, परत पाठव. थांब मी तुला टेस्ट मेल पाठवतो त्यावरच ॲटॅच कर”

“बरं, पण मित्रा, जरा लगेच पाहशील का? पोराचा बाप मित्रय माझा, मागे लागलाय केव्हाचा.”

“पाठव लगेच मी बघून सांगतो आजच”

“धन्यवाद दोस्ता. हं आलीय टेस्ट मेल. लगेच पाठवतो.”

“ओके.”

मेल लगेचच आली. ॲटॅचमेंटस पहाताना काहीतरी ओळखीचं वाटलं सॅमला. मग लक्षात आलं हे तर श्रीशचे रिपोर्टस. परत नीट चेक केले. हॉस्पिटलही तेच, तारखाही, बेबी कोड नं ही तोच. शंकाच उरली नाही. त्याने ताबडतोब मित्राला फोन केला, त्याला म्हणाला, “पाहिले रिपोर्टस, पण हे वर्षापूर्वीचे, आता परत करावे लागतील, घेऊन यायला सांग.”

“सांगतो, पण प्रथमदर्शनी काय वाटतंय? क्युअरेबल आहे?”

“हो हे रिपोर्टस पाहून तरी वाटतंय की होईल करेक्शन.”

“गुड, धन्यवाद दोस्ता.तुझा देतो नंबर, तो बोलेल.”

“ओके”

“बाय”

“बाय”

सॅमला एकदा वाटलं शामला कळवावं हे. पण मग वाटलं, नको, आधी फोन तर येऊ दे.

# 5

आज शाल्मली खूप खुशीत होती. कंपनीने तिचे लोन सॅंक्शन केले होतेच शिवाय खास शस्त्रक्रियेच्या वेळेस पूर्ण एक महिन्याची पगारी रजा पण दिली होती. तुमच्या कठोर परिश्रमांचा कंपनीतील यशात मोठा वाटा आहे आणि तुमच्या मुलाच्या शस्त्रक्रियेसाठी कंपनी काही करू शकत असेल तर कंपनीला आनंदच वाटेल असं एक लेटरही तिला पाठवण्यात आले होते.

श्रीशच्या शस्त्रक्रियेपूर्वीच्या सर्व तपासण्या पूर्ण झाल्या होत्या आणि त्याच्या शस्त्रक्रियेला सर्व तज्ञांनी हिरवा कंदील दाखवला होता.

आता फक्त शस्त्रक्रियेची पूर्वतयारी आणि शस्त्रक्रिया एवढ्याच गोष्टी बाकी होत्या. उद्याच काही महत्वाच्या सूचना देण्यासाठी आणि शस्त्रक्रियेच्या ठाम निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी तिला आणि श्रीशला हॉस्पिटलमधे दाखल व्हायचे होते.

आज ऑफिसमधील सर्व कामं संपवून तात्पुरता चार्ज दिनेशला देऊन तिला निघायचे होते. त्या प्रमाणे ती भराभर, दिनेशसाठी सूचनांचा मेल लिहीत होती.

केबीनच्या दारावर टकटक झाली आणि पाठोपाठ प्रशांत आणि दिनेश आत आले. ती उठत होती, प्रशांतने तिला बसण्याची खूण केली.

दोघे येऊन बसताच प्रशांत म्हणाला, “दिनेश, शाल्मली कडून सध्याची तिच्याकडची प्रोजेक्टस तू हॅंडल करणार आहेस. तेव्हा ती सगळी नीट समजाऊन घे. धीस इज ए वंडरफुल ऑपॉर्च्युनिटी टू प्रुव्ह युवरसेल्फ.”

“येस सर, आय विल डू माय बेस्ट”

“गुड!”

“शाल्मली, तुझ्या बाजूने सगळी तयारी झालीय? शक्यतो पहिले काही दिवस तरी तुला फोन करून डिस्टर्ब करावं लागू नये अशीच आमची सगळयांची इच्छा आहे.”

“हो सर, मी सगळे डिटेल्स, रेफरन्सेस वगैरे ची एक मेलच दिनेशला पाठवतेय, तुम्हाला कॉपी मार्क करतेय. क्लायंटसनाही वेल इन ॲडव्हान्स इंटीमेशन पाठवलीय. गेल्या दोन आठवड्यापासून दिनेशला सगळया कॉरस्पॉण्डन्समधे इन्व्हॉल्व्ह केलय. त्यामुळे ही इज वेल अवेअर अबाऊट ऑल द प्रोजेक्टस. आय ॲम शुअर एव्हरीथींग विल बी डन ॲज पर द प्लॅन.”

“गुड, गुड.”

“आणि मी फोनवर कायम अव्हायलेबल असेनच. पहिले तीन दिवसच क्रुशियल आहेत. त्यानंतर एक आठवड्याने मी पार्शली का होईना घरून काम बघायला सुरू करू शकेन असं मला वाटतं.”

“फाईन देन. ऑल द बेस्ट! आम्ही सगळे कधीही काही लागलं तरी आहोत. कंपनीच्या लोकांचा ब्लड ग्रुपचा डेटा आहे. आपल्या मेडिकल ऑफिसरशी बोलून ठेव.”

“ब्लडसाठी घरचेच लोक मिळालेत सर. माझा भाऊ, आणि त्याचे दोन मित्र त्या दिवशी हॉस्पिटलमधे येऊन ब्लड देऊन जातील.”

“सो, एव्हरीथींग इज रेडी?”

“येस सर!”

————-

शाल्मली तिची आणि श्रीशची बॅग तयार करण्यात गुंतली होती तेव्हा घरचे सगळेच आले. आईने काही कोरडा खाऊ आणला होता. अमेयने श्रीशसाठी मिकीचे ग्रिटींग कार्ड बनवले होते आणि त्यावर अमेय आणि अनुजकडून असे लहान भावाचे नावही लिहीले होते. “मी येतो म्हणतो तुझ्याबरोबर उद्या, ” बाबा परत म्हणाले. “बाबा, उद्या काहीच करायचं नाहीय. उगीच अवघडून बसून राहावं लागेल. परवा या सकाळी तुम्ही दादा बरोबर.” “हो, आणि मी दुपारचा डबा घेऊन येईन. वहिनी म्हणाली.” “अगं, खरंतर तडतड करत नकोच येऊ म्हणते मी. कॅंटीनमधे सगळं हायजेनिक आणि चांगलं मिळतं. त्यापेक्षा तुम्ही संध्याकाळी या दोघी. श्रीश पण जरा हुशारीत आला असेल तोपर्यंत. त्याला काही खायला द्या म्हणाले तर तसा फोन करेन मी.”

“बरं बाई, तू म्हणशील तसं, ” आई म्हणाली. लेकीचा दुसऱ्याला कमीत कमी त्रास व्हावा असा प्रयत्न तिला कौतुकास्पद वाटला.

“बाकी सगळी तयारी झाली?”

“हो बाबा!”

---

शंतनूला मित्राने कळवताक्षणी त्याने सॅमचा नंबर फिरवला. रिपोर्टस बद्दल सांगताच सॅम म्हणाला घेऊन या बाळाला. शंतनू म्हणाला “सध्या मी नाही येऊ शकत, पण बाळाला त्याची आई घेऊन येईल अशी व्यवस्था करतो. तुमची एक मदत हवी होती पण.”

“कोणती?”

“हे बाळ ऐकू बोलू शकेल त्यासाठी वाट्टेल तो खर्च येऊ दे. मी तो देईन पण बाळाच्या आईला हे कळू देऊ नका. तिला चालणार नाही.”

“का?”

“डॉक्टर ते फोनवर नाही सांगू शकत मी. प्रत्यक्ष भेटल्यावर सांगेन.”

सॅम विचारात पडला. आतापर्यंत जो काही शंतनू बद्दलचा त्याचा ग्रह होता त्यात हे त्याचं बोलणं बसत नव्हतं.

“ठीक आहे. पण तपासण्या झाल्याशिवाय काहीच सांगता येणार नाही.”

“हो, तपासण्या करण्यासाठी बाळ तुमच्या हॉस्पिटलमधे लवकरात लवकर पोहोचेल असा प्रयत्न करतो मी.”

“गुड”

सॅमने त्याला मुद्दामच काही सांगितले नाही. शामला ते आवडणार नाही असं वाटलं त्याला.त्यानंतर शंतनू शाल्मलीला फोन करत होता आणि ती कट करत होती. तिला या शस्त्रक्रियेपर्यंत कोणतीच नकारात्मक भावना नको होती.

तिने घरीही कोणालाच काही सांगितले नव्हते तिच्या आणि शंतनूच्या, किंवा सासू सासऱ्यांच्या फोनवरील संभाषणाबद्दल. झाला तेवढा आई वडिलांना त्रास खूप झाला असंच वाटत होतं तिला. शंतनू मात्र दिवसें दिवस अस्वस्थ होत होता. शेवटी त्याने प्रत्यक्षच जाऊन भेटायचे ठरवले.

सकाळी शाल्मली श्रीशला घेऊन हॉस्पिटलमधे पोहोचली. निघताना आईने देवापुढे निरांजन लावले. श्रीशला अंगारा लावला. त्याच्या चेहऱ्यावरून हात फिरवला. "आई, काळजी करू नकोस. मी सर्व खातरजमा करून घेतलीय. शिवाय सॅम करणाराय ऑपरेशन. त्यामुळे काही काळजी नाही."

"हो हो, सगळं सुरळीत होईल." दादाने टॅक्सी बोलावली. सगळे खालपर्यंत पोहोचवायला आले.

श्रीश टॅक्सीत बसल्यावर जामच खूश झाला. उड्या मारून मारून हाताने अमेय आणि अनुजकडे झेपावू लागला. त्यांना आत बोलावू लागला. त्याच्या त्या निरागस खेळाने सगळ्यांनाच क्षणात हळवं केलं. ओठांवर हसू नि डोळ्यात आसू अशी सर्वांचीच परिस्थिती झाली.

टॅक्सी हलली. श्रीश खिडकीतून बाहेर पहाण्यात रमला.

शाल्मलीला अचानक एकदम दडपण आलं. 'आपला निर्णय बरोबर ठरेल ना? माझं बाळ ऐकू बोलू लागेल ना?' स्त्री चिवटपणे अनेक समस्यांना झेलते, त्यातून मार्गही काढते, पण एखाद्या कमकुवत क्षणी तिला कोणाची तरी साथ हवीशी वाटते.

शाल्मलीला मात्र त्या कमकुवत क्षणाला शरण जाणं मान्य नव्हतं. तिने परत परत मनाला बजावलं. 'ही लढाई तुझी एकटीची आहे. तुला एकटीलाच ती लढायची आहे. जन्माचा साथीदार म्हणून ज्याची निवड

केलीस ती चुकली. पण म्हणून कमकुवत क्षणाची गरज म्हणून परत साथ शोधू नकोस. मदत अशीच घे जी न्याय्य असेल आणि ज्याची परतफेड होऊ शकेल. कोणतंही नातं गरजेवर बेतलेलं असू नये कधीच, नातं जोडायचं तर बरोबरीने आनंद देता घेता यावा.'

शाल्मली दचकलीच. हे कुठे निघाले विचार माझे.

मग तिने आपले मन श्रीशकडे वळवले. तो जाम खुशीत होता. पाहता पाहता हॉस्पिटल आलंच.

शाल्मली हॉस्पिटलमधे पोहोचली तेव्हा रिसेप्शनमधे बरीच गर्दी होती. सकाळीच ज्या शस्त्रक्रिया व्हायच्या होत्या, होत होत्या ते सर्व नातेवाईक दाटीवाटीने बसले होते.

कोणी अस्वस्थ फेऱ्या घालत होते तर कोणी जपाची माळ ओढत डोळे मिटून बसले होते. एखादीचा धीर खचत होता तर बाकी गोतावळा तिला धीर देत होता. कोणी एखाद्याला थोडं खाऊन घेण्याचा आग्रह करत होतं, तर कोणी पैशाची बंडलं कामी येतील ठेव म्हणत हातात कोंबत होतं. एकंदरच माणुसकी आपलं साजिरं रुप लेवून, ममतेने वावरत होती. शाल्मली तिच्या बॅग्ज आणि श्रीशला घेऊन रिसेप्शनजवळ पोहोचली. बॅग्ज पायाजवळ ठेवत तिने रिसेप्शनिस्टला फाईल दिली.

“मॅम, बसून घ्या. पेपर्स रेडी झाले की आवाज देते. रुम बुक करून ठेवलीय तुमच्यासाठी डॉक्टर समीरनी कालच.”

शाल्मली तिथेच एका खुर्चीवर बसली. श्रीश मांडीवरच होता. शेजारी एक सात -आठ वर्षांची मुलगी बसली होती. तिचा हात खुर्चीच्या हातावर होता. श्रीशने तो धरला. त्या मुलीलाही गम्मत वाटली. तिने श्रीशच्या गालाला हात लावला तसा तो खुदकन हसला. ती मुलगीही हसली. त्या दोघांना बघून शाल्मलीही हसली. श्रीशची आणि त्या मुलीची लगेच गट्टी जमली. श्रीश सुळकन शाल्मलीच्या मांडीवरून उतरला आणि त्या मुलीच्या खुर्चीजवळ जाऊन तिच्याशी खेळू लागला. दोघेही हसू लागले. ती मुलगी एकटीच बसलेली दिसली. तिला काही विचारावं तेवढ्यात रिसेप्शनिस्टने आवाज दिला. शाल्मलीने सवयीने श्रीशला उचलले आणि ती काऊंटरजवळ गेली. रिसेप्शनिस्टने तिला काही पेपर्स वर वाचून सही करायला सांगितले. श्रीशला त्या मुलीशी खेळायचं होतं, तो उसळ्या मारू लागला आणि खाली उतरून त्या मुलीकडे गेला. शाल्मलीने वळून पाहिले तर दोघे तिथेच खेळत होते. मग तिने पेपर्स वाचायला सुरवात केली. एक एक करत सह्याही करू लागली. एका पेपरवर शस्त्रक्रियेच्या विवेचनात दोन्ही कान असं लिहीलं होतं. तिला तर एकाच कानाची शस्त्रक्रिया करण्याचं बोलणं झालेलं आणि त्याचाच खर्च बराच होणार असल्याचं आठवत होतं. तिने रिसेप्शनिस्टला तसं विचारताच ती म्हणाली की “डॉक्टर समीरनीच पेपर्स कसे तयार करायचे ते सांगितले. तुम्ही

त्यांच्याशीच बोला, पण ते आत्ता ओटीमधे असतील. दुपारनंतरच भेटतील.''

''पण त्यांच्याशी बोलणं झाल्याशिवाय मी सही नाही करू शकत यावर. खरंतर हे पेपर्स बदलावेच लागतील तुम्हाला.''

''काही हरकत नाही मॅम, हा एक पेपर मी वेगळा मार्क करून ठेवते. तुमचं डॉक्टरांशी बोलणं झाल्यावरच तुम्ही सही करा. ॲडमिशन प्रोसेस करून घेऊ. ही सही उद्याच्या ऑपरेशन पूर्वी मात्र आठवणीने करा.''

एवढं बोलून ती वळली, तेवढ्यात एक बराच उंच माणूस श्रीशला उचलून तरातरा तिच्या दिशेने येताना दिसला. मागोमाग ती मगाची हसरी पण आता रडवेली झालेली मुलगी.

''तुमचाय ना हा मुलगा?'' कर्कश पणे तो ओरडला. शाल्मली दचकलीच एकदम. ''लक्ष कुठय मग? आत्ता त्या जिन्याच्या बारमधून खाली आपटला असता'' शाल्मलीने दचकून जिन्याकडे बघितलं. नकळत श्रीशला घ्यायला हात पुढे झाले. पण त्या माणसाने श्रीशला दिले नाही तिच्याकडे. ''कशाला जन्माला घालतो आपण मुलं? नीट लक्ष ठेव त्याच्यावर. नाहीतर रडशील जन्मभर माझ्यासारखी. ती माझी पोर, नाही सांभाळू शकलो गच्चीवर, आता ...'' अचानक ओरडता ओरडता हुंदका फुटला त्या माणसाच्या घशातून. ''आता झुंजतेय

जीवन मरणाची लढाई! विश्वासाने दिला होता तिने हात माझ्या हातात. पण मी नाही धरला धड!”रडत रडत तारस्वरात ओरडत तो बोलत होता. मधेच आवाज फाटला त्याचा. सगळेच वळून बघायला लागले या दोघांकडे. मग अचानक सावध होत झरकन वळून निघून गेला तो श्रीशला तिच्या हाती देऊन. ती मुलगी अधिकच रडवेली होत तो गेला त्या दिशेने जायला वळली पण तो दिसेनासा झाला होता. ती रडायलाच लागली मग.

हे सगळं इतकं क्षणार्धात घडलं की नक्की घडलं की नाही असंच क्षणभर वाटलं शाल्मलीला. पण मग तिने त्या मुलीला बसवलं आपल्या शेजारी. पाणी दिलं. ती प्याली थोडसं. मग डोळे पुसत म्हणाली “सॉरी आंटी, आम्ही जिन्यात खेळत होतो पायऱ्यांवर उड्या मारून. मी त्याचा हात धरला होता वर चढताना पण तो हात सोडवून एकदम कडेला गेला. मी अरे अरे करत ओरडले पण त्याने बघितलंच नाही माझ्याकडे. डॅडने पटकन मागून येऊन पकडला ...नाहीतर... !”

“हं! नाव काय तुझं?”

“केतकी.”

“केतकी, हा श्रीश. मी शाल्मली. श्रीशला ऐकू येत नाही. त्यामुळे तू मारलेली हाक त्याला कळलीच नाही.”

केतकीने अविश्वासाने वळून श्रीशकडे आणि मग शाल्मलीकडे पाहिलं.

“कानाचं ऑपरेशन करायलाच आणलय मी त्याला इथे.” मग तिने दोघांचे हात सॅनिटायझरने साफ करून क्रीम बिस्किटस् दिली दोघांनाही. केतकी आधी जरा घुटमळली, मग घेतलं तिने बिस्किट. शाल्मली वरवर शांतपणे बोलत होती पण प्रचंड भेदरली होती. सारखी तिची नजर जिन्याकडे जात होती. ‘खरंच त्या माणसाने धरले नसते तर?’

तेवढ्यात दारातून “केतकी” असा करडा स्वर ऐकू आला आणि केतकी धडपडत उठली आणि त्या माणसाकडे गेली. त्याने केतकीचा हात धरला आणि तो तरातरा दरवाजाच्या बाहेर पडला. केतकी वळून या दोघांकडे पाहत होती. मग दोघे दिसेनाशी झाली. श्रीश हात करकरून केतकीला बोलावत राहिला.

शाल्मलीने एक भला मोठा निश्वास सोडला. तेवढ्यात रिसेप्शनिस्टने तिला बोलावले. आता मात्र शाल्मलीने त्याला कडेवर घट्ट पकडून ठेवले. रुम अलॉट झालीच होती.

“तुम्ही रुममधे बसा. टेस्टस साठी बॉय घ्यायला येईल तेव्हा जा त्याच्याबरोबर. पैसे डिसचार्जच्या वेळी घ्यायला सांगितलेत डॉक्टरनी.”

शाल्मली काही न बोलता वॉर्ड बॉय बरोबर गेली रुममधे. इथे मात्र सर्व शांत होतं. पंचतारांकित हॉटेलची रुम वाटत होती ती हॉस्पिटल रुम पेक्षा.

भिंतींवर मस्त निळ्या लाटा, त्यात रंगीत मासे असं सुंदर चित्र रंगवलं होतं. खिडक्यांचे पडदेही कार्टूनच्या चित्रांचे फार भडक नव्हेत पण प्रसन्न रंगांचे. दोन नवी कोरी टॉईज कॉटवर मांडलेली. बेडशीट वरही भावल्यांची चित्र. उशीला आकार टेडीचा.

श्रीश हरखूनच गेला सगळं पाहून. मग त्याच्यासाठी मेन्यू ठरवायला डाएटिशियन आली. तिने पंचतारांकित मेन्यू त्याच्या आवडी निवडी विचारून ठरवला.

“मॅम, डेझर्टला हाफकुक्ड ॲपल विथ सिनॅमन स्प्रिंकल पाठवते. श्रीश वुड लव्ह इट.”

शाल्मली मनातल्या मनात हसली.

श्रीश जेवून झोपून गेला. मग शाल्मलीने तिचा घरून आणलेला डबा खाल्ला.

ती ही मग जरा शेजारच्या बेडवर आडवी झाली.

तेवढ्यात दारावर टकटक झाल्यासारखं वाटलं. बॉय आला की काय टेस्टला घेऊन जायला? झोपमोड झाली तर कुरकुरत राहिल दिवसभर. सांगावंच त्याला जरा नंतर ये म्हणून.

उठून तिने दार उघडले तर दारात शंतनू उभा!

शाल्मलीच्या पायातलं अवसानच गेलं. खरंतर तिला दरवाजा लावून घ्यायचा होता त्याच्या तोंडावर पण ती इतकी अवाक झाली होती की काही करण्यापूर्वी तो आतही आला होता.

शंतनू आत आला आणि श्रीशला निरखत बराच वेळ उभा राहिला . स्वत:ला कसंबसं सावरत ती आत आली.

“तू का आला आहेस इथे?” प्रचंड तिरस्काराने शाल्मलीने विचारले.

“अं, हं, हो, बोलायचं होतं तुझ्याशी.”

“तू आधी बाहेर हो खोलीच्या!” शाल्मली कडाडली. “माझ्या मुलाच्या जवळपासही फिरकू नकोस तू. समजलं. गरज पडली तर पोलीस बोलावेन मी, लक्षात ठेव.” संतापाने थरथरत होती ती.

“शाल्मली, माझं एकदा...”

“माझं नावही काढायचं नाही तोंडातून... आऊट...जस्ट गेट आऊट”

तिचा तो अवतार बघून शंतनू हबकलाच. काही न बोलता बाहेर पडला. शाल्मलीने दार घट्ट लावलं श्रीशजवळ येऊन ती त्याला कुशीत घेऊन रडत राहिली कितीतरी वेळ.

संताप, आश्चर्य, भीती, तिरस्कार पराकोटीची विषण्णता, अनेक भावना गर्दी करून आल्या मनात.

बराच वेळाने दार वाजलं. परत भीतीचं सावट मनावर आलं. प्रथम तिने दार किलकिलं करून पाहिलं. मगाचाच बॉय होता. 'अर्ध्या तासाने नंबर लागेल बोलवायला येतो' असं सांगून गेला. मग तिने त्या वॉर्ड मधल्या मुख्य नर्सची आणि हाऊसमन डॉक्टरची भेट घेतली. कोणीही परमिशन शिवाय आत येऊच कसं शकतं असं विचारलं. 'खरंतर नाहीच येऊ शकत अटेंडन्ट पास शिवाय, ' ते दोघही म्हणाले. "किंवा विजीटर्स पास शिवाय. पण ते फक्त विजीटींग अवर्समधे. बघुया नक्की काय झालय." तो तरूण डॉक्टर म्हणाला. नर्स तिच्याबरोबर रुममधे आली . म्हणाली "मॅम, कुछ भी प्रॉब्लेम हुआ ना तो ये बेल का बटन दबानेका. तुरंत कोई तो आयेगा. डरना नही. हम यहीं है सब. मै सेक्युरिटीसे बात करूंगी ना. उनके पास कितने पास दिया उसका रेकार्ड रहता."

शाल्मलीला ती केरळी नर्स आपल्या खास हिंदीत आश्वस्त करत राहिली.

काही वेळाने श्रीश जागा झाला. त्याच्यासाठी डाएटिशियनने हॉट चॉकलेटचा ग्लास पाठवला. तो पिऊन तो खुशीत आला.

तेवढ्यात वॉर्डबॉय आला. त्या दोघांना घेऊन तो पहिल्या मजल्यावरच्या एका रुममधे गेला. तिथे एका नर्सने मोठ्या खुर्चीत फिट होणारी बेबी चेअर ठेवून, त्यावर श्रीशला बसवले. मग ती म्हणाली, “मॅम मी आता बेबीचे केस कापणार आहे. तुम्हाला आधी कल्पना देते. कानाच्या मागून साधारण चार इंच दोन्ही बाजूने पूर्ण शेव्ह करणार. मग वरचे ही बरेचसे केस कमी करूया म्हणजे इक्विपमेंटमधे केस अडकणार नाहीत. फक्त क्राऊनवर ठेवते दाट केस. मस्त स्टाईल होईल.”

शाल्मलीने श्रीशच्या वाढलेल्या जावळातून ममतेने हात फिरवला. आई ९व्या १० व्या महिन्यापासूनच मागे लागली होती जावळ करुया बाळाचं. पण बाकीच्या गडबडीत राहूनच गेलं होतं.

“डोन्ट वरी मॅम. इट विल बी ऑल राईट. अवर हॅंडसम बॉय विल लुक वेरी हॅंडसम आफ्टर हेअर कट.” ती श्रीशकडे समोरच्या आरशात पाहून हसली. श्रीशनेही तिला त्याचे किलर स्माईल दिले.

“ओह, सो स्वीट! आय हॅव ऑलरेडी लॉस्ट माय हार्ट टू दॅट किलर स्माईल.”

शाल्मलीला तिच्या या बोलण्यावर मात्र हसायला आलं.

मग सराईतपणे तिने कात्री चालवायला सुरवात केली. कुरळ्या मऊशार जावळाच्या बटा ... शाल्मलीने काही हातात धरल्या. हळू हळू श्रीशचा चेहरा वेगळा दिसायला लागला. मग तिने सावकाश नाजूकपणे इलेक्ट्रिकल ट्रीमरने कानांच्या मागच्या बाजूने सगळे केस बारीक कापून घेतले, आणि शेवटी शेव्हरने सावकाश तेवढ्या भागांचा गुळगुळीत गोटा केला. आजकाल कॉलेजची मुलं फॅशन म्हणून करतात तसाच तो कट दिसत होता. श्रीशने खूपच चांगले सहकार्य केले असं ती नर्स म्हणाली.

मग तिने कसली कसली लोशन्स लावली श्रीशच्या कानामागे.

किती वेगळं दिसायला लागलं पिल्लू!

तिथून बॉय तिला दुसऱ्या मजल्यावर घेऊन गेला. तिथल्या लॅब टेक्निशियन्सनी काही मेजरमेंटस घेतली. श्रीशकडे पाहून कोणीही हसलं, नाही हसलं, तरी तो गोड हसायचा आणि समोरच्याला पटकन आपलसं करायचा.

"काय चॅम्प? मज्जा आहे तुझी. कसला भारी हेअरकट हं?" टेकनिशियनने मापं घेताना श्रीशकडे पाहत म्हटलं आणि छान ची खूण केली. श्रीशने सगळं कळल्यासारखं गोड हसून प्रतिसाद दिला.

आणखीही दोन ठिकाणी असंच काही ना काही करण्यासाठी बॉय त्या दोघांना घेऊन गेला. मग सगळं झाल्यावर ती म्हणाली मला डॉक्टर

समीरना भेटायचंय. त्याने तिथूनच समीरच्या सेक्रेटरीला फोन लावला. समीरने फोन शाल्मलीला द्यायला सांगितला.

"सॉरी शाम, आधीच येऊन भेटणार होतो पण ओटी त अडकलो जास्तच. आताही एक इमर्जन्सी कॉल आहे. तू रुमवर थांब मी येतो सगळं झालं की. बाकी काही प्रॉब्लेम नाही ना?"

"अं, तू ये मग बोलू."

"ठीक आहे. एनिथींग अर्जंट?"

"नाही. ये तू आवरून सगळं."

"ओके, बाय."

"बाय."

मग वॉर्ड बॉय त्यांना वॉर्डमधल्या रुममधे सोडून गेला. अजून अख्खी संध्याकाळ बाकी होती. मग तिने नर्सला विचारले "अजून काही टेस्टस करायच्या आहेत का?"

नर्स म्हणाली "नाही. अभी रिलॅक्स करो मॅम. कल सुबह जल्दी उठकर बेबी को तैयार करने के लिये ओटी में लेके जाएंगे."

मग ती म्हणाली "मी याला जरा फिरवून आणते खाली. डॉक्टर आले की फोन कर मी लगेच येते."

मग तिने बूट घातले श्रीशच्या पायात. दोघं निघाली. चालता यायला लागल्यापासून श्रीशला कडेवर बसायला अजिबात आवडायचं नाही. सारखं पळत सुटायचा. त्याला आवरताना शाल्मलीची दमछाक व्हायची. आत्ताही लिफ्टजवळ आल्यावर तिने उचलून घेतलेलं त्याला आवडलंच नव्हतं. पण लिफ्ट सुरू झाल्यावर गप्प राहिला कडेवर.

लिफ्टमधून बाहेर पडल्यावर मात्र उसळी मारू लागला. तिने घट्ट पकडूनच ठेवलं त्याला.आवारात एक मंदिर होतं तिथे गेली दोघं. तिथे मात्र खाली सोडलं तिने त्याला. तेवढ्यात केतकी आली पळत पळत. श्रीशला बघून खूश झाली. “आंटी हेअरकट मस्तय श्रीशचा.” शाल्मलीला हसू आलं. श्रीश पण खूश झाला तिला बघून. पळापळी करू लागली दोघं. शाल्मली जवळच थांबली दोघांच्या. केतकी श्रीशच्या केसांवरून हात फिरवायची आणि तो खिदळायचा. एवढाच खेळ सुरू राहिला मग किती वेळ. लहान मुलांना आनंदी राहायला किती थोडसं कारण पुरतं. शाल्मलीला वाटलं.

तेवढ्यात केतकीच्या बाबाची हाक ऐकू आली आणि पाठोपाठ तो ही आलाच तिथे. “चल तुला घरी सोडून येतो.”

“थांब ना डॅड आत्ता आलाय श्रीश. त्याचा हेअरकट बघ कसला कूल आहे ना?”

तो हसला श्रीशकडे पाहून. श्रीशला खूप मान वर करून पहावं लागत होतं त्याच्याकडे. त्याने श्रीशला उचलून घेतला. "ममा कुठय याची?" "ती काय बसलीय. डॅड ओरडू नको हां तू. जवळच आहे ती."

मग तिघही आली तिच्याकडे. श्रीश परत कडेवरून खाली उतरलानी केतकीची आणि त्याची पळापळी सुरू झाली तिथल्या तिथेच.

शाल्मली आणि केतकीच्या डॅडला काय बोलावं कळेना. मग शाल्मलीने जरा घाबरतच विचारलं "कशी आहे मुलगी तुमची आता?"

"आऊट ऑफ डेंजर म्हणाले डॉक्टर."

"कोण आहे तिच्याजवळ?"

"माझी लांबची बहिण आहे ती आलीय तेवढ्यात हिला घरी सोडून येतो"

शाल्मलीने मान हलवली. त्याला अजून काही बोलायचे होते पण गप्प राहिला .

"तुमच्या मुलाचं कानाचं ऑपरेशन आहे म्हणाली केतकी."

"हो तो जन्मत:च बहिरा आहे आणि म्हणून मुका पण."

"ओह, कधी आहे ऑपरेशन?"

“उद्या सकाळी.”

“हं! चल केतकी, आत्या बसलीय तोपर्यंत परत यायला हवय मला.”

“हो डॅड.” केतकी लगेच निघाली.

“बाय श्रीश, टाटा.”

तिच्या हलत्या हाताकडे पाहत श्रीशनेही हात हलवला पण मग हाताने तिला परतही बोलवू लागला.

शाल्मलीने त्याला उचलून घेतले.

ती ही मग रूमकडे जायला निघाली. सॅम आला तर आपण तिथे असावं.

रुमवर आल्यावर श्रीशसाठी खाऊ आलाच होता. श्रीशने आवडीने खाल्ला तो.

तेवढ्यात सॅम आला. आल्या आल्या त्याने हात सॅनिटाईज केले. श्रीशच्या कानामागचा भाग चेक केला. “हं, गुड.”

“हं बोला मॅडम, काय प्रॉब्लेम?”

“सॅम आपण बोललो तेव्हा श्रीशच्या एकाच कानाचं ऑपरेशन ठरलं होतं, त्याप्रमाणे खर्चही काढला आपण, मग फॉर्मवर दोन्ही कानांचं कसं लिहीलय?”

“शाम, अगं आपलं एका कानाचं वगैरे कधीच काही बोलणं झालं नाही. हे बघ, दोन प्रकारे यावर उपाय करतात. एक म्हणजे एका कानात कोक्लियर इंम्प्लांट बसवतात आणि दोन्ही कानात हियरिंग एडस् बसवतात. म्हणजे आवाज ॲम्प्लीफाय पण करतात आणि मध्य कानाच्या नशीला इंम्प्लांटने बायपास पण करतात. दुसरा मार्ग म्हणजे दोन्ही कानात इंम्पलांट करतात. श्रीशच्या बाबतीत हियरींग एडचा काही उपयोगच नाही. पण दोन्ही कानात इंम्प्लांट केले तर हियरींग बॅलन्स व्हायला मदत होईल आणि नीयर नॅचरल स्पीच पण येईल. सगळ्या तज्ञांनी मिळून हा कौल दिला.”

“आता उरला प्रश्न खर्चाचा. तर इंम्प्लांटस बनवणाऱ्या एका कंपनीच्या मदतीने आम्ही हा सर्वे करतोय एका कानात इंम्प्लांट वर्सस दोन्ही कानात, किती जास्त फायदा मिळतो. कारण शेवटी हा डेटा महत्वाचा असतोच. तर ती कंपनी दुसऱ्या कानाचा इंम्प्लांट फ्री देणार आहे. अर्थात श्रीशसाठी दोन्ही कानांचा इम्प्लांट उपयोगी ठरेल असं पटल्यावरच आम्ही हा निर्णय घेतला. श्रीशला ऐकू येणे सगळ्यात महत्वाचं आहे. तुझ्याशी बाकी सर्व गोष्टी डिस्कस केल्याच होत्या मी. माझ्या मनात पहिल्या दिवसांपासूनच दोन्ही कानांचाच विचार होता

त्यामुळे वेगळं बोललो नसेन .काही शंका आहे का मनात? स्पष्ट बोल शाम.”

“न नाही. बरं मला सांग रुममधे कोणीही येऊ शकतं का बाहेरचं?”

“छे, काहीतरीच काय? कडक सेक्युरिटी आहे, असं का विचारतेस?”

“शंतनू आज सरळ इथे घुसला आज.”

सॅमच्या चेहऱ्यावरचे भाव भरभर बदलत गेले.

“कधी? काय म्हणाला आणि?”

“माझ्याशी बोलायचंय म्हणाला.”

“मग?”

“मग काय, मी हाकलून दिला.”

“शाम, बस खाली. मी हे तुला आधीच सांगायला हवं होतं बहुतेक. शंतनू त्याच्या आणि माझ्या कॉमन मित्राचा रेफरन्स घेऊन माझ्याकडे श्रीशची केस घेऊन आला. म्हणजे फोनवर बोलला आणि रिपोर्टस पाठवले जन्माच्या वेळचे.”

शाल्मली डोळे विस्फारून ऐकत होती.

“आपण जेव्हा श्रीशच्या टेस्टस करत होतो तेव्हाची गोष्ट. मी रिपोर्टस पाहिल्यावर ओळखलं हे श्रीशचे रिपोर्टस. मी म्हटलं घेऊन या बाळाला. तर म्हणाला मी नाही आणू शकत पण प्रयत्न करेन की त्याची आई घेऊन येईल. मी सगळा खर्च देईन. फक्त तिला हे कळू देऊ नका.”

शाल्मली झटकन उठली. “आणि तू तयार झालास सॅम.”

“तू शांत हो. मी असं काही केलं नाही. मी म्हटलं तपासल्याशिवाय काहीच पुढचं सांगता नाही येणार.

आता तो इथे कसा पोहोचला हे खरंच नाही माहित मला. पण मी काढेन शोधून. आता तू रिलॅक्स हो. उद्या भरपूर दगदग होईल. जस्ट डोन्ट वरी!”

सॅम जायला निघाला.

शाल्मली अजूनही विचारातच दिसली त्याला. “शाम, अजून शंका आहेत का काही.” तिने मान हलवली.

“तुला शांत झोप लागेल अशी गोळी देऊ का?”

“नाही नाही नको.”

“ठीक आहे मग. मी निघतो. एव्हरीथींग विल बी फाईन. ओके?”, तो तिच्या डोक्यावर थोपटत म्हणाला.

“ओके, ” ती ही हसून म्हणाली मग.

श्रीशने मंमं केलं. शाल्मलीनेही कॅंटीन मधून मागवून घेतलं थोडसं. फारशी भूक नव्हतीच तिला.

श्रीश त्या उशीशी खेळता खेळताच डोळे जडावले त्याचे. जरा थोपटल्याबरोबर झोपला. शाल्मलीच्या डोळ्याला मात्र डोळा लागेना. उद्या सगळं बदलणार होतं तिच्या आणि बाळाच्या आयुष्यात. ‘बदलेल ना?’ एक ना अनेक विचारांनी भंडावलं तिला. ‘ऑपरेशनचा किती त्रास होईल? जीवाला धोका नाही असं हजारदा वाचूनही मन धास्तावलय आपलं. माझं हसरं आनंदी बाळ, कधीच फारसं न रडणारं, ऐकायला येऊ लागल्यावर बदलेल का हे सगळं? आवाजाचा त्रास होईल त्याला? ऐकू येईल ना नक्की?’

हा विचार फिरून फिरून पिंगा घालू लागला. कधीतरी डोळा लागला.

“सांभाळ नीट मुलाला, जन्म दिला आहेस ना, जीवनमरणाशी झुंजतोय बघ...” कर्कश आवाजात केतकीचा डॅड ओरडत होता.

“आजच्या आज उचला या पोराला आणि घेऊन जा ... हा बहिरा डाग नकोय मला माझ्या यशस्वी जीवनात...” शंतनू थंडपणे बोलत होता. शाल्मली खाडकन उठून बसली. दरदरून घाम फुटला होता तिला. क्षणभर काही कळेचना. मिट्ट अंधार. ‘काय चाललय?’

मग पूर्ण जागी झाली. भला मोठा श्वास घेतला तिने. स्वप्न पडलं आपल्याला.

उठून थंड पाणी प्यायली. ‘काय म्हणून हे असं स्वप्न पडलं आपल्याला?’

नंतर बराच वेळ तळमळत राहिली. पहाटे केव्हातरी डोळा लागला.

“मॅम, मॅम”, हाका आणि दारावरच्या टकटकीने जाग आली. पटकन उठली ती. दार उघडलं.

“मॅम तैयार हो जाओ. आधे घंटेमे ओटी में ले जायेंगे बेबी को.”

शाल्मलीच्या पोटात मोठा गोळा आला.

‘देवा, माझं हे नाजूक बाळ, ती चिरफाड कसं सहन करणार? परमेश्वरा, मी का नाही घेऊ शकत त्याचं हे दुखणं?’ नकळत तिचे डोळे भरून यायला लागले. अंगाला बारीक कंप होताच. “बेबी को सिर्फ चाहे तो दो घुंट पानी, बाकी कुछ नही. बेबी को जगाने की जरुरत नही. मैं नॅपी बदल देती हुं, बस.”

तिने नुसती मान हलवली.

मग तिने भराभर स्नान वगैरे उरकलं. “आप चाहे तो यहीं बैठो रुम में मॅम, ऑपरेशन करीब ७ बजे शुरू होगा. मैं बुला दुंगी आपको.”

“नही नही, मैं वही बैठुंगी ओटी के पास.”

“अंदर की रुम में आप स्क्रीन पे देख सकोगी ऑपरेशन.”

मग श्रीश जागा झाला. त्याची तयारी करून मग बॉय आल्यावर सगळे निघाले. श्रीशला भूक लागली होती. त्याला बॉय आत नेऊ लागला तेव्हा त्याने एकदम गर्रकन वळून शाल्मलीच्या गळयाला मिठी मारली. मग बॉयने त्याला एक सॅनिटाईज केलेले खेळणे दिले. कसाबसा त्याला रमवून तो आत घेऊन गेला. शाल्मलीला हुंदका दाटून आला.

दादा आणि मित्र मगाशीच ब्लड बॅंकेत पोहोचले होते. नंतर ते लगेच ऑफिसमधे जायचे होते. बाबांना अचानक बि पीचा त्रास होऊ लागल्याने ते किंवा इतर कोणी येणार नव्हते.

दादा हाफ डे घेऊन येईन म्हणाला. ती बरं म्हणाली. तसही तिला आत्ता एकटच रडावसं वाटत होतं.

किती तरी वेळ ती तशीच बसून होती. ‘काय चाललं असेल आत? बाळ माझं सगळ्या अनोळखी लोकांना पाहून घाबरलं असेल का? रडत असेल. पोटात काही नाही त्याच्या.’ सगळं अंग म्हणजे घुसमटलेल्या नसांचं भेंडोळं होऊन गेलं तिचं. डोकं दोन्ही हातात धरून बसून राहिली. इतकं असहाय्य शंतनूच्या घरून बाहेर पडतानाही नव्हतं वाटलं तिला.

'सॅम, आहेस ना रे आत माझ्या बाळाबरोबर?' नकळत परत परत भरून येणारे डोळे तिने कसेबसे पुसले. जवळच्या बाटलीतून पाणी प्याली. जरा सावरलं तिने स्वत:ला. तेवढ्यात नर्स बोलवायला आली.

ती गेली आत. सॅम, तीन असिस्टंट डॉक्टर्स, भूलतज्ञ, नर्सेस, ओटी बॉय असा बराच फौजफाटा काचेतून पलिकडे दिसत होता. तिची नजर श्रीशला शोधत होती. पण तो दिसेना. तेवढ्यात सॅम बाहेर आला. त्याने सराईत नजरेने शाल्मलीची मन:स्थिती जोखली. मग म्हणाला "प्रोसीजर सुरू व्हायला जरा वेळ आहे. तू कॉफी वगैरे घेऊन ये. बाहेरच्या रुममधे स्क्रीनवर दिसेल तुला सगळं. एव्हरीथींग विल बी फाईन, जस्ट डोंट वरी." एवढंच बोलून तो आत गेला. तिला अचानक आठवलं ती सही राहिली करायची. तेवढ्यात नर्सने तिला परत बाहेरच्या रुममधे सोडले. ती रिसेप्शनमधे जाणार तेवढ्यात तिच्या फोनवर फोन आला "मॅम सही करायला खाली या." ती लगेच गेलीच. सह्या वगैरे झाल्या. मग रिसेप्शनिस्ट म्हणाली "बाळाचे डॅड होते आत्ता इथे, सही पण करतो म्हणाले. पण तुमच्या नावाने पेपर्स आहेत ना, म्हणून तुम्हाला बोलवायला लागलं."

शाल्मली दचकून पाहू लागली आसपास. मग म्हणाली "कुठे आहेत बाळाचे डॅड?" रिसेप्शनिस्ट आश्चर्याने पाहू लागली. "मग म्हणाली आत्ता इथेच होते."

शाल्मलीला काहीतरी शंका आली. ती म्हणाली “तुम्हाला कसं कळलं बाळाचे वडिल आहेत?”

“त्यांनीच सांगितलं. आय मीन, ...” ती ही विचारात पडली... मग आठवलं तिला... “त्यांनी रिपोर्टस दाखवले ना... आधीचे... पैसे पण भरणार होते पण डॉक्टर समीर यांची सक्त ताकिद होती की त्यांनी सांगितल्याशिवाय कोणाहीकडून या केसचे पैसे नाही घ्यायचे. म्हणून नाही घेतले.”

सकाळपासून प्रथमच शाल्मली रिलॅक्स झाली. कालपासून सॅमविषयी मनात आलेल्या शंकांचं मळभ दूर झालं.

“तुम्ही अटेंडन्ट पास दिलात का त्याना?”

“हो मॅम”

“आता परत बोलवून काढून घ्या तो. ही इज नॉट फादर ऑफ माय चाइल्ड. खोटं बोलतोय तो माणूस.”

“ओह माय गॉड”

“सेक्युरिटीला बोलवून घेऊ का मॅम?”

“नको, त्याची गरज नाही. बस तो पास काढून घ्या.”

“ओके मॅम.”

“वी आर एक्स्ट्रीमली सॉरी”

“इटस् ओके.”

शाल्मली परत वर निघाली. ओटीच्या बाहेर येऊन बसली. बरेच चिंताग्रस्त चेहरे दिसले तिला. मधे मोठी सर्क्युलर जागा आणि सर्व बाजूने निरनिराळे कॉरीडोर्सकडे निघणारे रस्ते. ओटीच्या बाजूलाच आयसीयु होतं. तिथले अधिकच काळजीयुक्त चेहरे.

ती एका खुर्चीत बसली. डोळे मिटून मान मागे टेकली. काळजीने जीव पाखरागत भिरभिरला.

तेवढ्यात नर्सने तिला जवळ येऊन हाक मारली. तिने डोळे उघडताच तिला स्क्रीनरुममधे या ऑपरेशन पहायचं असलं तर असं सांगितलं. ती जरा घुटमळली. पण मग गेली आत.

स्क्रीन ऑन केला नर्सने. फक्त कानामागचा भाग, आणि दोन ग्लव्ड हात दिसत होते. आधी संपूर्ण भाग सॅनिटाईज केला परत एकदा. कसली तरी ट्रान्सपरंट टेप लावली होती बाकी चारी बाजूला. मग त्यातल्या एका हातात स्कालपेल ठेवला गेला, सराईतपणे एकदा फक्त हवेत कानामागे स्कालपेल फिरवून घेतला गेला आणि पुढच्या क्षणी तो कातडीवर फिरला, भळाभळा रक्त वाहू लागलं. दुसरीकडून चिमटा पुढे झाला कॉटन स्वॅबवाला आणि त्याने भराभर ते रक्त टिपून घेतले.

शाल्मलीचा सगळा जीव घशात गोळा झाला. मग कातडी खालचा टिश्शू मास बाजूला सरकवला जाऊ लागला हळू हळू, मिडल इयर स्पष्ट दिसू लागला, त्यावरची पोकळीही मोकळी करण्यात आली.

सतत एका बारीकशा नळीने पाण्यासारखा द्राव सोडला जात होता तिथे, आणि टिपलाही जात होता. मग अत्यंत हळूवारपणे एक गोलाकार चकती त्या पोकळीत सरकवण्यात आली आणि त्याला जोडलेली बारीक नस सदृश्य नळी मिडल इयरच्या गोगलगायीसारख्या दिसणाऱ्या भागात कोक्लियात अलगद बसवली गेली. मग बाजूला केलेल्या टिश्शयुला परत वरून जागोजागी ठेवले गेले. अत्यंत कुशलतेने मग कातडी परत शिवायला सुरवात झाली .

इतका वेळ जणू धरून ठेवलेला श्वास सोडला शाल्मलीने. एका कानाचे ऑपरेशन तर झाले.

भडभडून आलं तिला. बसवेना एका जागी. पटकन बाहेर आली. बाहेर एका खुर्चीत बसली आणि सगळं साठवलेलं अवसान गळलं तिचं. ढसाढसा रडायला येऊ लागलं. दोन्ही हातांच्या ओंजळीत तोंड लपवून गदगदून रडत राहिली. काही वेळाने कोणीतरी हातावर हात ठेवल्याचं जाणवलं तिला. भरल्या डोळ्यांनी ओंजळीतून चेहरा वर करून पाहिलं तर केतकी बसली होती तिच्याजवळ. तिच्या हाताला धरून. काही कळण्याआधी तिने केतकीला मिठीत घेतले आणि तिने परत अश्रुंना वाट करून दिली. काही वेळाने, सावरली. बिचारी

लहानगी केतकी पण तिलाही शाल्मलीची मन:स्थिती कळली असावी. ती तिचा हात घट्ट पकडून बसून राहिली.

केतकीचा बाबा लांबून हे सगळं पाहत होता. आपण काय करावं त्याला कळेना. मग आठवलं काहीतरी. कॉफी मशीनवरून कॉफी घेऊन आला. केतकीला खूण केली. "आंटी, हे घे"

शाल्मलीने वर पाहिलं. केतकीचा बाबा कॉफीचा पेपरकप घेऊन उभा होता. तिने नकळत हात पुढे केला आणि कप घेतला. तो लगेच वळून निघून गेला.

कॉफी घेतल्यावर तिला जरा बरं वाटलं. हुशारी आली. वॉशरुममधे जाऊन ती चेहऱ्यावर पाणी मारून आली. केतकी तिथेच बसून होती. मग ती केतकी जवळ जाऊन बसली. तिचा हात तिने हातात घेतला. एक वेगळाच बंध निर्माण झाला होता काही क्षणांत त्या दोघींमधे.

तेवढ्यात नर्सने ऑपरेशन झालय, थोड्या वेळाने डॉक्टर बोलावतील तुम्हाला असं सांगितलं.

तिने मान हलवली. "श्रीशला ऐकू येईल ना आंटी आता." तिने हसून मान हलवली. केतकी सतत तिच्या अधिक जवळ सरकून बसतेय असं तिच्या लक्षात आलं. तिनेही मग केतकीच्या खांदायांवर हात टाकत तिला आपल्या जवळ घेतली. दोघीही अशा बसून राहिल्या.

थोड्या वेळाने नर्सने तिला आत बोलावले. सॅम मास्क तोंडावरून गळ्यात अडकवत बाहेर आला.

“ऑपरेशन व्यवस्थित झालं. काळजीचं काहीच कारण नाही. शाम श्रीशची भूल उतरली तरी झोपेल बराच वेळ तो. तशी औषधं दिलेली असतात. रिकव्हरीमधेच राहिल संध्याकाळपर्यंत. थोड्या वेळाने नर्स सांगेल तुला मग बघून ये. ओके? “त्याने तिच्याकडे नजर रोखत विचारलं.

“हो!” तिला त्या नजरेचा अर्थ बरोबर कळला. जणू तो म्हणत होता “शाम, तू रडतेस? शोभत नाही तुला.” तिला यावर रागारागाने काही बोलावसं वाटलं जे “हो”च्या ठसक्यात बरोबर उमटलं. लहानपणी शामला चिडवल्यावर जशी समाधानाची लहर सॅमच्या चेहऱ्यावर उमटायची तशीच आत्ताही उमटली. तिला आणीच राग आला मग. आई झाला असतास तर कळलं असतं असं अगदी म्हणावसं वाटलं तिला. मग तो आत गेला. आपण त्याला थॅंक्स पण म्हटलं नाही. तिच्या बऱ्याच उशीरा लक्षात आलं. खजील झाली मनातून. बाहेर आली. केतकी तिची वाट पाहत तिथेच बसली होती. ती जवळ जाऊन बसली तिच्या. “केतकी, डॉक्टर म्हणाले छान झालय ऑपरेशन. आता बघायला सोडतील आत. तू येतेस आत?” तिने जोरजोरात नाही नाही अशी मान हलवली. शाल्मलीला फार आश्चर्य वाटलं. ती म्हणाली “बरं बरं, ठीक आहे.”

“मी बघून येईन आणि तुला सांगेन, चालेल?”

केतकी बारीक हसली. “काय चाललं असेल या चिमुरडीच्या मनात?”

नर्स आलीच बोलवायला. शाल्मली आत गेली. श्रीश झोपलाच होता. संपूर्ण डोक्याला बॅंडेज होतं. हाताला सलाईन. हात हलवू नये म्हणून टेप्सने बंदिस्त. “माझं बाळ, किती सहन करायचं या चिमुकल्याने? आणि का?”

शाल्मली जवळ गेली. हळूवार हाताने तिने त्याच्या नाजूक शरीरावरून हलकेच हात फिरवला. कपाळावरूनही फिरवला. हात त्याच्या पाठीवर तसाच ठेऊन उभी राहिली.

मग नर्स म्हणाली “थोडा वेळ थांबा हवं तर. मग जा.” ती कृतज्ञतेने हसली.

जरा वेळाने नर्स म्हणाली डॉक्टर येतील बघायला.

मग ती बाहेर आली परत एकदा बाळाला हलकेच गोंजारून. डोळ्यांना तर काही म्हणण्यातच अर्थ नव्हता. सारखे वाहत होते.

नर्स म्हणाली “तुम्ही रुमवर जाऊन विश्रांती घ्या. काही लागलं तर आम्ही बोलवू.”

“नाही, मी इथेच बसेन.”

“मॅम आता दोन तास आत नाही सोडता येणार. इन्फेक्शन्स होऊ नयेत म्हणून काळजी घ्यावी लागते.”

“हो हो, ते ठीक आहे”

“शिवाय नंबर आहे तुमचा माझ्याकडे.”

“ओके.”

बाहेर आल्यावर तिला एकदम गळून गेल्यासारखं वाटलं. मग आठवलं सकाळपासून पोटात काही अन्न नाही. ती केतकीला म्हणाली चल आपण कॅंटीनमधे जाऊन येऊ. “येतेस? तू जेवलीस का?” तिने नाही म्हटलं. “चल मग. थांब तुझ्या वडिलांना सांगून ये.” केतकीने आयसीयुच्या दिशेने पाहिले पण ते कुठे दिसत नव्हते. “आत असतील का?” केतकी म्हणाली “हो.”

“चल मग विचारून ये.”

“नाही, नको, आत नको.”

“का गं? चल मी येते.” केतकीने पटकन हात सोडवून घेतला.

“नाही आत नको” भेदरलेल्या चेहऱ्याने ती म्हणाली.

शाल्मलीला काय करावे कळेना. “न्यावं तरी कसं नि एकटं सोडून जावं तरी कसं?”

मग ती सरळ आयसीयुच्या दाराशी गेली. काचेतून आतली क्युबिकल्स दिसत होती. समोरच केतकीचा बाबा एका बेडजवळ स्टुलवर पाठमोरा बसला होता. दोन मिनिटं शाल्मली घुटमळली. मग सरळ आत गेली. त्या क्युबिकलच्या दारात गेली. बेडवर साधारण तीन वर्षाची मुलगी, नाका तोंडात नळया, डोक्याला मोठं बॅंडेज, हाताला सलाईन, पायाला प्लास्टर अशा अवस्थेत होती. तिचा एक हात तेवढा मोकळा होता आणि केतकीचा बाबा तो हातात घेऊन काहीतरी पुटपुटत होता.

“कांचन बाळा, डोळे उघडून बघ गं एकदा माझ्याकडे. रागव माझ्यावर. मार मला. पण प्लीज एकदा बघ माझ्याकडे. तुझी ममा अशीच न बोलता निघून गेली. आता तू पण बोलत नाहीस.”

डोळ्यातून घळाघळा पाणी वाहत होतं.

काय करावं अशा वेळेस कोणीही? शाल्मली तशीच थांबली काही क्षण. मग पुढे झाली. शांतपणे म्हणाली, “केतकीचे बाबा, कांचन होईल बरी लवकर.” त्याने मान वर करून पाहिले.

“माझ्यामुळे झालय हे सगळं. मी नाही धरू शकलो तिचा हात वेळेवर. तिने खूप विश्वासाने पुढे केला होता हात. तिला खात्री होती की तिचा डॅड नक्की धरणार तिला. पण जेव्हा तिचा तोल गेला आणि लक्षात आलं तिच्या की डॅडने नाही धरला हात तेव्हा मागे पडताना

तिच्या डोळ्यात प्रचंड अविश्वास होता माझ्याबद्दल. डॅडने फसवलं असा.” तो एवढा सहा फुटी माणूस स्फुंदून स्फुंदून रडू लागला. हळू हळू तो शांत झाला. शाल्मली म्हणाली “तुम्ही जे सांगताय त्यावरून तो अपघात होता हे स्पष्ट दिसतंय . होईल कांचन बरी.”

त्याने मान हलवली. ती पुढे म्हणाली “मी केतकीला घेऊन जाऊ का जरा वेळ? कॅंटीनमधे जाऊन येतो.”

त्याने एकदा तिच्याकडे पाहिले आणि मग होकारार्थी मान हलवली.

तिने पुढे होऊन कांचनच्या सलाईन लावलेल्या हातावरून हलकेच बोटं फिरवली.

मग ती बाहेर जाण्यास निघाली.

दोघी कॅंटीनमधे आल्या. केतकीने शाल्मलीचा हात घट्ट पकडला होता. तिने आत्तापर्यंत दोन वेळा “डॅड हो म्हणाला?” असं विचारलं होतं.

“सॅंडविच, कॉफी आणि मिल्कशेक” असं घेऊन त्या एका टेबलवर येऊन बसल्या.

शाल्मलीने सॅंडविच तिच्यापुढे धरलं. तिने एक तुकडा उचलला. भराभर खाल्ला. खूप भूक लागली असावी. मग तिने दुसराही घेऊन

खाल्ला. शाल्मलीने मिल्कशेक पुढे केलं, ते ही अर्ध गटागट प्याली. मग जरा भूक शमली तिची. शाल्मलीने मग आपलं सॅंडविच खायला सुरवात केली.

"केतकी, बेटा तू श्रीशला भेटायला का नाही आलीस?"

"मला भीती वाटते!"

"कसली भीती? सलाईनच्या सुईची?"

"आंटी, मी ममाला बघायला गेले आणि तिने माझा हात हातात घेतला. मी तिला म्हटलं ममा घरी चल ना, तर ती रडायला लागली आणि मग तिने माझा हात सोडून दिला. ती झोपलीच गाढ. आजी म्हणते ती देवाघरी गेली. मी कांचनला पण भेटायला जात नाही आत. तीही गेली तर? ममा देवाघरी गेली तर डॅड पण चिडका झाला. सारखा ओरडतो माझ्यावर."

केतकी एकदम गप्प झाली. आपण नको ते बोललो असं जाणवलं त्या चिमुरडीला. केतकीने तिच्या हातावर थोपटले. मग म्हणाली "अगं, कांचनला बरं नाही म्हणून घाबरलाय तो. पण कांचन बरी झाली ना, की होईल डॅड पण बरा. आज संध्याकाळी श्रीशला रुममधे शिफ्ट करतील. मग तू ये त्याच्याशी खेळायला उद्या सकाळी. चालेल?"

"हो आंटी."

मग शाल्मलीने अजून एक सॅंडविच पॅक करून घेतले.

दोघी परत वर आल्या ओटी जवळ. केतकीचा बाबा आयसीयुच्या बाहेर उभा होता. शाल्मलीने केतकीकडे सॅंडविच दिले आणि बाबाला दे अशी खूण केली. केतकी गेली आणि तिने सॅंडविच पुढे केले. नकळत त्याने वळून पाहिले . शाल्मलीने हाताने खूण केली आणि ती वळून ओटी जवळच्या खुर्चीत बसली.

केतकी परत थोड्या वेळाने येऊन शाल्मलीला खेटून बसली. यावेळेस काही वेळ न दवडता तिच्या खांद्यावर हात ठेऊन तिला जवळ घेतले. लांबून केतकीचा बाबा हे पाहत राहिला.

मधे शाल्मली जाऊन परत श्रीशला पाहून आली. तो जरा हालचाल करत होता. पण अजून झोपेतच होता. पुढच्या तासाभरात तो जागा होईल आणि मग त्याला घोटभर पाणी पाजू असं नर्स म्हणाली.

अर्ध्या तासातच श्रीश जागा झाला. शाल्मली लगेच आत गेलीच. तिने त्याला जवळ घेतले. तो प्रचंड भेदरला होता. डोक्याला बांधलेलं काढून टाकू पाहत होता. कानही दुखत असतील . सॅम आलाच. “आता चार चमचे पाणी, परत अर्ध्या तासाने रीपीट, असं दोन तास. मग लिक्विडस चालतील. रात्री अगदी मऊ भात वगैरे दे. डाएटिशियनला नोट पाठवतोच आहे मी. पेन किलर्स आहेत दिलेली.

तरी जरा कुरकुरेल. रात्री शक्यतो हात स्ट्रॅप करा सिस्टर. आता रुममधे हलवू. मी रात्री येईन परत पहायला. काही लागलं तर फोन आहेच. ओके?”

शाल्मलीने मान हलवली.

“डोन्ट वरी, एव्हरीथिंग विल बी फाईन.”

पुढचे सगळे सोपस्कार पार पडून रुममधे हलवायला पुढचा एक तास गेला. श्रीश प्रचंड कुरकुरत होता. मधूनच रडत होता. बॅंडेज काढून टाकण्याचा प्रयत्न करत होता. रुममधे आणल्यावर परत त्याला पाणी पाजलं. ते मात्र लगेच प्याला.सिस्टर्सनी भराभर त्याचा बेड डोक्याच्या बाजूने एलेवेट केला. आधीच्या उशीखाली अजून एक उशी ठेऊन मग त्याला असं झोपवलं जेणेकरून डोकं वरच्या दिशेने राहिल .

फाईलमधे ऑपरेशन नंतर घ्यायच्या काळज्या अशा शिर्षकाचा कागद होता तो शाल्मलीने नीट परत वाचून काढला. आंतरजालावर तिला ही माहिती मिळाली होतीच. पण तरी डॉक्टरांनी काही अजून वेगळं लिहीलय का हे ती तपासून पाहू लागली.

काही दिवस चक्कर येऊ शकते, मळ मळ होऊ शकते, क्वचित नाकातून, किंवा घशात रक्त येऊ शकतं.

वेदना, ऑपरेशन झाल्या दिवशी जास्त असतात आणि हळू हळू कमी होत जातात. नाक शिंकरणे, शिंकणे यामुळे काही वेळेस आतली

जखम बरी होण्यास वेळ लागतो. एक एक सूचना वाचता वाचता नकळत शाल्मलीचा मेंदू ॲक्शन प्लॅन बनवू लागला.

चक्कर येउ शकते: सतत जवळ थांबायला हवं, चालतो म्हणून हट्ट करू लागला तर हात धरूनच.शिंका येऊ नाही द्यायच्या म्हणजे सर्दी नकोय व्हायला. गार वारं, थंड पेय, आईसक्रीम, बंद. काही दिवस कुरकुर चिडचिड करू नये म्हणून सतत नवनवे बैठे खेळ, सततचा सहवास... घरून काम करायचं तर फक्त रात्री. नवीन एक दोन खेळणी आणावीत. पाहता पाहता मसुदा तयार झाला डोक्यात.

श्रीशच्या जवळच बसून राहिली. औषधांचा अम्मल, दमणूक यामुळे तसा श्रीश ग्लानीतच होता. मधून मधून कुरकुरत रडत होता तेवढंच. घरी फोन करून कळवलं. बाबांचं बी पी कमी येईना म्हणून त्यांना ॲडमिट करावं लागलं होतं, जवळच्याच हॉस्पिटलमधे. त्यामुळे दादा तिकडे अडकला. तुला काही कळवत बसलो नाही मी, म्हणाला. काळजी करू नकोस आता बरय म्हणाला.

बिचारे आई बाबा, किती विनाकारण त्रास त्यांच्या डोक्याला. शिवाय मुलगी कितीही शिकली, स्वत:च्या पायांवर उभी असली, तरी ती एकटी राहतेय ही बोच त्यांना कायम त्रास देतेय, हे न कळण्याइतकी शाल्मली असमजदार नव्हती. तिची शंतनू बद्दलची घृणा कित्येकपट

वाढली. पण तेव्हाच हेही वाटलं, की शंतनू फक्त एकदा जाऊन त्यांची माफी मागेल, तर ते लग्गेच त्याला माफ करतील. त्यापेक्षा इथेच भेटून कायमचा सोक्षमोक्ष लावावा. ‘हं, बी रेडी शाल्मली.’ तिने लगेच फोन उचलला. शंतनूला लावणार तेवढ्यात दारावर टकटक आणि पाठोपाठ सॅम, शिकाऊ डॉक्टर्स, नर्स असा ताफा आत आला. शाल्मली बेडवरून उतरून उभी राहिली.

सॅमने श्रीशला चेक केलं. नर्सला काही इन्स्ट्रक्शन्स, बस, निघाले सगळे. सगळे बाहेर गेल्यावर दारातून वळून म्हणाला ‘बाकी राऊंड संपवून येतो.’

तो गेल्यावर श्रीशसाठी रुम टेंपरेचरचं दूध पाठवलं होतं, ते मात्र तो अधाशासारखं प्याला. मग त्याला जरा गाढ झोप लागली.

शाल्मलीने फोन उचलला आणि शंतनूला कॉल केला.

शंतनूने दोन रिंगमधे उचलला.

काही क्षण दोघेही गप्प बसले. मग शाल्मली म्हणाली “आपण भेटूया.”

तो म्हणाला “कधी आत्ता?”

“नाही उद्या दुपारी.”

“ठीक आहे येतो. ... थॅंक्स!”

शाल्मलीने फोन कट केला.

रात्री सॅम काही मिनिटं येऊन गेला. परत एकदा तिला आश्वस्त करून गेला.

“इतर पेशंटसना दुसऱ्या दिवशी डिसचार्ज देतात. पण श्रीशचं ड्रेसींग काढलं की मगच जा घरी.”

“ओके, तू म्हणशील तसं” “पुढचे टप्पे तुला माहीत आहेतच. पुढचा आठवडा दोन वेळा दाखवून जा. मग एव्हरी वीक एकदा. चार आठवड्यांनी इंम्प्लांट ॲक्टीव्हेट करता येईल असं वाटतं. नाहीतर ६ आठवड्यांनी नक्कीच. ती खरी वेळ जेव्हा आपल्याला नक्की कळू शकेल रिझल्ट या ऑपरेशनचा. बाकी काळजा कशा घ्यायच्या माहीत आहेच तुला.”

रात्र जवळपास जागूनच काढली शाल्मलीने. श्रीशही अस्वस्थ होता. वेदनेचा त्याला त्रास होतच होता. शाल्मली सतत त्याच्या उशाशी बसून होती. पहाटे जरा श्रीश शांत झोपला. शाल्मलीचाही डोळा लागला मग.

सकाळी परत श्रीशचं ड्रेसींग बदलण्यात आलं. समीर जातीने हजर होता. त्याने जखम तपासली. सगळं ठीक आहे असं म्हणाला. मग परत ड्रेसींग केलं.

“आज वरण भात खाऊ दे त्याला. दुपारी परत एकदा ड्रेसींग बदलेल नर्स”

तो दिवस गडबडीत गेला. श्रीशला सतत सांभाळणं, त्याने बॅंडेज ओढू नये म्हणून काळजी घेणं, सतत बेडवरून उतरून बाहेर जायचा हट्ट, क्षणभर उसंत नव्हती तिला. यासगळ्यात आपण शंतनूला बोलावलय भेटायला हे विसरूनच गेली ती.

मग फोन वाजला तिचा दुपारी.

“मी खाली आलोय. वर सोडत नाहीत मला” म्हणाला.

ती म्हणाली “थांब तिथेच.”

मग तिने रिसेप्शनिस्टला फोन केला आणि म्हणाली “आत्ता विजिटींग अवर्स आहेत ना? मग त्या माणसाला विजिटींग पास द्या.”

रिसेपशनिस्ट म्हणाली “नक्की ना मॅम? सेक्युरिटीला पाठवू का बरोबर?”

“नको, त्याची गरज नाही, पण हा एकदाच, परत नाही द्यायचा कधीच.”

“ओके मॅम”

शंतनू वर आला. दारावर टकटक झाली. तिने दार उघडलं.

शंतनू आत आला. बराच वेळ श्रीशकडे पाहत राहिला .

शाल्मलीच मग म्हणाली “ तू का आता परत परत येतो आहेस आमच्या आयुष्यात?”

शंतनू पाहत राहिला तिच्याकडे.

मग म्हणाला, “तू निघून गेलीस आणि उध्वस्त झालो मी. रात्रंदिवस नशेत राहू लागलो. जवळ जवळ वर्षभर असंच आयुष्य वाहवत गेलं. मग अचानक तुझ्याच आठवणींनी हात देऊन वर काढलं. दारू सुटली. परत कामाला सुरवात केली ऑफिसमधे. सगळ्या गोष्टी मार्गी लावायच्या ठरवल्या. माझ्या मित्राने या डॉक्टरचा नंबर दिला. मला वाटलं या मुलाची ...श्रीशची ट्रीटमेंट मी केली तर काही अंशी तू माफ करशील मला. माझ्या हे लक्षातच येत नव्हतं तेव्हाही की अजूनही मी फक्त माझाच विचार करत होतो. एकदा मूक बधीर मुलांची स्कूलबस शेजारी येऊन थांबली सिग्नलला, त्यांना बघून परत आक्रसलो मी जागच्या जागी. जाणवलं मला की मी नाही हँडल करू शकत हे काहीच. हे माहीत असूनही की हा आजार अनुवंशिकतेने माझ्याकडूनच श्रीशला मिळाला असण्याची शक्यताही जास्तच. नालायक माणूस आहे मी. तुझं दुर्दैव की तू माझ्याशी लग्न केलस. मला माणूस बनवण्याचा प्रयत्न केलास.”

शाल्मलीचा चेहरा पाषाण झाला होता.

“माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही दिलस अजूनही...“का आला आहेस आता?” तिचा स्वर अचानक टीपेला गेला. शंतनू दचकलाच एकदम.

मग हळू हळू बोलू लागला.

“तू या ट्रीटमेंटचा खर्च मला करू दिलास तर माझी गिल्ट जरा तरी कमी होईल. नुसती ट्रीटमेंट नाही श्रीशचा पुढचा सगळा खर्च शिक्षणाचा, सगळाच मला करू दे. प्लीज. मी एकदम रक्कम देत जाईन परस्पर बॅंकेत. परत तुला तोंडही दाखवणार नाही.”

शाल्मलीने डोळे मिटले क्षणभर. मग हसली जोरात. भीषण हास्य होतं ते.शंतनू आश्चर्याने पाहू लागला.

“अजूनही तू खरा आरसा नाहीच पाहिलास. किती अलगद या गिल्टमधून बाहेर पडू पहातो आहेस? तुझा अहं सुखावण्याचा हा अजून एक उजळ माथ्याचा मार्ग. कर्तव्य केल्याचं समाधान हवय तुला. पैसे दिलेस की तो बारीकसा सल जो जरा कुठे टोचू पहातोय आत, त्यालाही बोथट करू पहातो आहेस? वा! छान! का? कारण माझी ओढाताण माहित आहे तुला. मी पैसे घेऊन आयुष्य सोपं करू पाहेन असं वाटतंय तुला? बरोबर ना!”

“मला प्रायश्चित्त हवय गं!”

“प्रायश्चित्त?”

खदखदून विकट हसली आता मात्र शाल्मली.

"याला प्रायश्चित्त म्हणतोस तू? शंतनू, मी तुझ्यावर मनापासून प्रेम केलं. मला हे कबूल करण्यात कोणतीही लाज वाटत नाही. चुकीच्या ठिकाणी केलं एवढंच, पण म्हणून त्याची किम्मत कमी नाही होत. आणि जर माझं प्रेम खरंय तर त्याला अनुसरूनच वागेन मी.तुझी ही शेवटची इच्छाही पूर्ण करेन मी. पैसे देण्याची नव्हे. प्रायश्चित्त घेण्याची. हा जो सल मनात निर्माण झालाय ना तुझ्या, तो जन्मभर सलू दे उरी. कदाचित त्याने अजून थोडं माणूसपण येईल तुझ्यात. मलम नकोच लावूस यावर.जन्मभर या चुकीचं, श्रीशवरच्या अन्यायाचं दु:ख मुरत जाऊ दे आत आत. मग जरा अधिक माणूसपण उतरेल तुझ्यात. उद्या तू दुसरं लग्न करशील... नाही करच तू... एकटं आयुष्य काढण्याची धमक तुझ्यात नाही. तुला नॉर्मल मुलंही होतील कदाचित. व्हावीतच नॉर्मल. श्रीशसारखं आयुष्य नकोच यायला कुणाच्या वाटेला. तो मूकबधीर जन्मला म्हणून नव्हे, ते बदलल्यातच जमा आहे आता, पण तुझ्यासारख्या पळपुट्या माणसाच्या पोटी असं स्पेशालिटी घेऊन जन्माला येण्याचं दुर्दैव नकोच परत कुणाच्या वाट्याला.

तुझ्या नॉर्मल मुलांना पाहताना, त्यांना मिरवताना तो सल तुला सतत टोचून अधिक माणूसपण उतरेल तुझ्यात. हे खरं प्रायश्चित्त असेल तुझ्या साठी."

शंतनू पाहतच राहीला. शाल्मलीचा शब्द नि शब्द पटत होता त्याला. चिरतही जात होता आतपर्यंत.

शाल्मली पुढे म्हणाली, “मी केलं असतं, पण सध्या या गडबडीत मला वेळ नाही व्हायचा. तेव्हा तूच वकिलाला भेटून घटस्फोटाचे कागदपत्र तयार करवून घे. मी लगेच सह्या करेन. तुला या बंधनातून मोकळं झाल्याशिवाय नवं नातं नाही जोडता येणार.तुझं प्रामाणिक पणे सर्व सांगणं आवडलं. ये तू आता.”

“तुला जराही वाईट नाही वाटणार हे नातं तोडताना?”

शाल्मलीच्या भुवया कपाळात गेल्या पार

“नातं???”

पुढे काहीच बोलू शकला नाही शंतनू.

“यावस तू आता. परत न भेटलास तर उत्तम, मी ही माणूस आहे, माझ्याही सहनशिलतेला मर्यादा आहेत. विसरू नकोस.”

“पण तू हा एवढा खर्च?”

“कंपनीने लोन दिलय”

“तुला ते फेडायला खूप मोठा हप्ता...”

“करेन मी मॅनेज”

“तू पैसे घे, मला प्रायश्चित्त म्हणून दुसरी अट घाल काहीही.”

“शंतनू, तू ये आता. मला अधिक नाही काहीच बोलायचंय.”

“मी जातो. पण तू परत विचार करावास. मला प्रायश्चित्त घ्यायला लावण्याच्या नादात तू स्वत:ला आणि श्रीशलाही शिक्षा देते आहेस.”

“मलाही प्रायश्चित्त घेणं गरजेचच आहे, चुकीचा निर्णय घेतल्याबद्दल. श्रीशला काही कमी पडू देणार नाही मी. तू यावस आता.”

शंतनू पडलेल्या खांद्यांनी आणि चेहऱ्याने बाहेर पडला.

शाल्मली दमून गेली होती शारिरीक आणि मानसिक श्रमांनी. बसलीच ती, तो गेल्यावर.

पण लगेचच दारावर टकटक झाली आणि दार किलकिलं होऊन केतकीचं डोकं हळूच डोकावलं.

शाल्मली पटकन उठली आणि तिने दार उघडलं. केतकी चटकन आत येऊन तिला बिलगलीच. शाल्मलीनेही तिला जवळ घेतली. मग पटकन म्हणाली “अगं, तू कशी आलीस वर? बाबाना सांगून आली आहेस ना? ते शोधत बसतील नाहीतर.” केतकीने दारातून बाहेर वळून पाहिले. केतकीचा बाबा होता उभा. मग शाल्मलीचं लक्ष गेलं

त्याच्याकडे. तो आत डोकावला. “केतकी ऐकेचना. हट्ट धरून बसली. तुम्हाला त्रास नाही ना होणार? थोड्या वेळाने येतो मी न्यायला. खाली कांचन जवळ थांबायला हवं मला. कृशियल आहेत पुढचे काही तास. म्हणालात तर आत्ताच नेतो मी तिला.”

“नाही, नाही, राहू देत तिला. आणि मला यायचच आहे श्रीशला घेऊन ओटीमधे, येईल केतकी माझ्याबरोबर तेव्हाच.”

“थँक यू”

इतकं मनापासून आलं ते “थँक यू”.

शाल्मलीला प्रथमच जाणवलं किती गरज आहे मदतीची या माणसाला.

मग तो गेला नि क्षणात परत आला. “तुमचा मुलगा? कसा आहे?”

“बरा आहे आता.”

मग तो गेला.

तोपर्यंत केतकी आत येऊन श्रीशला न्याहाळत होती. बॅंडेज बघून जरा भेदरली होती. मग शाल्मलीने तिला शस्त्रक्रिया, मग नंतर काय काय करायचंय वगैरे सोपं करून सांगितलं.

“आंटी, मग मी श्री...श असं म्हटलं की तो वळून बघेल का गं माझ्याकडे?”

"हो बेटा. लगेच नाही कदाचित, पण काही दिवसांनतर जेव्हा त्याला आवाज ओळखू येतील, तुझा आवाज कळेल, तेव्हा बघेल."

"आंटी, तो मला केतकी ताई म्हणून केव्हा हाक मारेल गं?" शाल्मली खळखळून हसली. एकीकडे त्या बालीश प्रश्नाची तिला गंमतही वाटली, आणि त्यातली सकारात्मकता तिला एकदम स्पर्शून गेली. हसता हसताच तिचे डोळे पाणावले.

"हो गं, बोलता यायला लागलं की केतकी ताईंना केतकी ताईच म्हणायला शिकवू बरं आपण त्याला."

केतकी खुद्कन हसली मग.

"कांची मला लाडात असली की ताई म्हणते आणि चिडली की तायडे, तायडुटले काही पण म्हणते."

"डॅड रडतो सारखा. कांचन बरी होणार ना गं?" काही वेळाने केतकी म्हणाली.

शाल्मलीला पोटात गलबललं एकदम. "हो बेटा, होईल बरी ती. तू बाप्पाला प्रार्थना करतेस ना? मी पण करतेय. बाप्पा करेल तिला बरं"

"डॅड पण हल्ली बाप्पासमोर रडतो. पूर्वी कधीच बाप्पाकडे यायचा नाही."

शाल्मली पाहत राहिली. ‘काय आणि कसं शिकवायचं या लहान मुलांना? आपणच स्वत:च्या मनगटावर, कष्टावर विश्वास ठेवा वगैरे सांगायचं, नि अशा असहाय्य परिस्थितीत त्या परमशक्तीला शरण जात वेगळ्याच वाटेवर न्यायचं यांना. यातला योग्य समतोल शिकवता येईल आपल्याला या नव्या पिढीला? आपल्याला जमलाय हा समतोल? नशीब नावाचं काहीतरी आहेच की दडी मारून बसलेलं मनाच्या तळाशी. त्याचं काय करायचं? अनेक अनुत्तरीत प्रश्नांच्या लाटा, नि त्यावर अविरत हेलकावणारे आपण.’

श्रीशच्या हसण्याने शाल्मली भानावर आली. तो मधे केव्हातरी जागा झाला असावा आणि केतकीला पाहून खूश होऊन हसत होता. केतकी टुणकर उडी मारून श्रीशजवळ गेली. शाल्मलीने त्याला प्रथम बाथरूममधे नेऊन आणलं. मग दोघाना ज्युस दिला प्यायला.

घड्याळ पाहिलं. नर्सला बोलावून श्रीशचा वरण भात द्यायला सांगितला. कॅंटीन मधून दोघींसाठी खायला मागवलं. मस्त मजेत खाऊ पिऊ झाला. झोप झाल्यामुळे, वेदना कमी झाल्यामुळे किंवा केतकी आल्यामुळे श्रीश परत पूर्ववत हसऱ्या मोडमधे आला होता.

मग केतकीने बेडवर बसूनच काही रंगीत तबकड्यांचे वेगवेगळे आकार बनवण्याचे गेम त्याच्याबरोबर खेळले. काही वेळाने तिघे

खाली उतरले. शाल्मली आधी केतकीला घेऊन आयसीयू जवळ गेली. केतकीचा बाबा बसला होता शुन्यात नजर लावून . “आंटी मी तुझ्याबरोबरच येते ना.” केतकी बारीक तोंड करून म्हणाली.

“अगं, ओटीमधे तुला सोडणार नाहीत ना. तू जरा तुझ्या डॅडजवळ बस बरं. तो पण एकटाच आहे ना. जा. मग परत वर जाताना तुला भेटून जाईन मी.”

“प्रॉमिस?”

“येस, प्रॉमिस!”

या दोघी जवळ पोहोचल्या तरी केतकीच्या बाबांचे लक्ष नव्हतेच. मग केतकीने हाक मारली. तसा भानावर आला.

“मी याला ओटीमध्ये नेतेय. केतकीला सोडायला आले. कांचन?”

त्याने शाल्मलीकडे पाहीले. “७२ तासांची मुदत संपत आलीय. अजून ...”

“हं.”

“शुद्धीवर यायला हवीय ती ...”

असहायता, डेस्परेशन त्याच्या आवाजात स्पष्ट जाणवत होतं.

‘काय आणि कसा धीर देणार?’

“तुम्ही आत येऊन बोलाल का काही तिच्याशी? कदाचित मी तिच्याकडे नकारात्मक उर्जाच पोहोचवतोय का असं वाटतंय मला.”

शाल्मलीला काय बोलावं कळेचना. पण मग तिने श्रीशला त्याच्याकडे दिलं आणि ती सरळ आत गेली, जाताना केतकीला म्हणाली “चल तू ही.” केतकी जरा घुटमळली, पण मग तिचा हात घट्ट धरून गेली आत.

श्रीश केतकीच्या बाबाकडे पाहून नेहमीसारखं गोड हसला आणि त्या माणसाच्या ओठांवर कितीतरी दिवसानी स्मित आलं. केवळ संसर्गानं आलेलं स्मित. लहान मुलाच्या निर्व्याज हास्याच्या प्रतिसादाचं स्मित!

शाल्मली आत गेली. केतकीने तिचा हात घट्ट धरून ठेवला होता. शाल्मली बेडजवळ गेली. तिने कांचनच्या हातावरून हलकेच हात फिरवला. फिरवत राहिली. मग तिच्या कानाशी जाऊन हळूवार स्वरात म्हणाली, “कांची, बघितलस का कोण आलय? तायडुटली आलीय बघ तुला भेटायला.”

मग केतकीला म्हणाली “मार बरं हाक तिला. “

“कांची, कांची, डोळे उघड, चल घरी जाऊया. “

“तिला काय आवडतं सगळ्यात ते खाऊया म्हण.”

“चल आईस्क्रीम खाऊया. पिझ्झा पण. तुझ्या आवडीचा चीज पिझ्झा!”

मग तिने तिच्या मोकळा हाताने कांचनचा हात हातात घेतला. बोटात बोटं गुंतवली. तिला कांचनने पण बोटं घट्ट केल्याचा भास झाला. “ती जागीय. धरला माझा हात ...”

शाल्मलीने चमकून पाहिले. हात हातात घेऊन पाहिला पण तो नाही हलला.

“केतकी आता परत थोड्या वेळाने डॅड बरोबर आत येऊन असंच बोल, हात हातात घे, घाबरू नकोस. ऐकशील माझं एवढं?”

तिने जोरजोरात हो अशी मान हलवली.

परत एकदा कांचनला हलका स्पर्श करून दोघी बाहेर आल्या. कांचनचा बाबा श्रीशला घेऊन उभा होता. तो लगेच जवळ आला.

“डॅड, कांचीनं हात धरला माझा. खरंच.” प्रचंड आशेने त्याने शाल्मलीकडे पाहीले. “हो म्हणजे केतकीला खात्री वाटतेय तशी. थोड्या वेळाने परत आत जा तुम्ही दोघे. केतकी गप्पा मार कांचन शी. ओके?”

“हो आंटी!”

"तुम्ही परत वर जाताना याल? प्लीज?"

लहान मुलासारखं काकुळतीला येत त्याने विचारलं.

"हो येईन."

शाल्मली ओटीकडे वळली. श्रीश मागे वळून त्या दोघांकडे हात करत होता.

ओटीतून परत जाताना ती आयसीयुच्या दिशेने वळली. बाहेर कोणीच दिसत नव्हतं या दोघांपैकी.

मग रुममधे डोकावली. बरेच डॉक्टर्स, नर्स, दिसले. मनात उगाचच धाकधूक झाली तिच्या. तेवढ्यात केतकी आली तिच्याजवळ, पाठोपाठ तिचा बाबा.

"कांचन शुद्धीवर आली. मगाशी केतकीला भास नव्हता झाला. खरच जागी होत होती ती. माझाही हात धरला. डॉक्टर तपासताहेत आता."किती नि काय सांगू असं झालं होतं त्याला.

शाल्मलीने मग आनंद व्यक्त केला मनापासून.

तो परत आत गेला. केतकी तिचा हात धरून थांबली. मग त्या दोघी बाहेर येऊन थांबल्या.

डॉक्टरांचा ताफा बाहेर पडला. मग या दोघी आत गेल्या. कांचनने डोळे उघडले होते. डोळ्यात ओळखही होती. ती बोलण्याचा प्रयत्न

करत होती. पण शब्द बाहेर पडत नव्हते. तिचा बाबा मात्र तिच्यापासून एक मिनिटही दूर जाणार नव्हता आता. केतकीला पाहिल्यावर कांचनच्या डोळयात वेगळीच चमक आली. त्यावरून तिचा मेंदू, स्मरणशक्ती काही प्रमाणात तरी काम करतेय हे कळत होतं. केतकीने हात हातात घेताच तायडी असा अस्पष्ट उच्चार तिच्या तोंडातून बाहेर पडला आणि केतकी आणि तिचा बाबा खाडकन उभेच राहीले.

दोघांनी एकमेकांकडे आणि मग शाल्मलीकडे पाहीले.

मग कांचनची नजर शाल्मलीकडे आणि तिच्या कडेवरच्या श्रीशकडे गेली . बा...अ ती म्हणाली.

केतकी पटकन पुढे होऊन म्हणाली श्रीश, त्याचं नाव श्रीश. कांचनच्या नजरेत ओळख नव्हती अर्थातच.

मग तिची नजर बाबाकडे गेली. डा...डा ती कसंबसं बोलली. तिचा डॅड नुसता पाहत राहिला .. मग जवळ गेला, “कांची... बाळा माझ्या...” असं म्हणून तिचा हात हातात घेऊन बसला.

त्या तिघांना त्यांच्या त्या आनंदी कोषात सोडून शाल्मली वर निघाली रुमकडे.

वर आल्या आल्याच फोन आला घरून. बाबाना घरी आणलं होतं. आई, वहिनी, अमेय अनुज निघत होते हॉस्पिटलमधे यायला. तिलाही बरं वाटलं सगळे भेटतील म्हणून.

मग संध्याकाळ त्यातच गेली. सगळे आल्यावर ती श्रीशला आई वहिनीच्या ताब्यात देऊन, अमेय अनुजला योग्य त्या सूचना देऊन सॅमला भेटायला गेली.

सॅम चक्क लगेच भेटला. मग म्हणाला थांब जरा पुढचं श्येड्यूल बघू, नसेल काही फार तर बाहेर जाऊ, मला कंटाळा आलाय या वातावरणाचा. आणि तुझ्याशी महत्वाच्या विषयावर बोलायचंय.

शाल्मली म्हणाली मलापण.

सॅम ची नेहमीप्रमाणे एक भुवई वर गेली आणि शाल्मली खळखळून हसली.

त्याने चटकन वर पाहिलं. किती दिवसांनी अशी दिलखुलास हसली आपली ही जीवाभावाची मैत्रिण!

सॅमने पाहिलं तर नव्हत्या काही अपॉईंटमेंट्स. मग निघाले दोघं. वहिनीला सांगितलं तिने तसं. जवळच्याच कॉफी शॉपमधे गेले.

मग सॅम म्हणाला लेडीज फर्स्ट. तिने मग शंतनू बरोबरचं संभाषण सांगितलं. "मला तुझा हा निर्णय गैरव्यवहारी वाटतो शाम. प्रायश्चित्त म्हणून तू बरंच काही करू शकली असतीस. त्याला कोर्टात खेचून त्याची बदनामी करू शकली असतीस. किंवा आणखी काही. यात तर मला तुझाच सगळीकडून पराभव दिसतो गं."

“नाही सॅम. तसं मी करते तर ती शिक्षा ठरती. तो जो आता थोडा का होईना माणसात येऊ पहातोय तो परत स्वत:च्या कोषात गेला असता. काय केस लढणार होते मी? तो तर सगळ्यालाच तयार आहे. घटस्फोटाला, पैसे द्यायला. पैसे द्यायला तर तो तेव्हाही तयार होता जेव्हा मी घर सोडून बाहेर पडले. आता त्याला कुठेतरी आतून, आपण चुकतोय ही खरी जाणीव होतेय. मी खरंखुरं प्रेम केलय रे शंतनू वर. आणि ज्याच्यावर आपण खरं प्रेम करतो त्याचा ऱ्हास नाही पाहवत. तो कुठेतरी मला माझाही ऱ्हास वाटतो.

आता माझ्या प्रेमात ममत्व, आकर्षण नाही उरलं त्याच्याविषयी, ते शून्य झालं. त्याच्या देखण्या रुपाचा माझ्यावर काडीमात्र परिणाम नाही झाला जेव्हा परवा इतक्या दिवसांनी त्याला भेटले. आश्चर्य म्हणजे त्याच्याही वागण्यात तसं आकर्षण कुठेच नाही जाणवलं मला.

पण त्यानं माणूस म्हणून वर यावं असं अजूनही मला वाटतं. पहिली पायरी असते स्वत:ला नीट ओळखण्याची. सुदैवाने तो ती चढलाय आता. यावेळी जर मी पैसे घेऊन मानसिक कुबड्या दिल्या त्याला तर तो चांगला माणूस बनता बनता राहिल आहे तसाच.”

“शाम, हा आदर्शवाद बोलायला बराय गं. पण प्रत्यक्षात तू स्वत:चं आणि पर्यायाने श्रीशचं समृध्दीभरलं आयुष्य नाकारते आहेस. पैशाला किती महत्व आहे हे मी नकोय सांगायला तुला. बरं शंतनूकडून पैसे घेणं न्यायानेही बरोबरच होतं ना?”

"सॅम, अरे आत्ता कुठे मी नोकरी करायला लागून वर्ष ही व्हायचंय. मी आर्थिक प्रगती करेन अरे चांगली. श्रीशला जे जे गरजेचं आहे सगळं पुरवेन. महत्वाच्या क्षणी काही कमी पडतंय असं वाटलं तर तुझ्याकडे हक्काने लोन मागेन. देशील ना?"

"शाम, तुला माहीत आहे ते."

"मग झालं तर. माझं झालं बोलून. अब तेरी बारी कालिया..."

सॅम तिच्या त्या नाटकी टोनवर दिलखुलास हसला.

मग एकदम सिरीयस झाला. वॉलेट मधून एक फोटो काढला आणि तिच्यासमोर ठेवला.

शाल्मलीने फोटो उचलून पाहीला. एका गोऱ्या मुलीचा फोटो होता. निळ्या डोळ्यांची, सोनेरी केसांची भलती गोड मुलगी. आश्चर्याने हसून तिने समीरकडे पाहिलं.

"अरे लबाडा, इतके दिवस लपवून ठेवलस. कितीदा तुला लग्नाबद्दल विचारलं तर राजे गप्प ते असे गोड गुलाबी चेहेऱ्यात निळ्या डोळ्यात अडकले होते होय?"

समीर अजूनही सिरियसच होता.

"काय झालय समीर? "

"शाम, ही 'मी'. "

“मी??”

“हो हिचं नाव मी, अ‍ॅज इन ‘Mie’”

“माझ्याच युनिव्हर्सिटीत होती शिकायला. आम्ही कधी एकमेकात गुंतत गेलो कळलच नाही. सगळं मस्त होतं गं सुरू. शिक्षण, प्रेम, सगळच. पण मग शिक्षण संपलं, तिथे घ्यायचा तेवढा अनुभवही घेतला. पहिल्यापासूनच तिला माहित होतं मी भारतात परतणार. आम्ही तो विचार वेळ आल्यावर करू असं ठरवलं होतं.

पण मी परत यायला निघालो तेव्हा तिने माझ्याबरोबर यायला नकार दिला. खूप वाईट वाटलं मला. कारण लग्न नसलं झालं तरी नवरा बायकोसारखेच राहत होतो आम्ही. माझ्या मनात ती बायकोच आहे माझी. मग मी इथे येऊन जम बसवला. वर्षभरात छान सेटल झालो. पण तिची आठवण गेली नाही मनातून. मग सगळं लक्ष कामावरच केंद्रित केलं.

मागच्या आठवड्यात तिचा फोन आला. म्हणाली मला यायचंय तिकडे. तुझ्याशिवाय नाही राहू शकत. पण नाहीच रुळले तिकडे तर, अशी भीती वाटतेय तिला. आपल्या नात्यात काहीच खोट नव्हती. पण आता तिकडे येऊन नाही जमलं तर सुंदर नातं विस्कटेल आपलं. असं म्हणतेय.

मला काही सुचत नाही शाम? काय करू? ये असं म्हणायला हजारदा फोन उचलला पण दर वेळी वाटलं, एकदा कसेबसे सावरलो, परत गेली सोडून तर येईल सावरता? कळत नाही काहीच मला.”

“सॅम, अरे, एक वर्ष तिने आपल्या मनातल्या असुक्षिततेमुळे गमावलं. आणि आता तीच असुरक्षितता तू मधे आणतो आहेस. प्रेमात खूप मोठी शक्ती आहे. तिला सांग म्हणावं ये लगेच. आणखी नको वेळ घालवूस. तिला सगळं मानवेल असं वातावरण तयार कर. कामाचं बघ मुख्य. बिझी झाली की लगेच रुळेल.

वेळ नको दवडूस. अगदीच नाही जमलं इथे तिला, तर तिच्याबरोबर परत जायची तयारी ठेव. तिने दाखवलीय ना तयारी इथे येण्याची, मग?”

“आई बाबा?”

“येतील की ते ही बरोबर तुमच्या . नाहीतर इथे दादा वहिनी आहेतच की तुझे.

त्यांना फोटो दाखव. प्रेमात पडतील सुनेच्या.”

सॅम हसला मग.

“अजूनही तू तीच शाम आणि मी तोच सॅम आहोत हे बघून बरं वाटलं. परवाची रडकी शाम बघून घाबरलोच होतो मी.”

तिने एक जोराचा फटका लगावला त्याच्या हातावर.

“पोरं होऊ देत सॅम्या तुला. मग बघु काय करतोस. शिंक आली तरी कसा हैराण होतोस ते बघायला मुद्दाम भरपूर आईस्क्रीम खाऊ घालणार मी त्याला. तुझ्यावर गेलं तर दुसऱ्या मिनिटाला शिंका सुरू.”

दोघंही भरपूर हसली मग.

“थॅंक्स शाम. तुझ्या तोंडून खातरजमा करायची होती. आज रात्रीच फोन करतो मी ला.”

“लग्नात नाव बदल बाबा पण, ए मी अशी कशी हाक मारणार अरे”

मग परत हसली दोघं. मग मात्र घाईने उठली आणि हॉस्पिटलला परतली. गाडीतून उतरताना शाल्मली म्हणाली “सॅम, फार गोड आहे रे मी, आनंदात ठेवशील तू तिला. ॲम सो हॅपी फॉर यू!”

सॅम फक्त हसला. या मैत्रिणीच्या जजमेंटवर त्याला स्वत:पेक्षाही जास्त विश्वास होता.

हॉस्पिटलमधे पोहोचल्यावर ती तडक रूमवर निघाली, पण मग सगळ्यांसाठी काहीतरी ऑर्डर करावं म्हणून मग आधी खालच्या फ्लोअरवर गेली.

ऑर्डर, आणि रुम नंबर सांगून लिफ्ट जवळ आली तर लिफ्ट साठी बरीच गर्दी होती. मग जिन्याने निघाली. दोन जिने चढून ओटीच्या फ्लोअरवर आली. तेव्हा केतकी तिथेच घुटमळताना दिसली.

“का गं, घरी नाही गेलीस?”

“नाही, आज आत्या नाही ना आली, मग डॅड मला सोडून कसा येणार?”

“ओह, मग आता?”

तिने नुसतेच खांदे वर केले.

“कुठय बाबा तुझा?”

“कांचन त्याला जराही सोडत नाहीय. हात धरून बस म्हणतेय.”

“नंबर पाठ आहे डॅडचा?”

“हो...”

“सांग”

तिने लगेच फोन लावला त्याला “मी केतकीला माझ्या रुममधे नेतेय. इथे एकटीच फिरतेय इकडे तिकडे.”

“अं हो. थॅंक यू. आज बहीण नाही आली माझी.”

“हं, म्हणाली केतकी.”

“कांचन मला हलू देत नाहीय.”

“हो.”

हसली शाल्मली मग.

“तुम्ही द्या तिच्याकडे पूर्ण लक्ष. केतकी श्रीशची छान गट्टी जमलीय. मला मदतच होईल तिची. डोन्ट वरी.”

“थॅंक यू, थॅंक यू सो सो मच अं … मॅम.”

“शाल्मली… “

“ओह, थॅंक यू शाल्मलीं.”

“ही किती मोठी मदत आहे तुमची मी सांगू शकत नाही तुम्हाला.”

शाल्मलीने बाय म्हणून फोन बंद केला.

‘गॉड ब्लेस हर, ’

केतकीचा बाबा मनातल्या मनात म्हणाला.

शाल्मली केतकीला घेऊन वर आली. पाठोपाठ ऑर्डरही आली. मग सगळ्यांचं मिळून खाऊ पिऊ झालं. अमेय अनुजची केतकीशी लगेच गट्टी जमली. तुझं नाव कायै? अनुजने विचारलं. “केतकी”

“बाबांचं नाव?”

“केतन”

“आडनाव?”

पोरांच्या गप्पा सुरूच राहील्या.

श्रीश जरा झोपेला आल्यासारखा झाला.

मग मंडळी निघाली.

“आत्या, तू श्रीशला घेऊन कधी येणार घरी?”

“येईन बेटा लवकरच.”

“मग केतकीला पण घेऊन ये. मला तिला माझा नवा गेम शिकवायचाय”

“हो का? बरं बरं आणेन”

मग निघाले सगळे.

शाल्मली लिफ्टपर्यंत सोडून आली.

आल्यावर नर्सकडून तिने श्रीशचं जेवण मागंवलं. तो खाऊन झोपलाच. केतकी पण पेंगुळली. शाल्मली तिला म्हणाली, “उद्या घरी गेलीस ना की एक एक्स्ट्रा ड्रेस घेऊन ये . घरी कोण असतं?”

“कोणीच नाही”

“मग? तू एकटीच राहतेस?”

“नाही . डॅड मला शेजारच्यांकडे सोडतो.”

“तुझे आजी आजोबा?”

“डॅडचे आई बाबा देवाघरी गेलेत ममाचे यु एसला मामाकडे”

“ओह! मग जेवण वगैरे?”

“डॅडच करायचा, डबा आणायचा कधी कधी. पण मग कांचन पडली ...”

केतकी एकदम गप्प झाली.

“मला माहित आहे बेटा.”

“आज डॅड खूप खूश आहे आंटी. त्याने आम्हाला दोघींनाही जवळ घेतलं. आता तो रागावला नाहीय माझ्यावर.”

“तुझा डॅड तुझ्यावर कधीच रागावला नव्हता बेटा”

“होता. मी ममाचा हात धरला पण ती गेली ना बाप्पाकडे म्हणून”

“कोणी सांगितलं असं?”

“शेजारच्या आज्जीनी. त्या म्हणायच्या गुपचूप आत जाऊन बस किंवा झोप. कटकट केलीस तर डॅडला सांगेन. तो आधीच रागावलाय तुझ्यावर, आणखी रागवेल.”

“मला भीती वाटायची एकटीने त्या कोपऱ्यातल्या खोलीत बसायला आणि झोपायला.”

शाल्मलीला त्या पोरीसाठी भरून आलं मग.

तिने केतकीला जवळ घेतलं. मग म्हणाली, “हे बघ बाळा, डॅड तुझ्यावर बिलकुल नाही रागावलेला. पण अचानक सगळं त्याला एकट्याला करायला लागतंय ना ते झेपत नाहीय त्याला. आणि जेव्हा आपण नीट करू शकत नाही असं वाटतं तेव्हा चिडचिड होते बेटा माणसाची. कांचन अजून लहान आहे म्हणून मग जरा तुझ्यावर रागवलं जातं.”

“तुझी स्कूल?”

“कांचन पडल्यापासून गेलेच नाही मी.”

“हं !.”

“पण जायला हवय ना? उद्या बोलू आपण डॅडशी. तुझी आत्या?”

“ती खूप लांब रहाते.”

“हं!”

मग तिने केतकीला दात घासायला सांगितले. पाणी दिलं प्यायला. शू करून यायला सांगितलं.

शाल्मलीने बेड जोडला. स्वत: मधे झोपली. श्रीशचं बॅंडेज निघालं होतं. त्यामुळे तो शांत झोपला. हातांना मात्र बांधून ठेवलं खाजवू नये म्हणून.

मग तिने केतकीला थोपटलं. आईविना पोर बिलगलीच तिला. तिचं सारखं जवळ येणं, चिकटून बसणं, हात धरणं यांचा अर्थ कळला अचानक शाल्मलीला. मन भरून आलं तिचं या पोरीसाठी.

शाल्मलीनेही तिला कुशीत घेतलं. थोपटत राहिली.

सकाळी शाल्मली उठली तेव्हा दोन्ही पोरं शांत झोपली होती.

दुसरा दिवस उजाडला तोच मुळी गुड न्युज घेऊन. श्रीशला उद्या डिसचार्ज मिळणार होता.

कांचनला आज संध्याकाळीच आय सी यु मधून रुममधे शिफ्ट करणार होते.

शाल्मलीने सॅमशी फोनवर बोलून घेतले. पुढचे शेड्यूल नर्सकडे पाठवतो. ती प्रिंट देईल म्हणाला.

मग हळूच म्हणाला, ‘‘मी’ येतेय नेक्स्ट वीक’’

तिने मनापासून अभिनंदन केले.

मग ती श्रीशला घेऊन खाली आली. कांचनच्या रुममधे डोकावली. तिच्या बऱ्याच नळ्या निघाल्या होत्या. तिची नजर बरीच स्थिर झाली होती. शब्द हळू हळू पण स्पष्ट येऊ लागले होते. आज तिला लिक्वीडस दिली होती थोडी. बाकी पॅरामिटर्सही ठीक होते. थोड्याच वेळात तिला रुममधे हलवणार होते.

शाल्मलीला केतकीचा बाबा केतन उत्साहाने सर्व सांगत होता. केतकी मग थांबली तिथेच.

शाल्मली वर आली. थोड्या वेळाने दारावर टकटक झाली. दार उघडलं तर केतकी दारात उभी. "आंटी, आम्ही इथेच आलो तुमच्या समोर."

"हो का? अरे वा छान"

केतनही दारात आला मग. शाल्मली उठून श्रीशला घेऊन आली आणि कांचनच्या रुममधे गेली. कांचन आता सेटल्ड वाटत होती.

"किती दिवस रहावं लागेल अजून?"

"कमीत कमी ८, जास्तीत जास्त १५ असं म्हणाले डॉक्टर."

"हं. केतकी तुझी शाळा कुठे आहे"

तिने सांगितलेलं ठिकाण माहित होतं शाल्मलीला.

"स्कूलबस आहे?"

“हो”

मग केतनला ती म्हणाली, “तुमची हरकत नसेल तर मी हिला माझ्याकडे नेते काही दिवस. सध्या महिनाभर रजा आहे माझी. शाळेत जाईल. स्कूलबसला तिथला देऊ पत्ता. फोनवर बोला रोज. मला सध्या दर दोन दिवसांनी श्रीशला आणायचंय इथे. तेव्हा येऊन भेटेल तुम्हा दोघांना. इथे उगाच इकडे तिकडे फिरत बसेल. तुम्हालाही दोघींवर लक्ष ठेवणं कठीण ”

केतनला काय बोलावं कळेना. “तुम्हाला त्रास नाही होणार?”

“मला शक्य आहे म्हणूनच विषय काढला.”

त्याने केतकीकडे पाहिलं. ती आर्जवाने पाहत होती.

“आठवड्यात सोडलं नाही तर १५ दिवसांवर जाईल.”

“प्रयोग करून पाहू. नाहीच जमलं तर बघू मग.”

“काय म्हणू? थँक यू हा शब्द फार तोकडा आहे.”

“नकाच म्हणू काही. मी संध्याकाळी जाताना घेऊन जाईन तिला. स्कूलबसचा नंबर द्या. तिच्या क्लासटीचरला सांगून ठेवा फोन करून. स्कूल बॅग?”

“मी पोहोचवायची व्यवस्था करतो.”

केतकीचा चेहरा फुलून आला. कित्येक दिवसांनी ती एवढी आनंदी दिसत होती. केतन पाहत राहिला. मग विचारात पडला. “काय केलं या बाईने असं की ही पोर परत हसायला लागली?” दुपारी कांचनला झोप लागल्यावर केतन जाऊन केतकीचे कपडे, युनिफॉर्म्स, स्कूल बॅग, बाकी सामान घेऊन आला.

संध्याकाळी केतकी कांचनला भेटून आली. डिसचार्ज झाला आणि तिघे निघाले. केतकीने निघताना कांचनला किसी दिली तेव्हा डॅडला पण दिली. केतनचे डोळे पाणावले.

पुढचे काही दिवस भराभर गेले. केतकीचं रुटीन सुरू झालं. दर दोन दिवसांनी हॉस्पिटल वाऱ्या. शाल्मली घरून हळू हळू कामात लक्ष घालू लागली. एकदा ऑफिसचे सगळे जण भेटून गेले. प्रशांत म्हणाला, “कामाचं टेन्शन नको घेऊस सध्या.” दिनेश ही म्हणाला “मॅम काही अडलं तर मी करेनच फोन.”

ती ही निश्चिंत झाली मग.

मंडळी बाहेर पडली तेवढ्यात आई घाईघाईने आत आली. तिच्या हातात एक पाकिट होतं.

“काय आहे हे आई?”

“हे बघ, शंतनूचं पत्र आहे. बघ उघडून पटकन. श्रीशला त्याने खेळणं पाठवलं तेव्हाच आशा वाटली होती गं. आता तर श्रीश बराही

होईल. मग परत तुम्ही एकत्र याल अशी खात्रीच वाटत होती मला आणि तुझ्या बाबांना.”

शाल्मलीने आईला हाताला धरून खाली बसवले. मग म्हणाली, “आई शंतनू आला होता हॉस्पिटलमधे. खूप बदललाय तो. आधीपेक्षा चांगला माणूस बनू पाहतोय. त्याने अधिक चांगलं बनावं असं मलाही वाटतं. पण तुला वाटतंय तसं नाही काही होणाराय.

त्याला श्रीशला ऐकू बोलू येऊ लागलं तरी लावलेली मशीन्स, ते थोडं निराळं बोलणं हे सहन होणार नाही म्हणाला. माझं अंग आक्रसतं म्हणाला. पण प्रामाणिकपणे हे सांगितलं ही खूप मोठी गोष्ट आहे माझ्यासाठी. तो श्रीशचा सगळा खर्चही करेन म्हणाला. पण मी नाही ऐकलं. मला पैसा नकोय त्याचा. मीच त्याला घटस्फोटासाठी अर्ज करायला सांगितला. त्याला साथीची गरज आहे आई. म्हणून मोकळं करतेय या बंधनातून.”

आई पाहतच राहिली. “अगं, डोकं फिरलय का तुझं? कुठल्या स्वप्नांच्या दुनियेत वावरते आहेस? एकटी बाई म्हणजे समाजातल्या लांडग्यांना आयतच फावतं. आम्ही किती दिवस पुरणार आहोत? दादाला त्याचा संसार आहे. हे असं पोर पदरी. कोण स्विकारणार तुला?”

“आई...!”

"सत्य स्विकारलं नाही म्हणून नाहीसं तर होत नाही ना?"

"आई, अगं शंतनू परत एकत्र येऊ नाहीच म्हणत आहे. लक्षात येतंय का तुझ्या? तो फक्त खर्च उचलायला तयार आहे जे तो आधीही म्हणत होताच. आठवतंय?"

आई, पाहत राहिली नुसती.

"हे बघ आई, मी ही शंतनूवर मनापासून प्रेम केलय. पण म्हणून मी माझ्या मुलाला सोडून राहावं हे तुम्हालाही नव्हतं ना पटलं, म्हणून घेऊन आलात ना परत? तुम्हाला आशा होती तो बदलेल. मला अटकळ आली होती त्याच्या स्वभावाची. असो." तुम्ही मला भरपूर शिकवलंय आई. तुझ्या नातवाला काही कमी नाही पडू देणार मी. जरा वेळ लागेल मला बस्तान बसायला एवढंच. पण करेन मी, विश्वास ठेव."

आई कितीतरी वेळ तशीच बसून राहिली मग. शाल्मलीला माहित होतं, हे सगळं पचनी पडायला वेळ लागणार होता. तिनेही विषय नाहीच वाढवला मग.

केतकी आलीच तेवढ्यात शाळेतून. तिची चिव चिव सुरू झाली. आज हॉस्पिटलला जायचं होतं. मग निघाली तिला आणि श्रीशला घेऊन. श्रीशची शस्त्रक्रिया होऊन दोन आठवडे झालेत. इंम्प्लांट शरीराने स्विकारलाय. पुढच्या आठवड्यात परत दाखवायचं आणि मग

ॲक्टिवेशन कधी करायचं ते ठरवू असं सांगितलं. सॅम दिसत नव्हता कुठे. "मॅम डॉक्टर बाहेर गेलेत पण तुम्हाला थांबायला सांगितलय ते येईपर्यंत" नर्सने निरोप दिला. केतकी आधीच कांचनकडे गेली होती.

शाल्मलीही मग तिकडे गेली. कांचन कॉटवर पाय पसरून बसली होती टी व्ही पाहत . श्रीश आल्यावर तिचीही कळी खुलली. प्लास्टर काढलेलं दिसत होतं हाता पायाचं. छोटा वॉकर होता जवळ ठेवलेला. "आंटी, आज मला चालवणार आहे फिजीओ आंटी." तिने उत्साहाने सांगितलं. "हो का? अरे वा. चला मग हा तुझ्या आवडीचा खाऊ खा मग पटकन."

गोड खाऊ बघून आणखीनच कळी खुलली तिची. "केतकी डॅड कुठय?"

"बाहेर गेलाय औषधं आणायला"

"ओके"

"तुझ्या टीचरचा निरोप सांगितलास का?"

"ओह... विसरले."

"आता आठवणीने सांग आला की."

"हो सांगते."

केतन आलाच तेवढ्यात.

मग केतकी म्हणाली “डॅड, मी ॲबसेंट होते ना त्याचं लेटर मागितलय टीचरने.” “आणि कांचनसाठी लेटर आणि मेडिकल सर्टीफिकेट” शाल्मली म्हणाली .

“हो ते पण.”

“ओह, पाठवतो मी लगेच उद्या. तुम्ही केव्हा येणार आता?”

“पुढच्या आठवड्यात बोलावलय.”

“अच्छा! कांचनला दोन दिवसात डिसचार्ज देऊ म्हणाले.

“अरे वा.”

“मी त्याच दिवशी केतकीला घेऊन जाईन.”

शाल्मली काहीच बोलला नाही.

“काय झालं?”

“केतकी विषयी बोलायचं होतं तुमच्याशी. महत्वाचं आहे फार.” मुलं खेळण्यात गुंतलेली पाहून शाल्मली म्हणाली.

केतन अस्वस्थ झाला. “काही म्हणाली का ती तुम्हाला?”

“नाही हो. ती काय म्हणणार. बघू बोलू एखाद दिवशी.”

“नाही एखाद दिवशी नको. मी फोन करू का?”

“नाही फोनवर नको.”

“उद्या जमेल थोडा वेळ काढायला तुम्हाला? कांचनची फिजिओ जवळ जवळ दोन तास चालते. तसंही आत नाही सोडत नातेवाईकांनां. शेवटची पाच मिनिटं बोलावतात. तुम्ही तेव्हा येऊ शकलात तर... मी खूप कष्ट देतोय तुम्हाला पण ... “

“ठीक आहे, प्रयत्न करते.”

मग तो मुलांकडे गेला. श्रीशला कडेवर घेतलं. बहुधा त्याच्या कडेवर बसल्यावर श्रीशला खूप उंचावर बसल्यासारखं वाटत असावं. मज्जा वाटत असावी.

केतकीला त्याने शाळेबद्दल विचारलं. आंटीला त्रास नको देऊस म्हणाला.

नर्स म्हणाली डॉक्टर आलेत बोलावलय तुम्हाला. मग श्रीशला घेऊन निघाली. केतकीला जाताना हाक मारेन म्हणाली.

सॅम वाटच पाहत होता त्याच्या केबीन बाहेर तिची. चेहरा लहान मुलासारखा उजळलेला. पटकन तिला आत नेलं. तिथे मी बसलेली. फोटोपेक्षाही कितीतरी सुंदर. नितळ कांत, बोलके डोळे, हसरी जिवणी. एखाद्या चित्रकाराने मन लावून जसं एखादं चित्र परिपूर्ण करावं तशी. तिलाही शाल्मली ऐकून माहित असावी. जुनी ओळख असल्याप्रमाणे

मिठी मारली तिने. मागून सॅमला छान आहे अशी खूण केली शाल्मलीने. तो हसला.

मग कॉफी बरोबर गप्पा झाल्या. नक्षत्रासारखी ‘मी’ पाहून आई बाबांचा होता नव्हता विरोधही मावळला होता. याच हॉस्पिटलमधे ‘मी’ जॉईन होणार होती अर्थात सॅमच्या आईवडिलांच्या इच्छेप्रमाणे रितसर लग्न करूनच.

सॅम प्रचंड खुशीत होता. शाल्मलीला ते पाहून मनापासून आनंद झाला.

———-

दुसरे दिवशी श्रीशला आईकडे सोडून ती हॉस्पिटलला आली. फिजीओ टॉप फ्लोअरला होतं. तडक तिथेच गेली. केतन बसला होता बाहेर चेअरवर . हिला पहाताच उठून उभा राहिला.

“थॅंक्स!”

“इट्स ओके”

मग ती तो बसला होता त्याच्या समोरच्या खुर्चीत बसली.

“केतकी गेल्या काही दिवसात बरीच स्ट्रेस मधून गेली असावी असं एकंदर मला दिसलं. कांचनचा अपघात अलिकडचा, पण मला

असं वाटलं की तिच्या आईच्या मृत्यूचाही तिच्यावर बराच परिणाम झालाय.”

केतनचा चेहरा एकदम ताठरला.

“कधी ... गेल्या त्या?”

“सहा महिने झाले”

“केतकी कुठेतरी तिला त्यासाठी जबाबदार मानते असं वाटलं मला. म्हणजे तिला वाटतंय की ती आईला भेटायला गेली, तिने आईचा हात धरला आणि लगेच ती गेली असं काहीसं.”

केतन आश्चर्याने पाहत राहिला.

“तुम्हीही तिच्यावर रागावले आहात, विशेषकरून आई गेल्यापासून असा तिचा समज आहे.”

केतन नव्यानेच सगळं पाहत असल्यासारखा त्याचा चेहरा झाला.

“मला कल्पना आहे केतकीचे बाबा, त्यांच्या आईचं जाणं, दोन लहान मुलींची एकदम जबाबदारी अंगावर येणं, परत तुमची नोकरी वगैरे, माणूस हडबडून जातो. पण केतकी काय किंवा कांचन, अतिशय संस्कारक्षम वयात आहेत. विचार तयार होताना अनुभव मुळाशी असतात. येणारे विचार पडताळून पहायला हे अनुभव वापरतो मेंदू नकळत. अनुभव कोणत्या ना कोणत्या भावनांना जन्म देतात आणि

मग आनंददायी भावना देणारे अनुभव चांगले आणि दु:खदायक वाईट असा सरळ साधा हिशेब या नाजूक मेंदूंनी घातला तर त्यात त्यांचा काय दोष? त्यातूनच एक विचारशक्ती तयार होते. जी पुढे कायमची मेंदूला धरून राहते.

तुम्ही ज्या आजीआजोबांकडे तिला ठेवत होता त्यांचीही वागणूक फारशी चांगली नसावी तिच्याबरोबर.

गेले जवळपास १५ दिवस सतत केतकी माझ्यासोबत आहे आणि ती एक अत्यंत समजुतदार, प्रेमळ मुलगी आहे हे मी खात्रीने म्हणू शकते.

अशा तणावाखाली मुलं कधी खोटं बोलायला शिकतात, कधी मतलबी होतात, कधी हेव्यापोटी लहान भावंडांशी वाईट वागतात. पण मुळात शुद्ध मनाची असल्यामुळे केतकीमधे हे बदल नाही झाले हे सुदैवच! पण तिचा आत्मविश्वास कुठेतरी मार खातोय. तुम्ही ओरडाल म्हणून बऱ्याच गोष्टी ती तुम्हाला सांगायलाच जात नाही. जसं तिची ट्रीप गेली पण त्याची बरीच तयारी होती, तुम्हाला वेळ नसेल, मग तुम्ही चिडाल, या कारणाने तिने सांगितलच नाही तुम्हाला. एका आनंददायी अनुभवाला मुकली ती त्यामुळे. ही कांचनच्या अपघातापूर्वीची गोष्ट. ती डोक्याने हुशार असूनही म्हणावे तेवढे मार्कस् मिळत नाहीत तिला, कारण एकाग्रता कमी पडतेय तिची.''

केतनने अस्वस्थतेने केसातून हात फिरवला.

मी तुम्हाला हे नुसते प्रश्न सांगत नाही. मला योग्य वाटणारी, सहज शक्य असणारे काही मार्गही सांगणार आहे.बघा तुम्हाला पटतात का.तुम्ही नोकरी करता की व्यवसाय? "

"व्यवसाय आहे. बराचसा घरून करता येतो. फायनान्शियल कंसल्टींग करतो मी. माणसं आहेत हाताखाली. पण मला सतत मार्केटवर, इतर काही गोष्टींवर, सरकारी धोरणांवर लक्ष ठेऊन रहावं लागतं. डोक्यात सतत तेच असतं. सुलेखा, केतकीची आई होती तेव्हा मी पूर्ण बुडलो होतो कामात. सतत बाहेरच असायचो. मला वाटायचं मी माझ्या कुटुंबासाठी काम करतोय, त्यांना सुखासमाधानाने राहता यावं म्हणून आटापिटा करतोय. जगातली सर्व सुखं त्यांना मिळावित म्हणून मी सतत नवनव्या योजना आखत होतो पैसे कमावण्याच्या. आलेला सर्व पैसा सुलेखाच्या हाती आणून सुपूर्द करत होतो. प्रत्येक सणाला, महत्वाच्या दिवसांना तिने भरपूर खरेदी करावी तिच्यासाठी, मुलींसाठी म्हणून आग्रही असायचो. पण अचानक भ्रमाचा भोपळा फुटला माझ्या. ते पुरेसं नव्हतं हे फार उशीरा लक्षात आलं माझ्या." बोलता बोलता केतन एकदम ब्रेक लागावा तसा थांबला.

गप्पच बसला मग.

"काय झालं होतं त्याना? केतकीच्या आईला? कशाने गेल्या?"

केतनने नुसतीच मान हलवली. काही काळ शांततेत गेला. मग एकदम म्हणाला "मीच मारली तिला असंच म्हणावं लागेल कदाचित!"

शाल्मली दचकलीच एकदम.

मग म्हणाला, "माझ्या या व्यवसायात भरपूर पैसे कमावण्याच्या इच्छेपायी सुलेखाला हवा तसा वेळ, लक्ष नव्हतो देत मी. सगळ्या घरादाराची संपूर्ण जबाबदारी तिच्यावर सोडून मी व्यवसायात बुडून गेलो. तिला खूप एकटेपण आलं असावं. तेवढ्यात तिचा परदेशी असणारा मित्र परत आला. दोघांच्या भेटीगाठी झाल्या. सुरवातीला एकदोन वेळा मिळूनच भेटलो. पण मग मला नसायचा वेळ मग ते दोघे भेटत. त्याचा घटस्फोट झाला होता. हळू हळू ती गुंतत गेली जास्तच. मला कळलंच नाही. एकदा अचानक फाईल विसरली म्हणून मधेच घरी आलो तर बेडरूममधे दोघं..." मी वेडाच व्हायचा बाकी राहीलो. तसाच घराबाहेर पडलो. आठ दिवस भटकलो नुसता वेड्यासारखा. मग बसून विचार केला. शांतपणे घरी आलो. आयुष्य पहिल्यासारखं सुरू केलं. तो विषयच काढला नाही. जसं काही घडलंच नाही असा वागू लागलो. फक्त सुलेखाला स्पर्श नाही केला कधीच. ती नजर चुकवायला लागली. प्रचंड अपराध्यासारखी मुद्रा असायची. पण तिच्याशी या विषयावर संवाद नाही साधला. बाकी रुटीन नॉर्मल. असे सहा महीने गेले. खंगली ती. मी अधिकच कामात गुंतवून घेतलं स्वत:ला. एक

दिवस काही कामाने गाडी घेऊन बाहेर गेली आणि समोरून येणाऱ्या ट्रकने उडवली. हॉस्पिटलमधे पोहोचलो तेव्हा शेवटच्या घटका मोजत होती. एकच वाक्य बोलली "मला क्षमा करा" बस. केतकी आत आली, तिने दुसरा हात हातात घेतला नि तिने डोळे मिटले. मी बोलायला हवं होतं तिच्याशी. भांडलो असतो तरी चाललं असतं पण हा असा ताण नको होता द्यायला मी. मला वाटलं विषयच नको तो. पण असं नसतं हे फार नंतर कळलं गोष्टी हाताबाहेर गेल्यावर. तिचीही संपूर्ण चूक नव्हती. माझीही होती. मुळात मी एकटेपणा दिला तिला. पुढचे सहा महिने अचानक दोन मुलींची जबाबदारी पेलवताना त्रेधा उडाली. आयुष्यावरचं नियंत्रणच सुटलं. आभाळच फाटल्यासारखं झालं. कुठे कुठे म्हणून लक्ष द्यावं कळेना. व्यवसाय मार खातोय तर खाऊ दे असा विचार करत होतो. पण मग कांचनचा अपघात झाला. तो ही माझ्याच निष्काळजीपणामुळे. हात धरेन अशा विश्वासाने उडी मारली तिने पण निसटला माझ्या हातून.आणि आता तुम्ही जे सांगताय ते ऐकून तर जमिनच हादरलीय माझ्या पायाखालची."

केतन उठून फेऱ्या मारू लागला. मग परत बसला.

"तुम्हाला हे सगळं का सांगितलं? माहीत नाही. कदाचित पूर्ण अनोळखी माणसासमोर मन मोकळं करायला सोपं जातं का?

सुलेखालाही कोणी भेटलं असतं असं तर बरं झालं असतं कदाचित.''बराच वेळ कोणीच काही बोललं नाही.

मग शाल्मली म्हणाली, ''केतकीचे बाबा, जे घडून गेलं त्याला कोणीच काही करू शकत नाही. केतकी कांचनला यातलं कधीच काही कळणार नाही याची काळजी घ्या. तुम्ही घरून काम करताय ही एक उत्तम गोष्ट आहे. जेव्हा मुली घरी असतील तेव्हा त्यांना पूर्ण वेळ द्या. म्हणजे पूर्ण लक्ष त्यांना द्या. त्या काय सांगताहेत नीट ऐका. सतत संवाद होऊ दे. तुमचं मत सांगा. रात्री झोपण्या पूर्वीचा काही वेळ नक्की त्यांच्याबरोबर घालवा. त्यांच्या प्रश्नांची उत्तरं द्या. त्यांच्या आईची त्यांना खूप आठवण येते तशी ती तुम्हालाही येते हे कळू द्या त्यांना. हा मुद्दाच तुम्हा तिघांना बांधून ठेवेल, मला खात्री आहे. तुमचं खूप प्रेम आहे हे कळू दे त्यांना. कधीकधी प्रेम कृतीतून दिसावं, कधी शब्दांनी बोलून सांगावं. कधी स्पर्शाने पोहोचवावं. नुसतं मनी ठेऊ नये बंदिस्त करून. मी जरा स्पष्टच बोलतेय, पण धोका जाणवला म्हणून बोलले.''

''तुम्हाला धन्यवाद कसे द्यावेत हेच कळत नाही मला. एक विनंती आहे. महिन्यातून एखाद वेळी केतकीशी बोलाल? मला माझी मुलगी परत हवीय आणि तुम्हीच माझी मदत करू शकाल.''

शाल्मली हसून म्हणाली ''आनंदाने बोलेन. वरचेवर बोलेन आणि तुम्हाला तुमची प्रगती ही सांगेन.''

“तुमच्या बरोबर बोलल्यावर माझेही डोळे उघडले काही प्रमाणात. मलाही ताबडतोब एक फोन करायचाय. निघते मी. पुढच्या आठवड्यात श्रीशचं इंम्प्लांट ॲक्टीव्हेट करणार आहेत. मला माझी लकी चार्म केतकी हवीय तिथे. तुम्हाला जमणार नाही यायला कांचन मुळे, पण मी घेऊन जाईन तिला तुमच्या घरून. चालेल?”

“नक्की पाठवेन. मला दिवस वेळ कळवा.”

शाल्मली बाहेर पडली आणि तिने शंतनूचा नंबर फिरवला.

शाल्मलीने दोन तीन वेळा शंतनूचा नंबर फिरवला पण बिझीटोन आला.

मग ठेवला फोन पर्समधे तर लगेच वाजायला लागला. शंतनूचाच कॉल.

“हॅलो, मी शंतनू ”

“हो बोल. तुझाच नंबर ट्राय करत होते बिझी लागला.”

“तुलाच लावत होतो”

“ओह, बोल ना.”

“ते पेपर्स मिळाले?”

“हो. आजच.”

“वाचलेस?”

“नाही.”

“का?”

“गडबड होती जरा. आता घरी जाऊन डिव्होर्स पेपर्सवर सह्या करून लगेच कुरियर करते.”

“हं!”

“तू का फोन करत होतीस?”

शाल्मलीला पटकन शब्द सुचेनात.

दोन क्षण शांततेत गेले.

“बोल ना”

“शंतनू, मी तुला एवढंच सांगायला फोन केला की तू तुला हवं तेव्हा श्रीशला भेटू शकतोस जेव्हा तुला इच्छा होईल, किंवा असं म्हणू, जर तुला इच्छा होईल. तुझा तो हक्क आहे आणि मी तो तुझ्यापासून हिराऊन घेणं योग्य नाही.”

बराच वेळ पलिकडे शांतता पसरली.

“हॅलो??”

“हं, हॅलो, ” शंतनूचा ओला आवाज फोनवर परत आला. “मी, नंतर बोलू?”

“हं, ठीक आहे.”

“गैरसमज करून घेऊ नकोस प्लीज पण ...”

“कळतंय मला शंतनू .मला सांगायचं ते सांगितलं मी.”

“ऐक प्लीज...”

“शंतनू बस पकडतेय.”

“बरं”

———-

शाल्मली घरी पोहोचली. समोरच शंतनूचं लेटर दिसलं. तिने उघडून वाचायला सुरवात केली.

दोनपानी विल होतं. डिव्होर्स पेपर्स नव्हतेच.

‘माझी सर्व स्थावर आणि जंगम संपत्ती, जी पुढे नमुद केली आहे, माझी पत्नी शाल्मली आणि माझा मुलगा श्रीश यांच्या मालकीची आहे. त्या दोघांना जेव्हा वाटेल तेव्हा ते दोघे किंवा माझा मुलगा सज्ञान होईपर्यंत माझी पत्नी शाल्मली यावर हक्क बजाऊ शकतील. त्यांना कोणीही आडकाठी करू नये यासाठी मी कोर्टाच्या साक्षीने हे इच्छापत्र

बनवले आहे.’बाकी सर्व दोन पाने भरून शंतनू ची सर्व प्रॉपर्टीचे डिटेल्स त्यात लिहीले होते. तिला माहित असलेल्या आणि बऱ्याच माहित नसलेल्या संपत्तीची त्यात नोंद होती. तिला काहीच कळेना. परत एनव्हलप पाहिलं उघडून. तेवढेच पेपर्स होते.

काय करावं तिला कळेना. तिने परत शंतनूला फोन लावण्याचा प्रयत्न केला. लागला नाही. कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर असल्याचा मेसेज वाजला. “काय आहे याच्या मनात? जीव घाबरा झालाच तिचा जरा. नुकतच केतनकडून त्याच्या बायकोविषयी ऐकलं होतं तेच परत परत मनात घर करून राहिलं.

“शंतनूने जीवाचं बरं वाईट करून घ्यायचा विचार तर... परवा भेटला तेव्हा बदललेला वाटला आपल्याला. पण हे असं?”

परत परत फोन करून पाहिला दर वेळी कव्हरेजच्या बाहेर.

तेवढ्यात फोन वाजला तिचा.

शंतनू ...“हॅलो? अरे केव्हाचा फोन करतेय, ”

“हं, नेटवर्क नसेल. मी ड्राइव्ह करत होतो.”

“ओह, ओके. “शाल्मलीने सुटकेचा श्वास सोडला.

“मी...मी येतोय. आताच. मला फक्त एकदा बोलायची संधी दे.”

“बरं.”

शंतनूला ती इतक्या लवकर तयार होईल याची मुळीच अपेक्षा नव्हती.

“कुठे ... येऊ?”

“घरीच ये. मी आईच्या शेजारीच फ्लॅट भाड्याने घेतलाय.”

“बरं. पाऊण तासात पोहोचेन.”

“बरं”

केतकी आली तेवढ्यात शाळेतून. मग तिने तिचे खाणे पिणे झाल्यावर तिला अमेय अनुजकडे खेळायला पाठवले. श्रीश अजून झोपला होता. मी येईन न्यायला तोपर्यंत खेळ असं सांगून सोडून आली केतकीला. आईला म्हणाली, महत्वाचं काम उरकते श्रीश झोपलाय तसा. झालं की हिला नेते.

घरी जाईपर्यंत शंतनूचा फोन, “फ्लॅट नंबर विसरलो विचारायला.”

तिने सांगितला. ५ मिनिटात बेल वाजली.

शंतनू आत आला. अवघडून बसला. तिने पाणी दिलं. चहा आणि खायला आणलं.

चहा घेतला. मग म्हणाला,

“मी फार स्वार्थी माणूस होतो आणि अजूनही आहे हे मला कळतंय . पण मला बदलायची इच्छा आहे, तसा मी मनापासून प्रयत्नही करणार आहे.शाल्मली मी ही तुझ्यावर प्रेम केलय पण ते मर्यादित होतं हे मला अधिकाधिक कळतंय आता. माझ्या जीवनाकडून काही खास अपेक्षा होत्या. त्या पुऱ्याच होण्याची, पुऱ्या करण्याची मला सवय होती. श्रीशच्या जन्मापर्यंत तसंच सगळं घडतही होतं. अचानक त्याचं व्यंग समोर आल्यावर मी हडबडलोच. नेहमी सगळं स्वत:च्या मनाप्रमाणे घडण्याची किंवा घडवण्याची सवय लागलेल्या मला हे ही पटकन मनासारखं घडवण्याची घाई झाली आणि मी ताळतंत्रच सोडलं. तुला श्रीशपासून तोडण्याचा अमानुष निर्णय घेतला. मला माफ करणं तुला शक्य नाही हे माहित आहे मला. पण आता आलो नसतो तर परत कधीच ...श्रीशचं ऑपरेशन यशस्वी होईलच. व्हावंच. पण त्याआधीचा श्रीश बघायचाय मला. अनुभवायचाय. परवा शांत झोपलेला त्याचा चेहरा गेल्यापासून सतत डोळ्यासमोर येतोय. कुठय तो?”

“झोपलाय.”

“हं. मी थांबू इथे? की खाली जाऊन थांबू? उठला की बोलव वाटल्यास.”

“नाही, त्याची गरज नाही. थांब इथेच. आलेच मी.”

१५ मिनिटं ती स्वैपाकघरातच होती. रात्रीच्या जेवणाची तयारी करत. तेवढ्यात श्रीश जागा झालाच.

मग तिने त्याला वॉशरूममधे नेले. तोंड वगैरे धुऊन परत आणलं

मग बाहेर घेऊन आली. शंतनू पटकन उठून उभा राहिला.

श्रीशने त्याच्याकडे टक लावून पाहिलं. आणि मग नेहमीसारखं खुदकन हसला.

शंतनू पाहतच राहिला. त्या निर्व्याज दैवी हास्याने जणू त्याच्या आत्म्याला गदगदा हलवले. 'या बाळाला तू झिडकारलस? एका हास्याने त्याने जळजळणाऱ्या तुझ्या मनाच्या डागण्यावर गुलाबपाणी शिंपडल्यासारखी शीतलता दिली बदल्यात काहीच न मागता!!'

तो काही पावलं पुढे झाला आणि मग थांबला जागीच. 'येईल आपल्याकडे?'

मग शाल्मली त्याला घेऊन पुढे आली. शंतनूने बिचकतच हात पुढे केला तर श्रीश लगेच आला त्याच्याकडे. त्या सुकुमार बालस्पर्शाने त्याचं सर्व अंग रोमांचित झालं. 'का नाही म्हणालो आपण या स्वर्गीय आनंदाला? किती यातना दिल्या या मुलीला जी जीव ओवाळून टाकत होती आपल्यावर. ती ही अशीच बदल्यात कधीच, काहीच अपेक्षा न ठेवणारी. मूर्खासारखं पैशानी विकत घेऊ पाहत होतो हा स्वर्ग?'

त्याने श्रीशला अगदी जवळ घट्ट धरले. त्याचा बाळगंध रंध्रारंध्रात भरून घेतला. नकळत डोळ्यांवाटे अश्रू वाहू लागलेले त्याचे त्यालाही कळले नाहीत.

शाल्मली हे सगळं काहीशा आश्चर्याने पाहत राहिली. तिला त्यांची ती भावसमाधी भंग करावीशी वाटेना. चूक शंतनूचीच होती पण तरीही तो आणि श्रीश या परमानंदाला मुकले होतेच हे तर खरंच होतं.

मग श्रीश जरा वळला तसा शंतनू भानावर आला. श्रीश आता वळून त्याच्याकडे पाहत होता. आपल्या मोठ्या मोठ्या डोळ्यांनी तो शंतनूला निरखत होता. मग त्याची बाळबोटे शंतनूच्या चेहऱ्यावर फिरली. शाल्मलीच्या गळ्यात हुंदका दाटून आला. शाल्मलीच्या डोळ्यात पाणी दिसलं की श्रीश असाच हात फिरवायचा तिच्या चेहऱ्यावर.

शंतनूने परत त्याला घट्ट मिठीत घेतले. श्रीशचे हातही नकळत त्याच्या गळ्याभोवती गुंफले गेले. किती वेळ तो तसाच थांबला.

मग शंतनूने त्याला मांडीवर घेतले आणि तो खुर्चीत बसला. “मी याच्यासाठी काही खेळणी आणलीत देऊ का?”

शाल्मलीने फक्त मान हलवली. स्वत:च्या आवाजावर विश्वास नव्हता तिचा. ‘हे असं चित्र श्रीशच्या जन्माआधी किती वेळा मनात रंगवलं होतं आपण?’

श्रीशला जवळ बसवून शंतनू त्याला ती रंगीत ट्रेन फिरवून दाखवण्यात दंग झाला होता. श्रीश टाळ्या पिटून हसत होता.

शाल्मली त्या दोघांना सोडून आत गेली. तिने भाताचे तांदूळ वाढवले. पोळ्याही जास्त केल्या.

तेवढ्यात केतकी, अमेय अनुज सगळेच पळत पळत आले. दारात एकदम थबकले.

मग अमेय एकदम ओरडला, “शंतनूकाका, तू कधी आलास?’

“अय्या लाल ट्रेन ... बॅटरी वर चालणारी...”

ह्या मुलांना पाहून श्रीश चेकाळलाच. जोरजोरात उड्या मारून हसू लागला. मुलांना मग परत परत ट्रेन चालवून दाखवली शंतनूने.

मग सगळे एकदमच जेवले. मुलं जायला निघाली. “शंतनू काका, तू आता इथेच राहाणारेस?’

“नाही. शंतनूकाकाला ऑफिस आहे ना? तो परत जाणाराय. अमेय, अनुज, माझं एक सिक्रेट ठेवाल?”

“काय आत्या?”

“शंतनूकाका इथे आल्याचं तिथे नाही सांगायचं कोणालाच, ठेवाल हे सिक्रेट? आजोबांना बरं नाहीय ना? मी नंतर योग्य वेळ पाहून सांगेन.”

“ओके आत्या.”

“थॅंक यू”

शंतनू फक्त शाल्मलीला निरखत राहिला. ‘किती तारेवरची कसरत करावी लागली असेल तिला स्वत:च्या स्थितीबद्दल सांगताना.

मुलं घरी गेली.

“मी ही निघतो. उद्या येईन परत, चालेल?”

तिने होकारार्थी मान हलवली.

“तुझ्याशी बोलायचं होतं.”

केतकीसमोर तिला कोणताच विषय नको होता. “उद्या बोलू.”

“हं. ही मुलगी?”

“हॉस्पिटलमधे ओळख झाली. हिच्या बहिणीला अपघात झालाय मोठा. वडील तिच्याजवळ अडकलेत. हिची शाळा बुडत होती, माझीही रजा होती, मग घेऊन आले इथेच. मोठी गोड पोर आहे. श्रीश बरोबर एकदम गट्टी जमलीय.”

“हिची आई?”

शाल्मलीने नकारार्थी मान हलवली.

“ओह, कठीण असेल सगळच मग.”

“खाली येतेस दोन मिनिटं?”

शाल्मलीने श्रीशला उचलले, “केतकी चल काकाला सोडून येऊ.शंतनूने श्रीशला घ्यायला हात पुढे केले, तिनेही दिला त्याच्याकडे.”

सगळे खाली आले. कोपऱ्यावर गाडी लावली होती. “काका, श्रीशच्या चिनला हात लाव, त्याला खूप आवडतं.”

शंतनूने श्रीशच्या हनुवटीला हळूच बोट लावलं तर खदखदून हसला.

“अरे, खरंच की. मला श्रीशच्या अजून गमती सांगशील केतकी?”

“हो...”

“उद्या सांग नक्की. आठवून ठेव. काय?”

“हो हो.”

मग कारमधे बसवलं त्यांना शंतनूने. रमलीच दोघं तिथे. डेक सुरू केला. गाणं लागल्यावर केतकी हाताने श्रीशला ठेक्यावर हातवारे करून दाखवायला लागली. तर तोही खिदळायला लागला.

कारजवळ काही क्षण उभे राहून शंतनू आणि शाल्मली ही मजा पाहू लागले.

मग एकदम शंतनू म्हणाला, “मी ट्रान्सफर घेतोय नोकरीतून या शहरात.”

शाल्मलीने जरा चमकून पाहिले.

“तू जेवढी मुभा देशील तेवढं श्रीशच्या सहवासात राहीन. तुला तुझ्या नोकरीत भरभराट करताना थोडा जरी माझा हातभार श्रीशला सांभाळण्यासाठी लागला तरी मला खूप बरं वाटेल. मी करंटेपणाने श्रीशला झिडकारलं आणि तुलाही मुकलो.

“मी तुझी वाट पाहीन शाल्मली. जन्मभर. पण म्हणजे मी तुझ्या आनंदाच्या आड नाही येणार.श्रीश जरा माझ्या सवयीचा होईपर्यंत मला इथे यावं लागेल. तेवढी मुभा दे. नंतर मी नेत जाईन त्याला माझ्याकडे.त्याच्या प्रत्येक टप्प्यावर माझा सहभाग असेल. प्रत्यक्षात असेल. नुसता पैशाने नव्हे. तू मला माफ नाही करू शकणार, कदाचित कधीच. मी चूक नाही गुन्हा केलाय. माफ कर म्हणण्यासारखंही माझं वागणं नव्हतं. त्यामुळे माफीचा भार नाही टाकत मी तुझ्यावर. माझ्यासारख्या माणसाशी संबंध जोडून वाटोळं झालं तुझ्या आयुष्याचं. पण हे तू बदलू शकतेस. तुझ्या आयुष्यात आनंद परत यावा ही माझी मनापासून इच्छा आहे. माझ्या या शब्दांवर विश्वास ठेवणं किती कठीण

आहे तुला हे मी जाणतो. पण आता माझ्या कृतीतून मी तो विश्वास परत मिळवेन. तुझं प्रेम मी कायमचं गमावलय, निदान विश्वास परत मिळवण्याचा प्रयत्न करेन.”

मग तो गप्प बसला.

शाल्मलीला काही सूचेना.

राग, संताप, उद्वेग, सगळ्या नकारात्मक भावनांनी गर्दी केली तिच्या मनात.

कारचं दार उघडून खसकन श्रीशला कडेवर घेतलं तिने. केतकीलाही हाताला धरून बाहेर काढलं. एकही शब्द न बोलता तरातरा चालत घराकडे निघाली.

शंतनू पाहत राहिला तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे. तिचा राग, तिरस्कार प्रचंड परिणामकारक होता त्याच्यासाठी. कुणीतरी चाबकाचे फटकारे ओढावेत तसं वाटत होतं त्याला. आपली लायकीच ती आहे मग दु:ख सहन करावं लागलं तर तक्रार कशाची असंच मन म्हणालं त्याचं.

पडलेल्या खांद्यांनी गाडीत बसला आणि रात्र घालवण्यासाठी एखादं हॉटेल शोधू लागला.

शाल्मली घरी आली. आपली एवढी चिडचिड का होतेय तिचं तिलाही कळेना.

केतकीला लगेच कळलं आज हिचा मूड नाही. गुपचूप झोपून गेली. तिला झोपलेलं पाहून श्रीशही लगेच झोपला.शाल्मली मात्र टकटकीत जागी राहिली. तळमळत.

‘काय हवय आपल्याला नक्की?’ तिचं तिलाच कळेना.

# 6

सकाळी उठली म्हणण्यात अर्थ नव्हता. झोपलीच कुठे होती? पण बेडवरून उठली. केतकीचा डबा केला. तिला मधेच येऊन उठवून गेली. केतकीने शहाण्या मुलीसारखं पटापट आवरलं सगळं. शाल्मलीला ती गप्प गप्प आहे हे जाणवलं.

काल केतनला आपण किती मोठं लेक्चर दिलं नि आता आपणही तसंच वागतोय की. मग तिने केतकीचे केस विंचरून देताना तिला म्हटलं, “केतकी आता कांचनला घरी सोडतील तेव्हा तू पण जाशील घरी. मग आम्हाला खूप आठवण येईल तुझी. तू येशील ना आम्हाला भेटायला?”

केतकी काही कळायच्या आत मुसमुसून रडायलाच लागली. बिलगलीच तिला. “आंटी, डॅडला सांगून मला इथेच ठेऊन घेना. मी कसलाच त्रास नाही देणार तुला. मी सगळी मदत करेन. प्लीज सांग ना गं डॅडला.”

“बेटा, हे बघ, कांचन तुला किती मिस करेल घरी? आणि डॅड पण. त्यालाच तुझ्या मदतीची खूप गरज आहे आता. आणि मी श्रीशला घेऊन भेटायला येणारच आहे तुला अधून मधून हो की नाही?”

“मला नाही जायचंय तिकडे.”

केतकी अगदी बारीक तोंड करून म्हणाली.

“हे बघ, सध्या ते राहू दे. आधी आपण आज मस्त सेलिब्रेट करू तुझा इथला दिवस. तुला काय आवडतं ते करू खायला.सांग बरं.”

“नकोय मला काही” फुरंगटून म्हणाली केतकी.

“बरं, नको तर राहीलं. मीच खाईन करून मग पिझ्झा. तू आपली पोळी भाजीच खा.”

“अं...काय गं आंटी?”

शाल्मली हसायला लागली मग.

“आणि दुसरं काय करूया? तुला मस्त ड्रेस आणूया का? तुला, कांचनला आणि श्रीशला सेम कलरचे, चालेल?” यावर मात्र केतकीने जोरजोरात मान हलवली. चला एक कळी तर खुलली.

केतकीला स्कूलबसला सोडून ती श्रीशला आईकडे सोडून आली. काल दिनेशने पाठवलेल्या काही गोष्टी तिला चेक करायच्या होत्या. त्या ती घेऊन बसली. पाहता पाहता बरेच मुद्दे निघाले. महत्वाचे आहेत. सांगायलाच हवेत लगेच म्हणून तिने दिनेशला फोन लावला तर तो क्लायंटकडे गेल्याचं कळलं. मग तिने प्रशांतला फोन ट्रान्सफर करायला सांगितलं. प्रशांत लाईनवर येताच तिने विचारलं “सर, दिनेश कुठल्या क्लायंटकडे गेलाय?”

“का गं? काय झालं? तो त्याच्या आधीच्या क्लायंटकडे गेलाय. शेवटचं पेमेंट द्यायला कटकट करत होते. मग हाच गेला.”

“ओह, ओके.”

“काय झालं?”

“नाही काही नाही. बोलेन मी नंतर त्याच्याशीच.”

“बरं, ठीक आहे.”

“शाल्मली, जरा वेळ काढू शकशील? मला बोलायचंय तुझ्याशी. इट्स पर्सनल.”

“सर, ...”

“हे बघ शाल्मली, तुला एकदा मला भेटायला काहीच अडचण नसावी. हो ना? तितकं तू ओळखतेस मला? काय?”

“हो हो सर. तसं नव्हे पण ...सर आज दुपारी जमेल तुम्हाला?”

प्रशांतला आश्चर्यच वाटलं. “हो तू म्हणशील तेव्हा आणि तिथे.”

“करते मी फोन.”

“गुड.”

तिनं भराभर कामं उरकली. श्रीशला घेऊन आली. शंतनूला फोन केला. “तू कुठे उतरला आहेस?”

“हॉटेल कोहीनूर”

“मी जरा ऑफिसमधे जाणार आहे. माझे बॉस प्रशांत, खूप मदत केली त्यांनी माझ्या कठीण काळात. लंचला ये म्हणाले. त्यांच्यासोबत जातेय. श्रीशला तुझ्याकडे सोडून जाईन. सांभाळशील?”

शंतनूच्या मनात हजारो निरनिराळ्या विचारांनी गर्दी केली.

‘शाल्मली माझ्या एकट्याकडे श्रीशला सोडायला तयार झाली. म्हणजे माझ्यावर अजूनही थोडा का होईना विश्वास आहे तिचा.’

‘हा बॉस आहे काय वयाचा?’ शंतनू, तुला तिला आनंदी पहायचंय ना मग? बरीच मदत केलीय म्हणते म्हणजे चांगलाच असेल. हीच तुझी परीक्षा आहे. बघू पास होतोस की नापास. माझी शाल्मली ... तिला दुसरा कोणी आवडायला लागलाय का?’

हजार उलट सुलट विचार.

“हॅलो...”

“ओह, सॉरी, हो हो, सांभाळेन ना, म्हणजे तू सांगशील ना काय करायचं ते?”

“हो सांगेन.”

“हे बघ मी तिकडेच येतो, तुम्हाला पिक करतो. तुला सोडून आम्ही हॉटेलवर येऊ. श्रीशची पण राईड होईल. बेबी सीटमधे बसेल ना?”

“हो केलीय दादाने सवय.”

“मग ठीक आहे. किती वाजता?”

“अजून अर्ध्या तासाने ये.”

“ओके”

मग प्रशांतला तिने वेळ आणि जागा सांगितली.

शाल्मली कपाटासमोर उभी राहिली. अबोली रंगाची साडी काढली नेसायला. बऱ्याच दिवसांनी नेसली ती साडी. मॅचिंग कानातले घातले. मंद परफ्युम फवारला. स्वत:लाच आरशात पहाताना आश्चर्य वाटलं तिला. किती वेगळे दिसतोय आपण.

‘कुणासाठी चाललय हे शाल्मली?’ तिच्या मनाने जाब विचारला. ‘स्वत:साठी’‘ खोटं.’प्रशांतला अधिक मोहात पाडायचंय तुला? की शंतनूला अधिक जळवायचंय? स्त्री आहेस, तुझ्या मनातलं त्या बिचाऱ्या पुरूषांना नाही कळायचं पण मला माहीत आहे.’

स्वत:च्या छबीकडे एकटक पाहिलं तिने मग.

जणू ‘माझ्यापासून नाही लपून राहणार तुझं काहीच’ असच म्हणत असावं तिला तिचं मन. मग हट्टालाच पेटल्यासारखं पोवळयाच्या रंगाचं लिपस्टीक तिने ओठांवर फिरवलं. तिच्या या एका छोट्याश्या कृतिने तिचं सौंदर्य अधिकच खुलून आलं. मग कळत न कळत आय लायनर ... बस झालं.

आता कधीही शंतनू बेल वाजवेल. ५ मिनिटात वाजलीच बेल.

दार उघडताच शंतनू दारातच थबकला. नकळत श्वास खेचला त्याने वर. ‘ओह गॉड!’ आत्ता कळलं इतके दिवस काय वेगळं वाटत होतं. बुद्धीमान शाल्मली स्वत:ला त्या गबाळ्या वेशात लपवत होती.

ही अशी भेटणार त्या बॉस ला? डोकं गरम झालं त्याचं.

‘शंतनू, आवर स्वत:ला. परीक्षेत पास व्हायचंय तुला. मुलाला आणि निदान शाल्मलीच्या विश्वासाला जिंकायचंय ना? मग शांत रहा. हेच तुझं प्रायश्चित्त आहे.’

मग त्याने जाणीवपूर्वक लक्ष श्रीशकडे वळवले. “याला भूक वगैरे लागली तर? काय देऊ?”

“हॉट चॉकलेट आवडीने पितो. काही बिस्किटस् आणि फळांच्या फोडी आहेत डब्यात, फक्त घाईने कोंबतो तसं करू नाही द्यायचं. हाताने एक एक फोड भरवायची. हात स्वच्छ धुवून भरवायचं.”

“येस मॅम”

“चला राजे, आता आपण मज्जा करायची.”

“काही खेळणी पण आहेत बॅगेत. कान खाजवत नाही इकडे लक्ष ठेव. तसं नाहीच खाजवत तो पण तरीही.”

“हो, नक्की. तू निश्चिंत पणे जा. काही काळजी नको करूस. मी व्यवस्थित सांभाळेन त्याला. फक्त तुझी आठवण काढून रडला तरच...”

“मग मला फोन कर”

‘तुझी माझी दोघांचीही परीक्षा रे बाबा श्रीश!’ मनातल्या मनात शंतनू म्हणाला.

तिघे निघाले. शाल्मलीने जिथे सांगितले तिथे त्याने गाडी थांबवली. क्षणार्धात जवळपासच्या सर्व तरूण पुरुषांचं स्कॅनींग झालं. पण शाल्मलीला अपील होईल असा कोणी दिसला नाही याला. ‘वा भले, म्हणजे शाल्मलीला वाट पहायला लावणारा आहे की काय? बॉस झाला म्हणून काय झालं?’

आता तिथे अधिक थांबणं बरं दिसलं नसतं. तरी “श्रीश चला जायचं का आपण की थांबायचं?’ असं म्हणून झालंच त्याचं.

“नाही निघा तुम्ही.” शाल्मलीने म्हटलं तसं गाडी वळवली शंतनूने.

शाल्मली आत शिरली. कोपऱ्यातल्या टेबल वर प्रशांत बसला होता. ती गेली तिथे. त्याची नजर वर गेली नि पाहतच राहिला तो. उठून तिचं स्वागत करण्याचं भानही नाही राहिलं त्याला.

‘ओह माय माय...’

मग अचानक जाग आल्यासारखा तो ऊठून ऊभा राहिला. शाल्मली बसली समोर.

“बराच वेळ वाट पहायला लागली का सर?”

“एवढं सुंदर माणूस येणार असतं तेव्हा अशी थोडी वाट पहावीच शाल्मली.”

“थॅंक यू सर, ”ती किंचित हसली.

“हा कायापालट कसा?”

“ही नॉर्मल शाल्मली आहे सर. तुम्ही ऑफिसमधे पाहायचात ती जाणीवपूर्वक केलेली वेशभूषा होती.”

“हं, हं! इन्टरेस्टींग.”

“मग आज नाही कराविशी वाटली ती वेशभूषा?”

“नाही सर, तुम्हाला चांगली ओळखते मी आता. माझ्या हितचिंतकांबरोबर त्या वेशभूषेची गरज नाही.”

"हं, गुड."

"आता या शुभचिंतकाला अधिक काही होण्याची इच्छा आहे हे माहितच आहे तुला. त्यात काय अडचण आहे हे सांगण्याचा प्रयत्न कर. तोपर्यंत मी काही स्टार्टरस, सूप वगैरे मागवतो."

ती गप्पच बसली. ऑर्डर देऊन झाल्यावर त्याने परत मोर्चा तिच्याकडे वळवला.

मग काहीसा गंभीर होत प्रशांत म्हणाला, "शाल्मली मी पुढच्या महिन्यात वयाची ३५ पूर्ण करेन. माझ्या आयुष्यात अगदीच काही स्त्रिया आल्या नाहीत असं नाही. पण आयुष्याची जोडीदारीण म्हणून कोणीच वाटली नाही. आई वडील लहानपणीच गेले. लांबच्या आत्याने होस्टेलवर ठेवले. तिथेच लहानाचा मोठा झालो. सगळीच नाती फक्त आणि फक्त देवाण घेवाणीवर चालतात असाच अनुभव होता. मी नोकरीत आल्यावर मात्र मी हे स्वत:पुरतं बदललं. मिळणारा पैसा, हुद्दा आणि काम यांचं गणित घालत बसलो नाही. भरपूर मेहनत केली. कंपनी स्वत:चीच असल्यासारखं जीव तोडून काम केलं. त्याचा मोबदला न मागताही मिळत गेला. हाताखालच्या माणसानाही हे शिकवण्याचा सतत प्रयत्न केला. मित्र भरपूर मिळाले. नाव हुद्दे आपोआपच चालत आले. मग इथे आल्यावर तू भेटलीस आणि आपल्यासारखच आतून स्वयंप्रेरित होऊन कोणीतरी काम करतंय हे पाहून प्रचंड आनंद झाला. असं वाटलं ही नक्की आपल्याला समजून

घेऊ शकेल. आपली बौद्धिक, मानसिक सर्वच पातळ्यावर तार जुळेल. मग श्रीश बद्दल कळलं. तुझ्याविषयीचा आदर प्रचंड दुणावला. तुला माझं तुझ्याजवळ खेचलं जाणं कळतंय आणि तरीही तू प्रतिसाद देत नाहीस हे लक्षात येऊनही मी माझ्या भावना लपवून ठेवायचा प्रयत्नही केला नाही. पण मग तू स्पष्टच बोलून या गोष्टी पुढे जाऊ शकत नाहीत म्हणालीस. श्रीशच्या शस्त्रक्रियेचा ताण होता तुझ्यावर. आता तू त्यातून बाहेर आली असावीस असा कयास आहे. निदान मला कारण तरी कळू दे.''

शाल्मली काही बोलणार तेवढ्यात ऑर्डर आली. वेटर गेल्यावर शाल्मली म्हणाली

''सर, माझं लग्न झालय. मला एक मुलगा आहे. आणि मी आणि माझा नवरा एकमेकांपासून विभक्त झालो आहोत हे तुम्ही जाणताच. आम्ही का विभक्त झालो ती एक मोठी स्टोरी आहे. पण ते महत्वाचं नाही. एखादी स्त्री जेव्हा लग्न करते ना तेव्हा ती सर्वस्व देते त्या नात्यासाठी, घरासाठी. आणि नातं तुटलं तर ती पुन्हा कधीच पूर्वी सारखी जोडली जात नाही. काहीतरी तिच्यात तुटलेलंच राहतं. नोकरी आणि लग्न यात हा एक फार मोठा फरक आहे.

तुमच्या सारख्या माणसाला कोणीही हसत हसत हो म्हणेल. खरतर शहाणी असेन तर मी ही म्हणायला हवं. पण मलाच फक्त कल्पना आहे की हे किती एका बाजूला झुकणारं नातं होईल.

सध्या श्रीश, ही माझी सर्वप्रथम प्राथमिकता आहे. मग माझी नोकरी. त्यानंतर बाकीचं. एखाद्या स्त्रीच्या आयुष्यात तिसऱ्या क्रमांकावर स्थान असणं हे काही चांगलं लक्षण नाही पुरूषाच्या दृष्टीने.

प्रत्येक लग्नात स्त्री पुरूष दोघही ही शिडी उतरतात पण तेव्हा ते त्यांच्याच मुलांना प्राथमिकता देण्यासाठी असतं. आणि पूर्वी दोघांनीही एकमेकांच्या आयुष्यात प्रथम स्थान अनुभवलेलं असतं.

त्यातून श्रीश समोर आणि पर्यायाने माझासमोर सध्या मोठं आव्हान आहे त्याला ऐकू येणं आणि पुढे जाऊन त्याला बोलतं करणं. मिळणारा प्रत्येक मोकळा क्षण मला कदाचित यासाठीच वापरावा लागेल. दुसऱ्या कोणत्याच गोष्टीचा विचारही करायला माझ्याकडे वेळ नसेल. मग नवं नातं हा ठार वेडेपणा नाही का होणार? आज तुम्हाला माझ्याबद्दल वाटणारं आकर्षण उद्या माझा वेळ तरी नक्कीच मागेल. नेमका तोच नसेल माझ्याकडे द्यायला. आयुष्याच्या अशा टप्प्यावर मी उभी आहे की नोकरी सोडण्याचा विचार परत कधीच करू शकणार नाही. मी देवाचे आभार मानते की आपण भावनिक दृष्ट्या नाही गुंतलो एकमेकांत. जे काही आहे ते वैचारिक पातळीवर आहे. आकर्षणाला समजावणं सोपं असतं. भावनेला नाही.

तुमचं माझ्या आयुष्यात येणं हे माझं सुदैव होतं सर. मी खूप शिकले तुमच्याकडून आणि शिकतही राहीन. तुमची पदोपदी झालेली

मदत माझ्यासाठी किती महत्वाची होती, आहे हे तुम्ही जाणताच. आपण उत्तम सहकारी आहोतच. पण ते तसंच राहो.

कारण देण्यासाठी माझ्याकडे सध्या एकही क्षण मोकळा नाही. म्हणूनच मी घाईने भेटायचं ठरवलं. पुढच्या आठवड्यात चित्र स्पष्ट होईल. श्रीशला ऐकू येईल की नाही हे ठरेल. आलं तर सगळा मोकळा वेळ त्याला बोलतं करण्यासाठी वापरावा लागेल. मला तो अगदी नॉर्मल बोलताना पाहायचाय. नाही ऐकू आलं तर अधिक मोठं आव्हान असेल. पण दुसऱ्या कोणत्याच गोष्टीचा विचारही करायला वेळ नसेल माझ्याकडे, बरोबर ना? तुम्ही स्वत:साठी योग्य साथीदार शोधा. ती तुम्हाला मिळावी यासाठी माझ्या शुभेच्छा सर!”

प्रशांत बराच वेळ विचार करत राहिला. शाल्मलीचं बोलणं त्या कॉर्पोरेट किंगला न कळतं तरच नवल. प्राथमिकतेचा तिचा मुद्दा निर्विवाद होता.

एक स्त्री असून, ती हा निर्णय घेऊ शकत होती याचाच अर्थ ती ना त्याच्याकडे आकर्षित होती ना भावनिक रित्या गुंतली होती.

मग हळू हळू त्याच्या लक्षात आलं तो ही फक्त आकर्षित होता. प्रेमभावना नव्हती त्यात. असती तर प्राथमिकता पहिली की तिसरी हा मुद्दा गौण ठरला असता.

मग दोघांनी सूप, स्टार्टर्स वरच आवरतं घ्यायचं ठरवलं.

“डेझर्ट?”

“नाही नको, श्रीशला सोडून आलेय. जेवढं लवकर निघेन तेवढं बरं.”

“हं!”

“सी यु इन द ऑफिस सून.”

“येस सर!”

निघाले दोघं.

“तुला ड्रॉप करू का घरी?”

“अं नको, मला हॉटेल कोहीनूरमधे जायचंय.”

“ओह ओके.”

‘श्रीश चं कारण सांगून लवकर निघणारी आता हॉटेलमधे काय करतेय, असा प्रश्न आला त्याच्या मनात, पण तो गप्प राहिला.

ती ही काही बोलली नाही. मग ऑफिसचेच काही विषय निघत राहिले.

तिला ड्रॉप करून त्याने गाडी ऑफिसकडे वळवली.

सध्या तरी त्याची तीच प्राथमिकता होती. मग त्याला जाणवलं, त्याचं काम ही त्याची कायमच प्राथमिकता राहणार होती.

——-

ही हॉटेल रूमवर पोहोचली तेव्हा दार उघडच होतं. अख्खा रुमभर खेळणी पसरली होती. साईड टेबलवर हॉट चॉकलेटचा रिकामा ग्लास, फळांचा रिकामा डबा होता.

बेडभर शंतनू पसरला होता आणि त्याच्या छातीवर श्रीश पालथा झोपला होता.

हे दृश्य तिच्या मनात परत एकदा हजारो भावनांचा कल्लोळ उठवून गेलं. घशात बारीकसा हुंदका दाटला. पटकन एक फोटो काढून घ्यावा असंही मनात आलं. काय जाणो शंतनूचं मन परत बदललं आणि गेला सोडून बाळाला तर क्षणभर का होईना पण त्याने प्रेम केलं तुझ्यावर असं सांगायला पुरावा झाला असता.

तिनं खरंच ओल्या नजरेनेच एक फोटो काढला. हळूच जाऊन त्या प्रेमाच्या कोषात विरून जावं आपणही ही भावना अनावर होऊन गेली पण तिने स्वत:ला कसंबसं सावरलं.

'नाहीच संपणार का कधीच ही ओढ शंतनू बद्दलची? तो इतका ताळतंत्र सोडून वागला. इतकंच नव्हे तर त्याने आपल्या स्त्रित्वाचा घोर अपमान केला परस्त्री बरोबर...'

‘तरीही हे असं आकर्षण? ही ओढ? का पण? मी असं वागले असते तर? माफ करू शकला असता मला?’

‘शंतनूच कशाला इतर कोणताही पुरूष माफ करू शकेल?’

‘केतनने केलं, केलं का खरंच? की ती गेल्यावरची उपरती आहे ही?’

‘नियम, कायदे, यांची धाव बुद्धीपर्यंत. भावना कुठे ऐकतात त्यांचं?’

‘पण भावना आहेत म्हणून जग सुंदर आहे.’

अचानक बेडवर हालचाल झाली आणि शंतनू जागा होऊन आपण त्याला निरखताना आपल्याला निरखतोय हे लक्षात येऊन शाल्मली चपापली. पटकन तिथून बाजूला जात तिने खेळ आवरायला सुरवात केली.

शंतनू म्हणाला, “याला जरा उचल. म्हणजे मी उठून आवरतो. हा जागा होऊन रडेल म्हणून मी हललोच नाही आणि मग मलाही झोप कधी लागली कळलंच नाही. मग हा पसारा तसाच राहिला.” तो खजिल होत म्हणाला.

तिने श्रीशला उचलून खाली बेडवर झोपवले. जरा चाळवला पण लगेच झोपला परत.

मग शंतनू उठला. अंग अवघडलं असावं.

“श्रीशने दूध, फळं सगळं खाल्लं. हात धुवून भरवलं मी. खूप खेळलो मग आम्ही. मजेत होता. अजिबात रडला नाही. मग असा अंगावर येऊन पडला, दंगामस्ती करता करता मिनिटात झोपूनच गेला गं.”

शाल्मली लहान मुलाच्या उत्साहाने बोलणाऱ्या शंतनूकडे पाहत होती.

‘माणूस खरंच इतका पूर्णपणे बदलतो? की हा आव आणतोय? लहान मुलांना खरं खोटं प्रेम स्पर्शातून कळतं म्हणतात! खरंच कळतं का? माझ्या मनातलं संशयाचं भूत बहुधा कधीच नाही जाणार का?’

“तुझं कसं झालं लंच?”

“छान!”

“सहजच बोलावलं होतं की काही विशेष?”

शाल्मलीने एकदा स्थिर नजरेनं पाहिलं. मग म्हणाली

“मला लग्नाबद्दल विचारलं त्यांनी!”

बराच वेळ शांतता.

मग घोगऱ्या आवाजात शंतनू म्हणाला “तू काय सांगितलस?”

“विचार करून सांगते म्हटलं”

“हं!” एक मोठा सुस्कारा सोडला त्याने

नजरेत वेदना होती

पण तो पुढे म्हणाला, “तुझ्या आयुष्यात हा माणूस आनंद आणणार असेल तर मी श्रीशची पूर्ण जबाबदारी घेईन शाल्मली.”

अत्यंत कडवट स्वरात ती म्हणाली “श्रीशशी संबंध नाकारला म्हणून लग्नाच्या नवऱ्याचं घर मी क्षणात सोडलं, विसरलास? मग आता श्रीशची जबाबदारी न स्विकारणाऱ्या माणसाबरोबर लंचला तरी जाईन असं वाटलच कसं तुला?तो श्रीशची संपूर्ण जबाबदारी घ्यायला तयार आहे.”

मगाचचा उत्साहाने उफाळणारा शंतनू नाहीसाच झाला एकदम. खांदे पडले. हलक्या हातांनी काही न बोलता त्याने पसारा आवरायला सुरवात केली. सगळं झाल्यावर बेडवर बसला आणि श्रीशच्या डोक्यावर हलकेच हात ठेवला त्याने.

“मी दोन आठवड्यांची सुटी घेतलीय. मग डायरेक्ट इथल्याच ऑफिसला रुजू होईन. तोपर्यंत रोज मला श्रीशला भेटू देशील? श्रीशच्या इम्प्लांट ॲक्टीवेशनला मला येऊ देशील ना?”

तिला मनातून खूप वाईट वाटलं मग. उगाच खोटं बोललो असं वाटलं. पण दुसरं मन म्हणालं "ही डीजर्वज इट."

"हो भेट तू त्याला रोज. इम्प्लांटची डेट मंगळवारी ठरेल. कदाचित योग्य वाटलं तर त्याच दिवशी करतील."

"मी येतो तुम्हाला घेऊन जायला." शंतनू उत्साहाने म्हणाला.

——-

त्यानंतरचे चार दिवस रोज दुपारी तो श्रीशला घेऊन जाई. संध्याकाळी परत आणे. बऱ्याचदा मग शाल्मली त्याचाही स्वैपाक करूनच ठेवी. जेवण करून परत जायचा.

केतकीला समजाऊन तिने तिच्या घरी नेऊन सोडले. केतन कांचनच्या रुममधे घेऊन गेला सर्वांना. दारातच केतकी त्याच्या डॅड म्हणत गळयात पडली तेव्हा तो ही खूश झाला एकदम. शंतनू आला होता तिच्यासोबत केतकीला सोडायला. कांचन खूश झाली केतकीला पाहून. दोघीनी एकमेकिंना गळामिठी दिली.

"केतकी, मंगळवारी येतोय आम्ही तुला न्यायला."

"हो हो, आंटी मी तू दिलेला नवा ड्रेस घालणार. श्रीशलाही तोच घाल आपण घेतलेला. कांची, आंटीने तुलाही दिलाय सेम ड्रेस."

मग मुली रमल्या एकमेकीत.

“मी तुम्ही सांगितलेलं सगळं लक्षात ठेवलय. कांचन बरोबर बोलणं सुरू केलय. तिच्यात आणि माझ्यात ही फरक पडतोय असं वाटतंय. पण तुमची मदत लागणार आहे आम्हा तिघांनाही.”

“होईल सगळं ठीक. काळजी न करता पुढे जा.” ‘याचीही प्राथमिकता माझ्यासारखीच त्याच्या मुली आहेत.’शाल्मली मनात म्हणाली.

“युवर वाईफ इज ॲन एंजेल मि. शंतनू .”

“आय नो”

———-

मंगळवार उजाडला. सकाळपासून शाल्मली अस्वस्थ होती. शंतनू सकाळीच आला होता. पण आज तोच इथे थांबणार होता. तिची अस्वस्थता त्याला जाणवत होती.

मग तो म्हणाला, “शाल्मली, येईल आपल्या श्रीशला ऐकू, मला खात्री आहे. तुझी मेहनत अशी वाया नक्की नाही जायची.”

तेवढ्यात गॅलरीत चिमणा चिमणीची जोडी चिवचिवत आली. शंतनूच्या हातात बिस्कीट होतं ते बोलता बोलता त्याने बारीक तुकडे करून कट्ट्यावर ठेवलं. मग आत जाऊन पसरट भांड्यात पाणीही आणून ठेवलं.

शाल्मली महत् आश्चर्याने हे सगळं पाहत होती. शंतनूच्या ते लक्षात आलं. तो म्हणाला “तू खूप प्रयत्न केलास मला माणूस बनवण्याचा, तू गेल्यावर हळू हळू लक्षात यायला लागल्या गोष्टी.”

“आपल्या घरातल्या तुझ्या टांगलेल्या कुंड्यांमधे आता बरीच चिमणा चिमणीची बिऱ्हाडं आहेत. कामाच्या बाईला सांगून आलोय रोज दाणा पाणी द्यायला. मी सामान हलवायला जाईन तेव्हा येशील? तुझी बाग परत फुलवलीय मी बरीचशी. हात मातीत घातल्यावर कसं वाटतं ते माहीताय मला आता. तुला नक्की आवडेल ती बघायला.”

काही न बोलता शाल्मली आत गेली. जाता जाता तिने हळूच डोळे पुसले.

शंतनू परत यायला लागला त्याने तिचे आई वडील खुशीत होते. तिने हे फक्त श्रीश पुरतं आहे हे स्पष्ट केलं होतं आणि त्यावर त्या दोघांनीही तिला काही म्हटलं नव्हतं.

‘प्रशांत परत भेटला कसा नाही हिला’ असा विचार शंतनूला पडला होता. पण तो खूशच होता त्यामुळे.

दुपारीच निघाले तिघे. आधी केतकीला घेऊन मग पुढे जायचे होते.

चारला हॉस्पिटलला पोहोचले. प्रथम प्राथमिक तपासणी केल्यावर लगेचच ॲक्टीवेशन करावं असं मत दिलं. लॅबमधे नेलं नर्सने.

मग ऑडीओमेट्री एक्सपर्ट आणि त्यांचे साथीदार आले. त्यांनी संपूर्ण पद्धत समजाऊन सांगितली. श्रीशला मुळात कधीच ऐकण्याचा अनुभव नाही. त्यामुळे त्याला ऐकू आलंय की नाही हे कदाचित पहिल्या अटेंम्प्टमधे समजणार नाही. दुसरं असं की हे इम्प्लांट सगळेच आवाज टिपणार. त्यामुळे त्याला गोंगाट ऐकू येणार त्यामुळे ही त्याला भेदरल्यासारखं होईल.

आपण वेगवेगळया फ्रिक्वेन्सीजचे साऊंडस् त्याला वेगवेगळे ऐकवणार. तेव्हा आजुबाजूचे आवाज येऊ नयेत म्हणून आपण या लॅबमधे या टेस्ट करतोय.

आता आपण सध्या अगदी गप्प बसायचंय. मॅम तुम्ही त्याला मांडीवर घेऊन बसा. तो शांत बसणं महत्वाचं.

मग श्रीशच्या डोक्यामागे एक एक चकती कानांच्या वर लावण्यात आली आणि कानामागे छोटी युनिटस लावली. त्याने अंगठा दाखवला. मग सगळयांना गप्प राहण्याची खूण केली. शंतनूने केतकीचा हात धरला.

मग आतून काचेतून अंगठा दाखवला गेला. बराच वेळ काहीच झालं नाही. बाहेरच्या टेक्निशियनने परत ॲडजस्टमेंटस केल्या. परत

तेच सगळं, आतून अंगठा. काही परिणाम नाही. शाल्मलीचा धीर खचत चालला. शंतनूच्या ते लक्षात आलं. केतकीला त्याने कानात काही सांगितलं. ती शाल्मलीच्या जवळ जाऊन तिच्या हातावर हात ठेऊन उभी राहिली. परत सगळ्या ॲटॅचमेंटस तपासल्या गेल्या. मग परत आतून बाहेरून अंगठे. श्रीश कानाच्या मागे लावलेले मशीन्स, चकत्या काढून टाकण्याच्या प्रयत्नात होता. शाल्मलीने त्याचे हात धरून ठेवल्यामुळेही तो चुळबुळत होता. मग परत परत सगळ्या ॲडजस्टमेंटस होत राहिल्या. शाल्मलीचा धीर एका क्षणी पूर्ण खचला. डोळे भरून येतील असं वाटायला लागलं तिला. नकळत नजर शंतनूकडे गेली. तो बघत होताच तिच्याकडे. नुसता जवळ आला. श्रीशला जरा शांत केलं. डोक्यावर हात ठेऊन उभा राहिला तिच्या नि श्रीशच्या. परत अंगठे दाखवणं झालं. आतून खूण आली नि तत्क्षणी श्रीशने उसळी मारली. पुन्हा पुढच्या वेळी तसच. टेक्निशियनने हसत हसत शाल्मली आणि सगळ्यांना खूण केली. शाल्मलीला कळेना. परत परत दर वेळी श्रीश उसळू लागला. बराच वेळ असं झाल्यावर मग मेन एक्सपर्ट बाहेर आला. त्याने शाल्मलीला खूण केली. तिला आधीच सांगितल्याप्रमाणे तिने हळूच श्रीश अशी हाक मारताच त्याने गर्रकन वळून मागे बघितले तिच्याकडे. शाल्मलीच्या डोळ्यातून घळाघळा पाण्याच्या धारा वाहू लागल्या. मग केतकी, शंतनू सगळ्यांनी हळू आवाजात मारलेली हाकही त्याला ऐकू जातेय याची खातरजमा

झाली. तो मजेने आवाजाच्या दिशेने वळून वळून पाहू लागला, हसू लागला.

शाल्मली शंतनूची नजरानजर झाली. त्याच्याही डोळयात तोच आनंद होता जो तिच्या होता. काहीतरी तुटलेलं परत जुळलं असा भास झाला तिला. त्याला फक्त श्रीशहा आवाज कळत होता. त्याचं ते नाव आहे हे शिकवायचं होतं.

मग त्याला हॉस्पिटल मधून एक चक्कर मारून आणायला सांगण्यात आलं. तो कदाचित रडेल ही कल्पनाही देण्यात आली. गोंगाट सहन होणार नाही कदाचित म्हणाले.

पण आता शाल्मलीला त्याची काळजी नव्हती.

तिचं बाळ ऐकू लागलं होतं. त्याचा बाबा त्याच्या बरोबर होता.

---

सध्या शाल्मली आणि शंतनू वेगळेच राहत आहेत. पण रोज भेटतात. रात्रीचं जेवण एकत्र घेतात. शंतनूने नुकताच नवा फ्लॅट घेतलाय. तो शाल्मलीला हरप्रकारे मदत करतोय. दोघं चांगले मित्र आहेत.

सॅमने त्याला परत शाल्मलीला प्रपोज करायला सुचवलय. पण त्याचा धीर होत नाहीय. आहे ती मैत्रीही जायची.

पण आज तो ठरवूनच आलाय. आज त्याच्या फ्लॅटवर जेवण्याचा वार आहे. त्याने पूर्वतयारी करून ठेवलीय. थोडे पदार्थ बाहेरून आणलेत.

आता कुठल्याही क्षणी येईल शाल्मली.

बेल वाजलीच. शाल्मली श्रीशला घेऊन आत आली. “बाबाबाबा बाबाबाबा” श्रीशची बडबड सुरू झालीय. शंतनूने त्याला घेतला तिच्याकडून. “तू चहा घे तोपर्यंत याला दूध देतो. फ्रिजमधे तुझ्या आवडीची सुरळी वडीपण आहे.”

“ओह, ग्रेट.”

“शाल्मली बरेच दिवस तुला विचारायचं विसरतोय, तू तुझ्या बॉसला काही उत्तर दिलस की नाही?”

“बॉस? उत्तर?”

“अगं, विसरलीस की काय? लग्नाबद्दल विचारलं होतं ना तुला? तू विचार करून सांगते म्हणाली होतीस.”

शाल्मलीचा चेहरा गोरा मोरा.

“हं, ते?”

“हं, तेच.”

ती नजर टाळतेय.

“मी ‘नाही’ सांगितलं.”

शंतनू जवळ येऊन उभा आहे तिच्या.

“का?”

ती गप्प.

तो तिला आपल्या बाजूला वळवतो.

“मला परत एक संधी देशील? मी तो घाणेरडा, शंतनू नाही राहिलोय गं. बदललोय. तूच बदलंवलं आहेस मला. मला परत तुमच्यात सामिल करून घे.” “बाबाबाबा” श्रीश मागून येऊन पाय पकडून उभा. शंतनू त्याला उचलून घेतो. डोळ्यात प्रचंड आर्जव त्याच्या.

“तुझ्या इच्छेविरूद्ध कधीच काही करणार नाही.”

शाल्मलीचे डोळे पाणावलेले, पण ती अशी लगेच नाही तयार होणाराय.

“नको.”

“का पण?”

“आधी तू श्रीशला नाकारलंस. आणि नंतर स्नेहलबरोबर..., आता नाही कधीच एकत्र येऊ शकत आपण.”

“स्नेहलचं काय?”

“स्नेहलचं काय?” संतापून शाल्मली ओरडली.

“हो, स्नेहलचं काय?” शंतनू ही ठामपणे म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर गोंधळ स्वच्छ दिसत होता.

“त्यादिवशी रात्री तुला फोन केला तेव्हा तिने कसा उचलला? आणि म्हणाली, झोपलेत ते, उठवते, मग तू फोन बंद केलास.

अगं, काहीही काय बोलते आहेस? कधीची ही गोष्ट?

त्या दिवशी जेव्हा मी तुमच्या अनुवांशिकतेबद्दल विचारायला फोन केला तेव्हा.

तेव्हा तर मी मीटिंगमध्ये होतो. माझा फोन स्नेहलकडे होता. बाहेर आल्यावर मी तुझा कॉल पहिला आणि फोन केला तुला.

मग ती असं का म्हणाली?

हम्म ! आता माझ्या लक्षात येतंय सगळं.

काय लक्षात येतंय?

मग शंतनूने तिला स्नेहलविषयी सगळं सांगितलं. शाल्मली, मी बाकी कितीही वाईट असेन, पण मी खोटं नाही बोलत, माहित आहे तुला.

शाल्मली विचारात पडली. शंतनू खोटं नव्हतं बोलला कधीच. त्याने तिला घडलेले सगळे प्रसंगही सांगताना तो कुठेच काही खोटं सांगतोय असं नव्हतं वाटलं.

नाही कधीच एकत्र येऊ शकत आपण तरीही."

शंतनूचा चेहरा पडला.

"का नाही विचारणार?"

"का?"

"मला दोन मुलं हवीत आणि मुलगी नक्की हवीय. मग मी बेढब होईन."

"मला माफ कर शाल्मली मी ते सगळं बोललो होतो. नालायक माणूस होतो जगायला. ससेहोलपट झाली तुझी आणि आपल्या बाळाची. मला जन्मभर खेद राहणार त्याचा. पण मला एक परत संधी दे. सोनं करेन मी त्याचं."

ती भरल्या डोळ्यांनी पाहत राहिली. शंतनूने तिला आणि श्रीशला एकदमच जवळ घेतलं.

“आ...यी आ...यी, “ श्रीश एकदम म्हणाला.

प्रचंड आनंदाश्चर्याने शाल्मलीने त्याच्याकडे नि मग शंतनूकडे पाहिले. “तो मला आई म्हणाला.”

“काय टाईमिंग आहे माझ्या मुलाचं. आठवडा झाला प्रयत्न चाललेत आमचे.” शंतनूने मोठी शाबासकी दिली त्याला.

“थँक यू! थँक यू!” शाल्मलीचं रडू परत सुरू.

“आता अश्रू नकोत शाल्मली. खूप झाले ना?”


तिघांचा त्यांचा असा कोष आज पूर्ण झाला!!


समाप्त


———- मधू शिरगांवकर

**सौ. मधू शिरगांवकर यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके**

कव्हरवर क्लिक करताच पुस्तके उघडतील



## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १३ वे वर्ष.

## सौ. मधू शिरगांवकर यांचे ईसाहित्यवर हे चौथे पुस्तक.

सौ. मधू शिरगांवकर एक नामवंत लेखिका आहेत. अनेक नियतकालिकांतून त्यांच्या कथा व इतर साहित्य प्रकाशित होत असते. त्यांची लिखाणाची शैली प्रासादिक आहे. एखाद्या चित्रपटाप्रमाणे त्यांच्या कथा उलगडत जातात, त्याही त्या त्या प्रसंगानुरूप रस, रंग, स्वर, गंधासह. त्यांच्या कथा गूढ असल्या तरी अंधश्रद्धा जोपासणाऱ्या नसतात. उलट एक थेट आणि ठळक असा सामाजिक संदेश त्यांच्या कथांतून दिला जातो. महिला सक्षमीकरण हे त्यांच्या साहित्यातील एक अधोरेखित मूल्य आहे.

सौ. मधू शिरगांवकरांसारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२५ पुस्तके), अनील वाकणकर (८

पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (४), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), पुनम संगवी(४), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(४)  असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।